
सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित
धाराशिव | सोमवार, २७ एप्रिल २०२६ । वर्ष ४ थे अंक ५० । पाने १२ । किंमत रु. ८/- ■ RNI No. MAHMAR/2023/86468 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026.
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



संघाचे लक्ष्य केवळ शाखा चालवणे इतकेच नाही, तर दररोजच्या शाखेचा उद्देश चारित्र्यसंपन्न व्यक्ती घडविणे हा आहे. समाजहिताची भावना असलेल्या चारित्र्यसंपन्न व्यक्ती घडविण्यासाठी शाखेत एक तासाचे विविध संस्कार देणारे कार्यक्रम घेण्यात येतात. त्यामुळे, व्यक्ती निर्माणाचे लोकोत्तर साधन म्हणजे शाखेचे महत्त्व कधीही कमी होणार नाही.

**- यादवराव कृष्ण जोशी**
रा. स्व. संघाचे पूर्व सह सरकार्यवाह

# बुद्धांच्या विचाराने जागतिक शांतता शक्य

## 'मन की बात' कार्यक्रमातून पंतप्रधान मोदींचे प्रतिपादन

**नवी दिल्ली, २६ एप्रिल**

काही दिवसांतच आपण बुद्ध पौर्णिमा साजरी करणार आहोत. गौतम बुद्धांचे विचार आणि त्यांनी दिलेला संदेश आजही तितकाच समर्पक आहे. त्यांनी जगाला शांतीचा मार्ग सांगितला आहे. आजच्या तणाव आणि संघर्षाच्या काळात बुद्धांचे विचारच जगात शांतता निर्माण करू शकतात, असे प्रतिपादन पंतप्रधान मोदी यांनी केले.



आकाशवाणीवर प्रसारित 'मन की बात'च्या १३३ व्या भागात संबोधित करताना मोदी म्हणाले, भारत नेहमीच शांततेचा पुरस्कर्ता राहिलेला आहे. भगवान बुद्धांच्या विचाराने जगात शांततेचा मार्ग प्रशस्त होईल. आज भारत पवन ऊर्जेमध्ये वेगाने प्रगती करत आहे आणि त्यामुळेच आज आपला देश पवन ऊर्जा क्षेत्रात जगात चौथ्या स्थानी आहे. देशाची पवन ऊर्जा क्षमता ५६ गिगावॅटपेक्षा जास्त झाली आहे. गुजरात, तामिळनाडू, महाराष्ट्र, राजस्थान यांसारखी देशातील अनेक राज्ये या क्षेत्रात आपले वर्चस्व गाजवत आहेत. गुजरातच्या कच्छ, पाटन, बनासकांठा यांसारख्या क्षेत्रांमध्ये, जिथे पूर्वी फक्त वाळवंट दिसत होते. आज तिथे मोठे अक्षय ऊर्जा पार्क (रिन्यूएबल एनर्जी पार्क) तयार होत आहेत. भारताची खाद्य परंपरा केवळ चवीपुरती मर्यादित नाही, तर ती आपल्या संस्कृती आणि ओळखीचाही एक भाग आहे. भारतीय पनीर (चीज) या परंपरेचा एक महत्त्वाचा भाग आहे. ब्राझीलमध्ये नुकत्याच झालेल्या आंतरराष्ट्रीय पनीर स्पर्धेत भारतीय पनीर ब्रँड्सनी उत्कृष्ट कामगिरी करत प्रतिष्ठित पुरस्कार जिंकले. पंतप्रधानांनी संपूर्ण ईशान्य भारतात बांबू क्षेत्र भरभराटीस येत असल्याचे सांगितले. *(वृत्तसंस्था)*


### जनगणना देशाची सामायिक जबाबदारी

**जनगणनेचा पहिला टप्प्या सुरू झाला आहे. आतापर्यंत १.२ कोटी कुटुंबांसाठी हे काम पूर्ण झाले आहे. जनगणना हे केवळ सरकारचे काम नसून संपूर्ण देशाची सामायिक जबाबदारी आहे. प्रत्येक नागरिकाचा सहभाग अत्यंत महत्त्वाचा आहे. जनतेने २०२७ ची जनगणना यशस्वी करण्यासाठी एकत्र काम करण्याचे आवाहन मोदी यांनी केले.**



# जीवघेण्या हल्ल्यातून डोनाल्ड ट्रम्प बचावले

## हिल्टन हॉटेलमध्ये रात्रीभोज कार्यक्रमात गोळीबार | सुरक्षा रक्षकांच्या तत्परतेने हानी टळली



**वॉशिंग्टन, २६ एप्रिल**

अमेरिकेची राजधानी वॉशिंग्टन येथील हिल्टन हॉटेलमध्ये पत्रकार आणि विविध क्षेत्रातील मंडळींसाठी आयोजित करण्यात आलेल्या रात्रभोज कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यावर गोळीबार करण्यात आला. सुरक्षा रक्षकांनी वेळीच सतर्कता बाळगल्याने ट्रम्प हल्ल्यातून बचावले. ट्रम्प यांची पत्नी मेलेनिया आणि उपराष्ट्राध्यक्ष जे.डी. व्हान्स यावेळी उपस्थित होते. सुरक्षा रक्षकांनी हल्लेखोराला शस्त्रासह अटक केली. आरोपीचे नाव ३१ वर्षीय कोल थॉमस अॅलन असून तो कॅलिफोर्नियाचा राहणारा आहे.

व्हाईट हाऊसच्या वतीने आयोजित कार्यक्रमात ट्रम्प भाषण करण्यासाठी जात असताना हल्लेखोराने पाच ते सहा गोळ्या झाडल्या. सुरक्षा रक्षकांनी तत्काळ ट्रम्प यांना घेराव घालत सुरक्षितस्थळी नेले. हल्ल्यात एका सुरक्षा रक्षकाला गोळी लागली, परंतु बुलेट प्रूफ जॅकेटमुळे त्याला इजा झाली नाही. सुरक्षा यंत्रणांनी संपूर्ण बँक्वेट हॉलला वेढा घातला, तर दुसरीकडे नॅशनल गार्डच्या जवानांनीही इमारतीचा ताबा घेत हल्लेखोराला पकडले. या कार्यक्रमात ट्रम्प यांच्यासोबत उपराष्ट्रपती व्हान्स, संरक्षण मंत्री पीट हेगसेथ आणि परराष्ट्र मंत्री मार्को रुबिओ देखील उपस्थित होते. सुरक्षा यंत्रणांनी सर्व बड्या नेत्यांना तातडीने तेथून बाहेर काढले. हल्लेखोर कोण होता आणि त्याने हे कृत्य का केले, याचा तपास सुरक्षा यंत्रणांकडून केला जात आहे. परिसरात सध्या कडक सुरक्षा व्यवस्था तैनात करण्यात आली. ट्रम्प यांनी प्रसारमाध्यमांना सांगितले की, सुरक्षा रक्षकांच्या तत्परमुळे सर्वजण सुखरूप आहेत. *(वृत्तसंस्था)*

### तपास सुरू, सुरक्षेबाबत प्रश्नचिन्ह

**एफबीआय संचालक काश पटेल यांनी सांगितले की, दहशतवाद विरोधी पथक या प्रकरणाचा तपास करत आहे. कार्यक्रम स्थळाची सुरक्षेत चूक झाली. मोठ्या कार्यक्रमांसाठी अधिक प्रगत सुरक्षा व्यवस्था असणे गरजेचे होते. या घटनेत एक अधिकारी जखमी झाला आहे, परंतु त्यांची प्रकृती उत्तम आहे.**

# बसवराजू, हिडमाच्या मृत्यूचा सूड घेणार



## माओवाद्यांची पत्रकातून धमकी, सशस्त्र क्रांतीचा पुनरुच्चार

**रांची, २६ एप्रिल**

**बंदुकीच्या जोरावर सशस्त्र क्रांतीचे स्वप्न पाहणाऱ्या माओवादी संघटनेतील अनेक नेत्यांनी शरणागती पत्करल्याने त्यांच्या चळवळीला घरघर लागली आहे. संघटनेचा एकेकाळचा सर्वोच्च नेता देवजी याने शस्त्रे खाली ठेवून मुख्य प्रवाहात येण्याचा निर्णय घेतल्याने बिथरलेल्या माओवाद्यांच्या झारखंडमधील तेलंगणातील उत्तर तालमेल कमेटीने (एनसीसी) पत्रक काढून आगपाखड केली. सशस्त्र क्रांतीचा पुनरुच्चार करत बसवराजू, हिडमाच्या मृत्यूचा सूड घेणार असल्याचे पत्रकात नमूद करण्यात आले.**

कार्ल मार्क्स, लेनिन, चारु मुजुमदार, बसवराजू, राजू दा, कोसा दा आणि हिडमा या नेत्यांनी प्राणांची आहुती दिली पण कधी तडजोड केली नाही. मात्र, देवजीसारख्यांनी स्वतःच्या बचावासाठी शरणागती पत्करली, अशी बोचरी टीका संघटनेने पत्रकातून केली आहे. भूमिगत राहून लढा देण्याऐवजी कायदेशीर चौकटीत जाणे हा विघटनवाद असून, अशा लोकांमुळे क्रांतिकारी चळवळ कमकुवत होणार नाही आणि सशस्त्र क्रांती सुरूच राहणार असल्याचा दावा केंद्रीय कमिटीने केला आहे.

देशातील दोन राजकीय रेषांमधील संघर्ष अधोरेखित करत मार्क्स-लेनिन-माओ विचारसरणीवर आधारित सशस्त्र संघर्ष हाच योग्य मार्ग असल्याचा दावा पत्रकातून करण्यात आला. देवजी, कोबाड, वेणुगोपाल यांना शत्रूचा एजंट अशी उपमा देण्यात आली. देवजीने मांडलेली लोकशाहीची भूमिका त्यांना अमान्य असल्याचेही म्हटले आहे. *(वृत्तसंस्था)*

### गनिमी कावा पद्धत अवलंबणार

**सशस्त्र क्रांतीशिवाय पर्याय नसून गनिमी कावा आणि छापामार युद्धाद्वारे जनआंदोलन मजबूत करण्यात येणार आहे. नेपाळमधील कम्युनिस्ट चळवळ ज्याप्रमाणे मूळ वामपंथी विचारांपासून दूर गेली, तसाच प्रयत्न भारतातही सुरू असल्याचा संशय नक्षल्यांनी व्यक्त केला आहे. क्रांतीचा मार्ग सोडून लोकशाहीच्या वाटेवर जाणे म्हणजे चळवळीचा घात असल्याचे पत्रात नमूद आहे.**

### सुरक्षा दल सतर्क

**या पत्रकानंतर सुरक्षा दलाने माओवादग्रस्त भागात सुरक्षा वाढवली असल्याची माहिती एका पोलिस अधिकाऱ्याने दिली. अहेरी, सिरोंचा आणि भामरागड या तेलंगणा-छत्तीसगड सीमेलगतच्या तालुक्यांमध्ये कोम्बिंग ऑपरेशन आणि गस्त वाढविण्यात आली आहे. माओवाद्यांच्या या धमकीवजा पत्रकाला प्रत्युत्तर देण्यासाठी सुरक्षा दल सज्ज असल्याची माहिती अधिकाऱ्याने दिली.**

## आयएलएस लॉ कॉलेज, वसतिगृहात रॅगिंग

**पुणे, २६ एप्रिल**

शहरातील नामांकित आयएलएस लॉ कॉलेज तसेच कॉलेजमधील मुलांच्या वसतिगृहात द्वितीय वर्षात शिकणाऱ्या विद्यार्थ्याला त्रास देत रॅगिंग केल्याप्रकरणी डेक्कन पोलिसांनी पाच विद्यार्थ्यांविरुद्ध महाराष्ट्र रॅगिंग प्रतिबंधक कायद्यांतर्गत गुन्हा दाखल केला आहे. या घटनेमुळे महाविद्यालयीन परिसरात खळबळ उडाली आहे. याबाबत एका ३५ वर्षीय विद्यार्थ्याने तक्रार दिली आहे.

तक्रारदार विद्यार्थी हा आयएलएस लॉ कॉलेजमध्ये एलएलबी द्वितीय वर्षात शिक्षण घेत असून तो लॉ कॉलेज रोडवरील मुलांच्या वसतिगृहात राहतो. त्याच वसतिगृहात राहणाऱ्या आणि द्वितीय वर्षात शिकणाऱ्या पाच विद्यार्थ्यांनी त्याला शिवीगाळ तसेच मानसिक त्रास देत रॅगिंग केल्याची विद्यार्थ्याची तक्रार आहे. या प्रकारामुळे त्रस्त झालेल्या विद्यार्थ्याने काही महिन्यांपूर्वी डेक्कन पोलिसांकडे लेखी अर्ज दिला होता.

## महत्त्वाचे

### भूसुरुंग हटवण्यास लागणार सहा महिने

**वॉशिंग्टन :** मध्यपूर्वेतील संघर्षादरम्यान, इराणने होर्मुझ सामुद्रधुनीत पेरलेले भूसुरुंग हटवण्याची प्रक्रिया अमेरिकन लष्कर आणि नौदलाकडून सुरू आहे. यासाठी सहा महिन्यांचा काळ लागणार असून, तोपर्यंत हा मार्ग जहाजांसाठी बंद राहणार असल्याची माहिती अमेरिकन संरक्षण विभागाच्या एका अधिकाऱ्याने दिली. भूसुरुंगामुळे होर्मुझ सामुद्रधुनीत अत्यंत धोकादायक बनवली आहे. खुद्द इराणी लष्करालाही भूसुरुंगांची नेमकी ठिकाणे माहीत नाहीत. अमेरिकी लष्कर आता विशेष जहाजांचा वापर करून भूसुरुंग काढण्याच्या मोहिमेत गुंतले आहे. पेंटागॉनने म्हटले की, भूसुरुंग हटवण्याची प्रक्रिया अतिशय कठीण असून, त्यासाठी सहा महिन्यांपर्यंतचा कालावधी लागू शकतो. अमेरिकन नौदलाकडे सध्या पश्चिम आशियामध्ये भूसुरुंग शोधण्यास सक्षम असलेली दोन किनारी लढाऊ जहाजे आहेत. जपानमध्ये तैनात असलेली दोन अमेरिकन एव्हेंजर-श्रेणीची सुरुंगशोधक जहाजे देखील पश्चिम आशियासाठी रवाना झाली आहेत. अमेरिकन सैन्य सध्या होर्मुझमध्ये आपली युद्धनौका वापरत आहे की नाही, याचा कोणताही संकेत नाही.

# लष्करचा कमांडर अफ्रिदीचा खात्मा

**इस्लामाबाद, २६ एप्रिल**



पाकिस्तानात अज्ञाताने केलेल्या गोळीबारात दहशतवादी संघटना लष्कर-ए-तोयबाचा टॉप कमांडर शेख युसूफ अफ्रिदीचा खात्मा झाला. अफ्रिदी हा खैबर पख्तूनख्वा प्रांतातील लष्करचा प्रमुख होता. अज्ञात हल्लेखोरांनी त्याला क्षणात यमसदनी पाठविले.

पाकिस्तानातील दहशतवाद्यांमध्ये सध्या अज्ञाताची जबरदस्त दहशत आहे. हल्ला करणारी ही व्यक्ती दहशतवाद्यांसाठी अक्षरशः कर्दनकाळ ठरत आहेत. अज्ञात बंदूकधाऱ्यांनी लष्कर-ए-तोयबाचा टॉप कमांडर शेख युसूफ अफ्रिदीवर गोळीबार केला. यात तो गंभीर जखमी झाला. त्याला तत्काळ रुग्णालयात हलविण्यात आले. उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाल्याची माहिती वृत्तसंस्थेने दिली आहे. विशेष असे की, दहशतवाद्यांवर अज्ञात हल्ले करणारे कुठूण येतात आणि कुठे गायब होतात हे अद्यापही कळू शकलेले नाही. त्यामुळे कधी काळी छाती फुगवून वावरणारे हे दहशतवादी आता स्वतःच दहशतीत वावरत आहेत. भारताच्या शत्रूंचा एक-एक करून खात्मा होत असताना दुसरीकडे दहशतवाद्यांवर होणाऱ्या गोळीबारामुळे पाकिस्तानी लष्कराची आणि गुप्तचर यंत्रणांची झोप उडाली आहे. *(वृत्तसंस्था)*

# 'चारमिनार'ला आग

## प्रवाशांनी धावत्या ट्रेनमधून मारल्या उड्या

**भुवनगिरी, २६ एप्रिल**

तेलंगाणामधील यादद्री भुवनगिरी जिल्ह्यातील अलेर रेल्वे स्टेशनजवळ चारमीनार एक्स्प्रेसला आग लागली. ही आग ट्रेनच्या एस-५ या डब्यात लागली. अचानक आगीचे लोळ उठत असल्याचे दिसताच प्रवाशांमध्ये घबराट पसरली. तसेच काही प्रवाशांनी धावत्या ट्रेनमधून उड्या मारल्या.

डब्यामध्ये धूर पसरत असल्याचे दिसून येताच प्रवाशांमध्ये गोंधळ उडाला. दरम्यान, कुणीतरी आणीबाणीच्या परिस्थितीत वापरली जाणारी साखळी ओढल्याने ट्रेन थांबली. त्यामुळे प्रवाशांना सुखरूपपणे बाहेर पडण्याची संधी मिळाली. *(वृत्तसंस्था)*



# बंद घरावर चोरट्यांचा डल्ला

**रोख रकमेसह ३ लाखांचा ऐवज लंपास**

**टेंभुर्णी, दि. २६ एप्रिल-**

माढा तालुक्यातील मोडनिंब परिसरातील दत्तनगर येथे अज्ञात चोरट्याने बंद घर फोडून रोख रक्कम आणि सोन्याचे दागिने असा एकूण ३ लाख ५ हजार रुपयांचा ऐवज लंपास केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून नागरिकांमध्ये अस्वस्थता पसरली आहे. याबाबत फिर्यादी अनिता सुशिलकुमार शिंदे (वय ३६, रा. दत्तनगर, मोडनिंब, ता. माढा) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार २५ एप्रिल २०२६ रोजी दुपारी ३.०० ते रात्री ९.४५ या कालावधीत त्या घराला कुलूप लावून बाहेर गेल्या होत्या. याच संधीचा फायदा घेत अज्ञात चोरट्याने घराच्या मुख्य दरवाज्याचे कुलूप तोडून घरात प्रवेश केला.

घरात प्रवेश केल्यानंतर चोरट्याने कपाटातील ३५ हजार रुपये रोख रक्कम, दोन तोळ्यांचे सोन्याचे गंठन, अर्धा तोळ्याचा सोन्याचा नेकलेस, साखळी व पेंडल, सोन्याची अंगठी, तसेच कानातील दागिने आणि सोन्याचे मणी असा एकूण ३ लाख ५ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला. फिर्यादी घरी परतल्यानंतर घरातील सामान अस्ताव्यस्त पडलेले दिसून आल्याने चोरीचा प्रकार उघड झाला.

घटनेची माहिती मिळताच टेंभुर्णी पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला. या प्रकरणी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक प्रशांत मदने करीत आहेत.

# विदर्भावर 'रवि'वार; पारा @ ४६.९

**नागपूर :** विदर्भात उष्णतेचा अक्षरशः कहर सुरू आहे. दिवसेंदिवस तापमानात वाढ होत असून, एरवी वर्दळ राहणारे रस्ते दुपारी १२ वाजेपासूनच निर्मनुष्य होताना दिसत आहेत. रविवारी अकोला आणि अमरावती शहरात या वर्षातील सर्वाधिक तापमानाची नोंद झाली. या दोन्ही शहरांत अनुक्रमे ४६.९ आणि ४६.८ अंश इतक्या प्रचंड तापमानाची नोंद झाली असून, ही नोंद देशात सर्वाधिक मानली जात आहे. या दोन्ही शहरांच्या खालोखाल वर्धा शहराने ४६.४ अंश सेल्सिअस इतक्या तापमानाची नोंद केली.

# धाराशिव जिल्हा विकासाच्या वाटेवर : आ.राणाजगजितसिंह पाटील

## यमगरवाडी सेवा प्रकल्प येथे 'कृतज्ञता गौरव पुरस्कार' सोहळा





**तभा वृत्तसेवा,**
**धाराशिव, दि.२६ एप्रिल-**

एकेकाळी दुष्काळी जिल्हा म्हणून ओळखला जाणारा 'धाराशिव' आता विकासाच्या वाटेवर आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या विकासात्मक दृष्टीकोनामुळे हे शक्य होत आहे, असे प्रतिपादन आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी केले. तुळजापूर तालुक्यातील मंगरुळ येथील एकलव्य विद्या संकुलात 'कृतज्ञता गौरव पुरस्कार' सोहळ्यात ते बोलत होते. दैनिक तरुण भारततर्फे संघ शताब्दी वर्षानिमित्त हा कार्यक्रम पार पडला.

आमदार राणाजगजितसिंह पाटील पुढे म्हणाले की, समाजातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना सन्मानित करण्याचा 'कृतज्ञता गौरव पुरस्कार' हा उपक्रम सामाजिक जाणीव वाढवणारा आणि प्रेरणादायी आहे. समाजाच्या विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींमुळेच समाज प्रगतीपथावर जातो, भविष्यातही अशा सेवाभावी आणि प्रेरणादायी कार्याची परंपरा अधिक बळकट होईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

यावेळी दै.तरुण भारत समूहाचे संपादक दिलीप पेठे, मुख्य संपादक प्रशांत माने, प्रकाशक दिलीप दुलंगे, मराठवाडा आवृत्ती विभाग प्रमुख राजाराम मस्के, व्यवस्थापक विनायक पुल्ला, तुळजापूरचे नगराध्यक्ष विनोद गंगणे, नळदुर्गचे नगराध्यक्ष बसवराज धरणे, तालुका संघ चालक अनिल जाधव, पं.स.चे माजी उपसभापती चित्तरंजन सरडे यांच्यासह विठ्ठल म्हेत्रे, गणेश पुजारी, अनंत कोंडो, गुलचंद व्यवहारे, बाबा घोंगते, सचिन अमृतराव, सिध्देश्वर तानवडे आदी उपस्थित होते. दै.तरुण भारत धाराशिव जिल्हा प्रतिनिधी अनिल आगलावे यांनी प्रास्ताविक तर विशाल सूर्यवंशी यांनी सूत्रसंचालन केले. दिनेश सलगरे यांनी आभार मानले.

### यांचा झाला गौरव

* विनोद गंगणे : नगराध्यक्ष, तुळजापूर
* महादेवराव गायकवाड : सेवा प्रकल्प योगदान
* चंद्रकांत गडेकर : सेवा प्रकल्प योगदान
* गणेश जळके : अ.भा.विद्यार्थी परिषद कार्य
* बाळासाहेब शामराज : भाजप संघटन कार्य
* महेंद्र कावरे : डॉ.हेडगेवार रक्त संकलन सेवा
* गणेश सदाफुले : गोपालन सेवा
* व्यंकट सिंदफळे : सेंद्रिय शेती व्यवस्थापन
* अश्विनी अनंत कोंडो : भगवद्गीता प्रसार
* अंबादास पोफळे : जेष्ठ पत्रकार, तुळजापूर
* विशाल सूर्यवंशी : आदर्श शिक्षक व वक्ते



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### नऊ राज्यांमध्ये वादळी पावसाचा इशारा

**नवी दिल्ली** : देशात धोकादायक उष्णतेच्या लाटेमुळे पुन्हा एकदा वादळी पाऊस पडण्याची शक्यता आहे. हवामान विभागाच्या माहितीनुसार, सोमवारी उत्तर प्रदेश आणि बिहारसह ९ राज्यांमध्ये मेघगर्जनेसह मुसळधार पाऊस, गारपीट आणि वादळाचा इशारा देण्यात आला आहे. तसेच वादळामुळे पूर्व आणि डोंगराळ राज्यांमधील अनेक जिल्ह्यांतील लोकांना अडचणींचा सामना करावा लागू शकतो, असा इशाराही देण्यात आला आहे. हवामान विभागानुसार, पूर्व उत्तर प्रदेश आणि आसपासच्या भागांवर खालच्या ट्रोपोस्फियरमध्ये चक्रीय वाऱ्यांची स्थिती तयार होत आहे. याव्यतिरिक्त, ईशान्य झारखंड आणि आसपासच्या भागांवर खालच्या ट्रोपोस्फियरमध्ये चक्रीय वाऱ्यांची स्थिती आहे. त्यामुळे २७ एप्रिलला ९ राज्यांमध्ये मुसळधार पावसासह वादळाची शक्यता आहे. यात उत्तर प्रदेश, पंजाब, हरियाणा, उत्तराखंड, राजस्थान, बिहार, झारखंड आणि पश्चिम बंगालंचा समावेश आहे. वादळी वारे ताशी ७५ किमी वेगाने वाहण्याची शक्यता असल्याने शेतकऱ्यांनी सावधगिरी बाळगणे आवश्यक आहे. ■

# इस्लामी कट्टरवाद्यांचा धुडगूस

## मालीत दहशतवादी हल्ल्यात संरक्षण मंत्री ठार ● शेकडो जखमी



◆ **जोहान्सबर्ग, २६ एप्रिल**

आफ्रिकन देश मालीमध्ये अल-कायदाशी संबंधित इस्लामी कट्टरवाद्यांनी रविवारी अनेक ठिकाणी हल्ले चढवत जाळपोळ आणि गोळीबार केला. यात देशाचे संरक्षण मंत्री सादियो कामारा यांचा मृत्यू झाला तर, शेकडो नागरिक जखमी झाले.

राजधानी बामाकोच्या आसपास झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर देशात हिंसाचार सुरू असून, तणाव वाढला आहे. संयुक्त राष्ट्राने या घटनेबद्दल चिंता व्यक्त केली. अल-कायदाशी संबंधित दहशतवादी संघटना आणि तुआरेग बंडखोरांनी देशाच्या अनेक भागांमध्ये एकाच वेळी हल्ले केले. राजधानी बामाकोजवळ असलेल्या संरक्षण मंत्री सादियो कामारा यांच्या निवासस्थानावर झालेल्या हल्ल्यात त्यांचा आणि सुरक्षा रक्षकांचा मृत्यू झाल्याची पुष्टी अधिकाऱ्यांनी केली. भारत सरकारने आपल्या नागरिकांच्या सुरक्षेसाठी सूचना जारी केली असून, त्यांना घरातच राहण्याचा आणि स्थानिक प्रशासनाच्या आदेशांचे पालन करण्याचा सल्ला दिला आहे. ◂(वृत्तसंस्था)

### विमानतळ परिसरातही गोळीबार

मालीची राजधानी बामाको आणि इतर शहरांमध्ये इस्लामी कट्टरवादी आणि बंडखोरांनी हल्ले केले. अल-कायदाशी संबंधित दहशतवादी गट असलेल्या जकात नसर अल-इस्लाम वल-मुस्लिमीनने हल्ल्याची जबाबदारी स्वीकारली आहे. बामाको येथील आंतरराष्ट्रीय विमानतळ तसेच, मध्य आणि उत्तर मालीतील इतर चार शहरांवर हल्ले करण्यात आले. यामुळे देशात अराजकतेची परिस्थिती निर्माण झाली आहे. ■

# कोलंबियात बॉम्बस्फोट, २२ ठार, ४५ जखमी

◆ **बोगोटा, २६ एप्रिल**

कोलंबियाच्या काउका प्रांतात बसमध्ये झालेल्या बॉम्बस्फोटात २२ जण ठार आणि ४५ हून अधिक जण जखमी झाले. अधिकाऱ्यांनी दहशतवादी हल्ल्याची पुष्टी केली आहे. इव्हान मॉर्डिस्को आणि जेमी मार्टिनेझ या बंडखोरांनी हल्ला केल्याचा संशय आहे.

नैऋत्य कोलंबियामध्ये शनिवारी भरधाव बसमध्ये स्फोट झाला. बचावपथकाने घटनास्थळी धाव घेत जखमींना रुग्णालयात हलविले. वैद्यकीय अधिकाऱ्यांनी २२ प्रवाशांना मृत घोषित केले, तर ४५ पेक्षा अधिक जणांवर उपचार सुरू केले. काउका प्रांताचे गव्हर्नर ऑक्टाव्हियो गुझमन यांनी सांगितले की, हा स्फोट काजिबियो येथील पॅन-अमेरिकन महामार्गावर झाला. ◂(वृत्तसंस्था)

# ममतांचे विश्वासू अधिकारी भाजपाचा चेहरा




**श्यामकांत जहागीरदार**

◆ **नवी दिल्ली, २६ एप्रिल**

काँग्रेसचा आसामचा गड ध्वस्त करण्यासाठी भाजपाने काँग्रेसचे तेथील शिलेदार हिमंता बिस्व सरमा यांना फोडून आपल्या बाजूने वळविले. तोच प्रयोग पश्चिम बंगालमध्ये भाजपाने तृणमूल काँग्रेसचा आघाडीचा मोहरा सुवेंदू अधिकारी यांना आपल्या पक्षात आणून चालवला आहे.

२०२१ च्या विधानसभा निवडणुकीत भाजपाला तृणमूल काँग्रेसला सत्तेवर येण्यापासून रोखता आले नसले तरी त्या पक्षाच्या सर्वेसर्वा ममता बॅनर्जी यांचा पराभव करता आला. आणि हा पराभव सुवेंदू अधिकारी यांनीच करीत भाजपाच्या अपेक्षापूर्तीच्या दिशेने पहिले आश्वासक पाऊल टाकले. यावेळी पुन्हा एकदा भवानीपूर मतदारसंघात मुख्यमंत्री ममता बॅनर्जी आणि विरोधी पक्षनेते सुवेंदू अधिकारी अशी लढत होत आहे.

अधिकारी एकेकाळी ममता बॅनर्जी यांचे विश्वासू सहकारी होते, त्यामुळे ममता बॅनर्जी यांच्या राजकारणातील चालीची त्यांना पूर्ण कल्पना आहे. ममता बॅनर्जी कसे राजकारण करतात, प्रतिस्पर्ध्यांना कसे पराभूत करताता, जनतेला आपल्या बाजूला कसे आकर्षित करतात, यातील सर्व खाचखळगे सुवेंदू अधिकारी यांना माहित आहे. अधिकारी यांनीही आपले राजकारण काँग्रेस पक्षातून सुरु केले. १९९५ ते १९९८ या काळात ते काँग्रेसमध्ये होते. १९९७ मध्ये तृणमूल काँग्रेसची स्थापना झाल्यावर ते ममता बॅनर्जी यांच्या तृणमूल काँग्रेसमध्ये आले आणि त्यांचे निष्ठावंत सहकारी झाले. २००९ च्या लोकसभा निवडणुकीत ते तृणमूल काँग्रेसचे उमेदवार म्हणून विजयी झाले. २०१४ ची लोकसभा निवडणूक त्यांनी तृणमूल काँग्रेसतर्फे याच मतदारसंघातून लढवली आणि जिंकली. खासदार असतांना २०१६ च्या राज्यातील विधानसभा निवडणुकीत ममता बॅनर्जी यांनी त्यांना उतरवले, या निवडणुकीत ते विजयी झाले. आमदार म्हणून विजयी झाल्यावर त्यांनी खासदारकीचा राजीनामा दिला. ममता बॅनर्जी यांनी त्यांचा आपल्या मंत्रिमंडळात समावेश केला. मात्र काही दिवसांनी त्यांचे ममता बॅनर्जी यांच्याशी मतभेद झाले. २७ नोव्हेंबर २०२० ला त्यांनी ममता बॅनर्जी यांच्या मंत्रिमंडळातून राजीनामा दिला. काही दिवसांनी त्यांनी आमदारकीचा राजीनामा दिला. सुरुवातीला त्यांचा राजीनामा तांत्रिक कारणामुळे स्वीकारला गेला नाही. पण नंतर मात्र तो मान्य करण्यात आला. नंतर त्यांनी तृणमूल काँग्रेसच्या सदस्यत्वाचाही राजीनामा देत भाजपातही प्रवेश केला. ■

# बंगालमधील परिवर्तनाचे नायक?

◆ **नवी दिल्ली, २६ एप्रिल**

२०२१ च्या विधानसभा निवडणुकीत भाजपाने सुवेंदू अधिकारी यांना ममता बॅनर्जी यांच्या विरोधात नंदीग्राम मतदारसंघातून उमेदवारी दिली. भाजपाचा हा निर्णय अचूक ठरला. अधिकारी यांनी मुख्यमंत्री असलेल्या ममता बॅनर्जी यांचा पराभव करत ममतांना आणि त्यांच्या पक्षालाही जबर धक्का दिला. भाजपाने विरोधी पक्षनेते म्हणून त्यांची निवड केली.

यावेळी पुन्हा हे दोन्ही दिग्गज नेते भवानीपूर मतदारसंघात एकदुसऱ्याविरुध्द निवडणूक रिंगणात उतरले आहेत. यावेळी पुन्हा एकदा सुवेंदू अधिकारी ममता बॅनर्जी यांचा पराभव करतात, की ममता आपल्या नंदीग्राममधील पराभवाचा बदला घेतात, याकडे लक्ष लागले आहे.

भवानीपूरमध्ये सुवेंदू अधिकारी उमेदवारी अर्ज भरत असतांना केंद्रीय मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी त्यांचा उल्लेख बंगलमधील परिवर्तनाचे नायक, असा केला. सुवेंदू अधिकारी राज्यातील ज्येष्ठ नेते आणि डॉ. मनमोहनसिंग मंत्रिमंडळातील मंत्री शिशिर अधिकारी यांचे पुत्र आहेत. १९९५ मध्ये सुवेंदू अधिकारी काँग्रेसचे नगरसेवक म्हणून कांथी नगरपरिषदेत निवडून आले. २००६ मध्ये पहिल्यांदा ते कांथी दक्षिण मतदारसंघातून विधानसभेवर निवडून आले. विशेष आर्थिक क्षेत्र प्रकल्पासाठी १० हजार एकर जमीन अधिग्रहित करण्याचा निर्णय डाव्या आघाडीच्या सरकारने घेतला त्याला सुवेंदू अधिकारी यांनी विरोध करत आंदोलन छेडले. ममता बॅनर्जींची राज्यातील ताकद अशा आंदोलनामुळेच वाढली.ज्या नंदीग्राम मतदारसंघात सुवेंदू अधिकारी यांना ममता बॅनर्जी यांनी उमेदवारी दिली, त्याच नंदीग्राम मतदारसंघात २०२१ मध्ये अधिकारी यांनी ममतांचा पराभव केला. ◂(तभा वृत्तसेवा)

# खराब हवामानामुळे विमान ४० मिनिटे हवेतच

◆ **हुबळी, २६ एप्रिल**

प्रादेशिक विमान कंपनी फ्लाय-९१ चे तेलंगणातील हैदराबादहून कर्नाटकातील हुबळीला जाणारे विमान खराब हवामानामुळे ४० मिनिटे घिरट्या घातल्यानंतर खाली उतरण्यास भाग पडले. यादरम्यान, प्रवासी भयभीत झाले होते. ही घटना शनिवारी घडली. गत तीन दिवसांत दोनदा विमान उतरण्यास विलंब झाला आहे. तिसऱ्यांदा विमान शनिवारीही विमान उशिरा उतरले.

अलीकडेच, हैदराबादहून हुबळीला जाणाऱ्या फ्लाय९१ विमानाला खराब हवामानामुळे विमान उतरवताना अडचणी आल्या. विमान चार तास हवेतच राहिले आणि नंतर बंगळूरुमध्ये सुरक्षितपणे उतरले. यानंतर, गत मंगळवारी हेच विमान दोन तास उशिरा उतरले होते. यावेळी, हुबळी विमानतळावर उतरणारे विमान ४० मिनिटे हवेतच राहिले. त्यामुळे प्रवासी भयभीत झाले.

**वारंवार लँडिंगच्या समस्या**

फ्लाय ९१ च्या विमानाला पुन्हा एकदा लँडिंगची समस्या आली. खराब हवामानामुळे हैदराबादहून हुबळीला जाणारे विमान काही वेळ घिरट्या घालत राहिले. गत आठवड्यातही अशाच प्रकारच्या लँडिंगच्या समस्या दोनदा उद्भवल्या होत्या. फ्लाय ९१ चे विमान आयसी ३४०१ लँडिंगच्या समस्येत सापडले आहे. ◂(वृत्तसंस्था)



महाराष्ट्राचे आदिवासी विकास मंत्री प्रा. डॉ. अशोक उईके यांनी रविवारी नागपूर येथील तरुण भारतच्या कार्यालयाला सदिच्छा भेट दिली. श्री नरकेसरी प्रकाशन संस्थेचे प्रबंध संचालक धनंजय बापट यांनी प्रा. उईके यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. याप्रसंगी मुख्य संपादक शैलेश पांडे उपस्थित होते. प्रा. उईके यांनी आदिवासी विकास विभागाच्या आतापर्यंतच्या कामगिरीची माहिती देतानाच भविष्यातील योजनांचा ऊहापोह केला.

# इराणचे तेल घेऊन जाणारे टँकर रोखले

## अरबी समुद्रात अमेरिकेचा थरार; आतापर्यंत ३७ जहाजे पाठविली परत

◆ **दुबई, २६ एप्रिल**

अमेरिकेच्या सेंट्रल कमांडने रविवारी अरबी समुद्रात इराणी तेल वाहून नेणाऱ्या सेवान या निर्बंध लादलेल्या तेल टँकरला अडवले. तेल टँकर इराणी तेल आणि वायू परदेशात वाहून नेणाऱ्या १९ जहाजांच्या शॅडो फ्लीटचा भाग होते. युएसएस पिन्कनीवरील एका हेलिकॉप्टरने हे जहाज अडवले आणि माघारी पाठवले.



शॅडो फ्लीट हा १९ जहाजांचा समूह आहे, हे इराणचे तेल आणि वायू जगभरातील इतर देशांमध्ये पोहोचवतो. या सर्व जहाजांवर अमेरिकेने निर्बंध लादले आहेत. ही जहाजे इराणमधून इतर देशांमध्ये तेल, वायू, प्रोपेन आणि ब्युटेन यांसारख्या अब्जावधी डॉलर्स किमतीच्या उत्पादनांची वाहतूक करत असल्याची माहिती अमेरिकेच्या एका अधिकाऱ्याने दिली. इराण निर्बंधांना बगल देण्यासाठी आणि आपला तेल व्यापार सुरू ठेवण्यासाठी या जहाजांचा वापर करतो. ही जहाजे इराणची अर्थव्यवस्था मजबूत करण्यास मदत करत असल्यामुळे रविवारी कारवाई करण्यात आली.

ही कारवाई अमेरिकेच्या नौदलाच्या यूएसएस पिन्कनी या मार्गदर्शित क्षेपणास्त्र विनाशक नौकेतील हेलिकॉप्टरने केली. इराणी जहाजाला अमेरिकेच्या लष्करी निर्देशांचे पालन करण्याचे निर्देश दिले. गोळीबाराचा इशारा दिल्यानंतर इराणी तेल टँकरने मार्ग बदलला आणि ते माघारी परतले. अमेरिकेच्या सेंट्रल कमांडने सांगितले की, नाकाबंदी सुरू झाल्यापासून इराणची ३७ जहाजे दुसऱ्या मार्गाने वळवण्यात आली आहेत. ◂(वृत्तसंस्था)

# घुसखोरांना ममताही वाचवू शकणार नाहीत

## पंतप्रधान मोदींचे बंगालच्या जनतेला आश्वासन

◆ **बंगाओन, २६ एप्रिल**

पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ममता बॅनर्जी सरकारविरोधात जोरदार हल्लाबोल केला. बंगाओन येथील सभेत त्यांनी घुसखोरांना थेट इशाराच दिला. २९ एप्रिल पूर्वी बंगाल सोडा, अन्यथा ४ तारखेनंतर कारवाई केली जाईल, असे ते म्हणाले.




ममता बॅनर्जी सरकार घुसखोरांना आश्रय देत असल्याचा आरोप करत पंतप्रधान मोदी पुढे म्हणाले, बंगालमध्ये भाजपा सत्तेवर आल्यानंतर प्रत्येक घुसखोराला बाहेरचा रस्ता दाखवला जाईल. तसेच मतुआ-नमशूद्र आणि इतर निर्वासित कुटुंबांना नागरिकत्व, पासपोर्ट आणि सर्व हक्क देण्याचे आश्वासनही दिले. ही मोदींची हमी आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

**महिलांसाठी मोठी घोषणा**

महिलांसाठी एक मोठी घोषणा करत मोदी पुढे म्हणाले, भाजपा सरकारच्या काळात महिलांच्या खात्यात दरवर्षी ३६,००० रुपये जमा केले जातील.

तसेच, अंगणवाडी आणि महिला आरोग्य कर्मचाऱ्यांच्या पगारातही सुधारणा केली जाईल. याशवाय बंगालमधील सर्व सरकारी नोकऱ्यांमध्ये ३३ टक्के आरक्षण देण्यात येईल. त्यामुळे महिलांना दुहेरी फायदा होईल, असेही ते म्हणाले. ◂(वृत्तसंस्था)

# छायाचित्र पत्रकारितेचे जनक रघू राय पडद्याआड

◆ **नवी दिल्ली, २६ एप्रिल**

प्रसिद्ध भारतीय छायाचित्रकार रघु राय यांचे वयाच्या ८३ व्या वर्षी निधन झाले आहे. ते गेल्या दोन वर्षांपासून प्रोस्टेट कर्करोगाशी झुंज देत होते. रविवारी दिल्लीतील एका खाजगी रुग्णालयात त्यांनी अखेरचा श्वास घेतला. त्यांनी जगामध्ये क्रांती घडवून आणणारी आणि जीवन बदलणारी छायाचित्रे टिपली. भोपाळ गॅस दुर्घटनेवरील छायाचित्रांमुळे त्यांची जगभरात चर्चा झाली.



त्यांच्यावर दुपारी ४ वाजता लोधी स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांचे पुत्र नितीन राय यांनी सांगितले की, दोन वर्षांपूर्वी त्यांना प्रोस्टेट कर्करोगाचे निदान झाले होते. उपचार सुरू असताना त्यांची प्रकृती खालावल्याने रविवारी सकाळी त्यांनी जगाचा निरोप घेतला. त्यांनी १९६० मध्ये आपल्या छायाचित्रण कारकिर्दीला सुरुवात केली आणि मोठ्या प्रदर्शनांमध्ये भाग घेतला. त्यांनी १८ हून अधिक पुस्तके प्रकाशित केली आहेत. १९७१ मध्ये त्यांना पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. भोपाळ दुर्घटनेदरम्यानचे त्यांचे एक छायाचित्र खूप प्रसिद्ध झाले. त्यामध्ये जमिनीवर पडलेल्या एका निष्पाप मुलाचा मृतदेह चित्रित करण्यात आला होता. यामुळे सार्वजनिक जीवनाप्रती कंपन्यांच्या जबाबदारीबद्दल जगभर चर्चा सुरू झाली. त्यांनी माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या जीवनातील अनेक क्षण छायाचित्रांमध्ये टिपले. त्यांची मदर तेरेसा यांची छायाचित्रेही बरीच प्रसिद्ध झाली. ◂(वृत्तसंस्था)




### शर्टलेस कार्यकर्ते आणि राहुल गांधी

**फेब्रुवारी** महिन्यात राजधानी दिल्लीत एआय परिषद झाली होती. ही परिषद त्यातील कामकाजापेक्षा युवक काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी केलेल्या शर्टलेस आंदोलनामुळे गाजली. जागतिक पातळीवर भारताची प्रतिमा मलिन करण्याच्या काँग्रेस कार्यकर्त्यांच्या या कृत्याचा देशभरातून निषेध झाला. परिषदेच्या कामकाजात अडथळा आणणाऱ्या या काँग्रेस कार्यकर्त्यांना पोलिसांनी अटकही केली, पण त्याआधी परिषदेला उपस्थित प्रतिनिधींनी या काँग्रेस कार्यकर्त्याची चांगलीच कणिक तिंबली. पोलिसांनीही पोलिस कोठडीत त्यांचा चांगला पाहुणचार केला. जवळपास दोन महिने तुरुंगात राहावे लागल्यानंतर या कार्यकर्त्यांची जामिनावर सुटका झाली. या दोन महिन्यांच्या काळात कूठून आपल्याला आंदोलनाची दुर्बुद्धी झाली, असे या कार्यकर्त्यांना राहूनराहून वाटले असावे.

जामिनावर सुटका झालेल्या या कार्यकर्त्यांची लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी नुकतीच भेट घेतली. युवक काँग्रेस कार्यकर्त्यांच्या हिंमतीचे कौतुक करीत राहुल गांधींनी त्यांच्यासोबत छायाचित्रही काढून घेतले आणि पक्ष त्यांच्या पाठीशी असल्याचा निर्वाळा दिला. एवढेच नाही तर, राहुल गांधींनी प्रत्येक कार्यकर्त्यांसोबत वेगळे छायाचित्र काढून घेतले. यामुळे आपण घेतलेल्या मेहनतीचे चीज झाल्याचे समाधान त्या कार्यकर्त्यांना वाटले असावे. पोलिसांच्या पाहुणचारात या काँग्रेस कार्यकर्त्यांच्या शरीरावर तसेच मनावर जखमा झाल्या असल्या तरी त्यावर राहुल गांधींच्या या कृतीने हळुवार फुंकर घातल्या गेली. एकप्रकारे मलमपट्टी झाली. पक्षाने आपल्याला वाऱ्यावर सोडले नाही, आपल्या आंदोलनाची दखल घेतली, याचे समाधान त्यांना मिळाले. राहुल गांधींच्या प्रोत्साहनामुळे यावेळी शर्टलेस आंदोलन केले, पुढच्यावेळी पॅण्टलेस आंदोलन करण्याची जिद्द त्यांच्यात आता निर्माण झाली असावी.

●● ●●

### जॉन ब्रिटास आणि खडगे यांची जुगलबंदी

**केरळमधील** विधानसभा निवडणुकीमुळे इंडिया आघाडीत असलेल्या काँग्रेस आणि माकप यांच्यातील संबंधात काहिसा तणाव आला आहे. विशेष म्हणजे, हा तणाव केरळमध्ये जास्त प्रमाणात जाणवत असला तरी, दिल्लीतही त्याची तीव्रता बऱ्यापैकी आहे. संसदेचे अधिवेशन संस्थगित झाल्यानंतर राज्यसभेचे अध्यक्ष सी. पी. राधाकृष्णन यांनी सर्वपक्षीय बैठक बोलावली. या बैठकीला उपस्थित राहण्यासाठी येत असताना राज्यसभेतील विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खडगे आणि माकपचे सभागृहातील गटनेते जॉन ब्रिटास समोरासमोर आले. महिला आरक्षणासंदर्भातील घटनादुरुस्ती विधेयकावर दिलेल्या पाठिंब्यासाठी खडगे यांनी ब्रिटास यांचे आभार मानले. प्रत्युत्तरादाखल ब्रिटास यांनीही खडगे यांना धन्यवाद दिले. मात्र, त्यांनी खडगे यांना कानपिचक्याही दिल्या. तुमच्या पक्षाची दिल्लीतील वागणूक सभ्यपणाची आणि शालिनतेची असते; मात्र केरळमध्ये ती एकदम बदलून जाते, हिंसक होते, असे ब्रिटास म्हणाले. केरळमध्ये निवडणुकीदरम्यान दोन पक्षांत झालेल्या हिंसक संघर्षाची पृष्ठभूमी ब्रिटास यांच्या या विधानामागे होती. त्यामुळे खडगे यांना कोणतीही प्रतिक्रिया व्यक्त करता आली नाही. त्याचवेळी सोनिया गांधी समोर आल्या. सोनिया गांधी या सभ्य आणि सोज्वळ नेत्या आाहेत. अन्य विरोधी पक्षांशी त्यांची वागणूक नेहमीच सौहार्दपूर्ण असते, असे ब्रिटास म्हणाले. विशेष म्हणजे, यावेळी प्रकृती अस्वास्थ्यामुळे सोनिया गांधी केरळमध्ये निवडणूक प्रचाराला गेल्या नव्हत्या. त्यामुळे त्यांनी माकपवर टीका केली नाही. राज्यसभेचे अध्यक्ष राधाकृष्णन् यांनी या वादात मध्यस्थी करीत, तुम्ही केरळमध्ये भांडा, येथे नाही, असे म्हणत वातावरण हलकेफुलके करण्याचा यशस्वी प्रयत्न केला.

●● ●●

### सिलोन पराठा आणि डॉ. जितेंद्रसिंह

**मोदी** सरकारमधील मंत्री डॉ. जितेंद्रसिंह हे अतिशय निष्णात असे डॉक्टर आहेत. ते पीएचडी डॉक्टर नाही, तर एमबीबीएस डॉक्टर आहेत. राजधानी दिल्लीत नुकताच पुस्तक प्रकाशनाचा एक कार्यक्रम झाला. डॉ. अनुप मिश्रा यांनी हे पुस्तक लिहिले होते आणि डॉ. जितेंद्रसिंह त्या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. सारख्याच वस्तू देऊन काही जणांना एक पराठा बनवायला दिला, तर तो पराठा १२० पासून ३५० कॅलरीपर्यंतचा होऊ शकतो, असे डॉ. मिश्रा यांनी आपल्या भाषणात म्हटले. याला सहमती दर्शवत डॉ. जितेंद्रप्रसाद यांनी आपल्या कॉलेज जीवनातील एक अनुभव सांगितला. मद्रासच्या स्टॅनले वैद्यकीय महाविद्यालयात शिकत असताना काही श्रीलंकन सहाध्यायांसोबत आम्ही मद्रास हायकोर्टाजवळ असलेल्या एका प्रसिद्ध रेस्टॉरंटमध्ये जात होतो. त्याठिकाणी सिलोन पराठा मिळायचा. काही दिवसांनी माझ्या लक्षात आले की, माझे श्रीलंकन मित्र तसाच सिलोन पराठा करायला शिकले आहेत, असा आपला अनुभव त्यांनी सांगितला.

●● ●●

### निवडणूक गीतातून मनोज तिवारी यांचा प्रचार

**पश्चिम बंगालमधील** विधानसभा निवडणुकीत पहिल्या टप्प्याचे मतदान आटोपले आहे. दुसऱ्या टप्प्याचे मतदान २९ एप्रिलला आहे. भाजपाने आपले केंद्रीय मंत्री, देशभरातील नेते, खासदार आणि आमदार यांना प्रचारात उतरवले आहे. दिल्लीतील खासदार मनोज तिवारी यांच्यावरही बंगालमध्ये प्रचाराची जबाबदारी सोपवण्यात आली. तिवारी सध्या भाजपा खासदार असले तरी त्याआधी ते भोजपुरी चित्रपटातील प्रसिद्ध आणि लोकप्रिय अभिनेते आणि गायकही आहेत. त्यामुळे कुठेही प्रचाराला गेले की, त्यांना भोजपुरी गाणे म्हणण्याची विनंती केली जाते. तिवारी पण ही विनंती सहर्ष मान्य करतात. मांग रही बंगाल की धरती, हो जाओ तय्यार, पलटनोंकी दरकार, चाहिये बीजेपी सरकार, असे गाणे म्हणत तिवारी आपल्या भाषणातून भाजपाचा प्रचार करतात. तिवारी यांनी हे गीत सुरू केले की, उपस्थित कार्यकर्ते आणि जनताही उत्स्फूर्त साथ देते आणि चांगली वातावरण निर्मिती होते. त्यामुळे तिवारींचा छोटा प्रचारही परिणामकारक ठरतो.

● **दिल्लीवाला**

# आधी वनरक्षकावर हल्ला, नंतर वाघीणच आढळली मृत!

## सिंदेवाही तालुक्यातील रत्नापूर येथील घटना

◆ **नवरगाव/सिंदेवाही, २६ एप्रिल**

सिंदेवाही तालुक्यातील रत्नापूर येथे वनरक्षकावर हल्ला करून जखमी केल्यानंतर वाघिणीचाही शेतशिवारात मृत्यू झाल्याने खळबळ उडाली आहे.

रत्नापूर येथील शंकरपटाच्या दाणीजवळ दामोदर गनबाजी लोधे यांचे शेत आहे. ही वाघीण आपल्या तीन बछड्यांसह शिवटेकडी नजीक बऱ्याच दिवसांपासून वास्तव्यास होती. तिचे दर्शन बऱ्याच गावकऱ्यांना झाले. तिचा बंदोबस्त करण्यात यावा, अशी रत्नापूर, नवरगाव, नाचणभट्टी, मीनघरी व आजूबाजूच्या परिसरातील ग्रामस्थांची अनेक दिवसांपासून मागणी होती.

रत्नापूर परिसरात रविवारी दुपारी १२.३० वाजताच्या सुमारास मक्याच्या शेतामध्ये ही वाघीण भ्रमण करीत असल्याचे स्थानिक ग्रामवासीयांच्या निदर्शनास आले. तिला बघण्यासाठी लोकांनी गर्दी केली होती. दरम्यान, नाचणभट्टीचे वनरक्षक सज्जन पारेकर व सोबत असलेले वनमजूर दुपारी गस्त घालत असताना त्यांच्यावर या वाघिणीने हल्ला केला. त्या हल्ल्यात वनरक्षकाच्या पायाला व हाताला गंभीर इजा झाली. आजूबाजूच्या शेतशिवारातील ग्रामस्थ एकत्र येऊन वाघिणीला हुसकावून लावण्यासाठी प्रयत्न केला. पाठलाग केल्याने आणि उन्हाच्या तीव्रतेमुळे वाघीण थकलेली होती.



शेतशिवारात मृतावस्थेत आढळलेली वाघीण

पाण्याअभावी दामोदर लोधे यांच्या शेतशिवारात तिचा मृत्यू झाला असावा. मृत वाघिणीचे वय अंदाजे ९ ते १० वर्षे होते. दरम्यान, जखमी वनरक्षकाला चंद्रपूर येथील जिल्हा समान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. ◂(तभा वृत्तसेवा)



चुकीच्या पद्धतीने का होईना, संजय गायकवाड यांनी एका अत्यंत महत्त्वपूर्ण विषयाला, हात घालून राज्यात पुन्हा एकदा ''शिवाजी कोण होता?'' या विषयावर चर्चा सुरू करून दिली. त्याच बरोबर ''लोकप्रतिनीधी कसा नसावा'' यावरही चर्चा सुरू करून दिली.
**-सत्यजित तांबे**, आमदार


# तरुण भारत

न मे कर्मफले स्पृहा

सोमवार, २७ एप्रिल २०२६ ३


कोणीतरी येतो आणि आपल्या आराध्य दैवताबद्दल काहीतरी विकृत बरळतो, एक शिवप्रेमी-शिवभक्त म्हणून हे अमान्य आणि संतापजनक आहे. असले चौकटीत अडकवण्याचे फोल प्रयत्न काळाच्या उदरात गडप होतील.
**- रितेश देशमुख**, अभिनेता



### लिलावात मोडले सर्व विक्रम

**पनामा कालव्यातून जाण्यासाठी सामान्यतः एक निश्चित दर असतो, परंतु जे जहाज राखीव केले जात नाही. त्यांच्यासाठी प्राधिकरण लीलाव आयोजित करते. यात जो सर्वात मोठी बोली लावतो, त्याला प्राधान्याने मार्ग दिला जातो. होर्मुजमधील नाकाबंदीमुळे पनामा कालव्यावर जहाजांची संख्या इतकी वाढली आहे की, आता तेथे लांबच लांब वेटिंग लिस्ट तयार झाली आहे.**

**एका तेल टँकरसाठी ३७ कोटींची वसुली**

**जागतिक व्यापाराची समीकरणे बदलली**



# ‘होर्मुझ’मुळे पनामाला सुगीचे दिवस

### विना अडथळा पार करण्यासाठी देतात टॅक्स

**पनामा कालवा प्राधिकरणाने दिलेल्या माहितीनुसार, या मार्गावरून लवकरात लवकर पुढे जाण्यासाठी शिपिंग कंपन्यांनी ४० लाख डॉलर (सुमारे ३७ कोटी रुपये) पर्यंतची अतिरिक्त बोली लावली आहे. सरकारकडून अधिकृतरित्या वसुली केली जात नसली तरी, अप्रत्यक्षरीत्या जहाज कंपन्या मार्ग सुरक्षित पार करण्यासाठी पैसा देत आहेत.**

**◆ दुबई, २६ एप्रिल**

मध्यपूर्वेतील तणाव आणि होर्मुझ सामुद्रधुनीतून जहाजांची वाहतूक विस्कळीत झाल्याने भारतासह जगातील अनेक देश तेल संकटाचा सामना करत आहेत. तेल पुरवठ्यावरुन अनेक देश चिंताग्रस्त असताना पश्चिम आशियातील पनामा या चिमुकल्या राष्ट्राला मोठा फायदा झाला आहे. पश्चिम आशियातील युद्ध आणि होर्मुजच्या सामुद्रधुनीतील नाकाबंदीमुळे जागतिक व्यापाराची समीकरणे बदलली आहेत. पनामा सरकार या जागतिक संकटाचा फायदा घेत एका तेल टँकरसाठी ३७ कोटींची वसुली करून प्रचंड कमाई करत आहे.

जगातील एकूण तेल वापरापैकी सुमारे २० टक्के हिस्सा होर्मुजच्या सामुद्रधुनीतून होतो. पनामा कालवा आणि होर्मुज सामुद्रधुनी या दोन्ही जगातील अत्यंत महत्त्वाच्या सागरी व्यापारी मार्गांपैकी एक आहेत. दीड महिन्यापेक्षा अधिक काळ इराण आणि अमेरिका यांच्यातील लष्करी संघर्षामुळे हा मार्ग पूर्णपणे असुरक्षित झाला आहे. अशा परिस्थितीत, अमेरिकेच्या मेक्सिको आखातातून आशियाकडे जाणारा पनामा कालवा हाच सर्वात सुरक्षित मार्ग जहाज कंपन्यांसाठी उरला आहे. अनेक मालवाहू जहाजे सुरक्षिततेसाठी अटलांटिक आणि पॅसिफिक महासागरातील मार्गांचा वापर करतात, ज्याचा केंद्रबिंदू पनामा कालवा आहे.तेल आणि वायू वाहून नेणारी जहाजे आता मोठ्या संख्येने पनामा कालव्याकडे वळत आहेत, ज्यामुळे तेथील सरकारला प्रती जहाजामागे ३७ कोटींची कमाई होत आहे. *(वृत्तसंस्था)*

### सुरक्षित पर्याय म्हणून निवडला मार्ग

**पनामा कालव्याचे प्रशासक रिकाउर्ते वास्क्वेज यांनी सांगितले की, एका इंधन वाहू जहाजाने आपले मुक्कामाचे स्थान बदलण्यासाठी आणि लवकर पोहोचण्यासाठी ४० लाख डॉलरची अतिरिक्त बोली लावली. हे जहाज युरोपला जात होते, परंतु इंधनाच्या कमतरतेमुळे ते सिंगापूरच्या दिशेने वळवण्यात आले. इराण आणि अमेरिका यांच्यातील तणावामुळे कंपन्या पनामा कालव्याला सुरक्षित पर्याय मानत आहेत.**

# दोन महिन्यांपासून इराणमध्ये इंटरनेट ठप्प

**◆ तेहरान, २६ एप्रिल**

अमेरिका-इस्रायलने हल्ले सुरू केल्यापासून इराणमध्ये इंटरनेट सेवा ठप्प आहे. देशात इंटरनेट बंद होऊन ५७ दिवस झाले असून, हा एक जागतिक विक्रम आहे. युद्ध आणि अंतर्गत सुरक्षेच्या नावाखाली लादलेल्या बंदीमुळे देशाच्या अर्थव्यवस्थेचे मोठे नुकसान झाले आहे आणि नागरिकांना त्यांच्या माहितीच्या मूलभूत हक्कापासून वंचित ठेवले आहे. इंटरनेट बंद असल्यामुळे दररोज ३.७ अब्ज रुपयांच नुकसान होत असल्याची माहिती समोर आली.

इंटरनेट मॉनिटरिंग संस्था नेटब्लॉक्सच्या अहवालानुसार, इराणमध्ये गेल्या ५७ दिवसांपासून इंटरनेट पूर्णपणे बंद आहे. कोणत्याही देशात लादलेली ही जगातील सर्वात मोठी देशव्यापी इंटरनेट बंदी ठरली आहे. या बंदीमुळे केवळ ९ कोटींहून अधिक इराणी नागरिक जगापासून विलग झाले, शिवाय देशाच्या अर्थव्यवस्थेचेही मोठे नुकसान झाले आहे. प्रादेशिक अस्थिरता आणि युद्धाच्या धोक्याच्या पार्श्वभूमीवर, इराणी राजवटीने माहितीच्या प्रवाहावर पूर्णपणे नियंत्रण मिळवण्यासाठी हा मार्ग अवलंबला आहे. *(वृत्तसंस्था)*

**नऊ कोटी नागरिक जगापासून विलग | दररोज ३.७ अब्ज रुपयांचे नुकसान**




### बँकिंग सेवा, ऑनलाईन व्यापार विस्कळीत

**दीर्घकाळ चाललेल्या इंटरनेट खंडामुळे इराणमधील सामान्य जीवन विस्कळीत झाले आहे. बँकिंग सेवा, ऑनलाईन व्यापार आणि वाहतूक व्यवस्था पूर्णपणे ठप्प झाली आहे. तज्ज्ञांच्या अंदाजानुसार, या बंदमुळे आतापर्यंत इराणी अर्थव्यवस्थेला एकूण २.५ अब्ज डॉलर्स (२३५.७ अब्ज रुपये) चे नुकसान झाले आहे. महसुलावर दररोज अंदाजे ३.७ अब्ज रुपयांचा परिणाम होत आहे.**

### संवादाचे पर्यायी मार्ग बंद

**लोक आपल्या कुटुंबांशी संपर्क साधू शकत नाहीत. परदेशी माध्यमे आणि स्वतंत्र माहितीच्या स्रोतांपर्यंतचा प्रवेश पूर्णपणे रोखला गेला आहे, ज्यामुळे देशात भीती आणि अनिश्चिततेचे वातावरण निर्माण झाले आहे. इराणी अधिकाऱ्यांनी स्टारलिंकसारखे सॅटेलाइट इंटरनेट रोखण्यासाठी लष्करी दर्जाच्या जॅमर्सचा वापर सुरू केला असून, त्यामुळे संवादाचे पर्यायी मार्ग बंद झाले आहेत.**

## दिल्लीत पाच कोटी रुपयांचे कोकेन जप्त

**◆ नवी दिल्ली, २६ एप्रिल**

दिल्ली-एनसीआरमधील ड्रग्ज तस्करांना मोठा धक्का बसला आहे. दिल्लीतील गुन्हे शाखेच्या आंतरराज्यीय पथकाने एका मोठ्या आंतरराज्यीय ड्रग्ज सिंडिकेटचा भंडाफोड करत सुमारे ५ कोटी रुपयांचे उच्च प्रतीचे कोकेन जप्त केले आहे. या कारवाईत दोन संशयितांना अटक करण्यात आली.

गुन्हे शाखेचे उपायुक्त आदित्य गौतम यांनी सांगितले की, गोपनीय माहितीच्या आधारे, गुन्हे शाखेने गाझीपूर चौकाजवळ सापळा रचून जावेद हुसेनला अटक केली. झडतीदरम्यान, त्याच्या ताब्यातून ४५६ ग्रॅम उच्च प्रतीचे कोकेन जप्त करण्यात आले. ज्याची आंतरराष्ट्रीय बाजारात अंदाजे ५ कोटी रुपये किंमत आहे. एनडीपीएस कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून तपास सुरू करण्यात आला आहे. *(वृत्तसंस्था)*

# हिल्टन हॉटेल बनले दहशतीचे केंद्र

## ४५ वर्षांनंतर पुन्हा घडला गोळीबार; रोनाल्ड रेगन यांच्यावर झाला होता हल्ला

**◆ वॉशिंग्टन, २६ एप्रिल**

४५ वर्षांच्या कालावधीनंतर, राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प एका कार्यक्रमाला उपस्थित असताना वॉशिंग्टन हिल्टन हॉटेलमध्ये पुन्हा एकदा गोळीबाराची घटना घडली. यापूर्वी, १९८१ मध्ये याच ठिकाणी माजी राष्ट्राध्यक्ष रोनाल्ड रेगन यांच्यावर हल्ला झाला होता, ज्यामुळे सुरक्षा व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले होते.



अमेरिकेची राजधानी वॉशिंग्टनमधील प्रसिद्ध वॉशिंग्टन हिल्टन हॉटेल पुन्हा एकदा चर्चेत आले आहे आणि दहशतीचे केंद्र बनले आहे. हे तेच ठिकाण आहे जिथे ४५ वर्षांपूर्वी तत्कालीन राष्ट्राध्यक्ष रोनाल्ड रेगन यांच्यावर प्राणघातक हल्ला झाला होता. आता, पुन्हा राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प उपस्थित असलेल्या एका कार्यक्रमादरम्यान झालेल्या गोळीबाराच्या घटनेने हे हॉटेल चर्चेत आहे. ३० मार्च, १९८१ हा अमेरिकेच्या इतिहासातील एक काळा अध्याय आहे. तत्कालीन राष्ट्राध्यक्ष रोनाल्ड रेगन एका कार्यक्रमाला उपस्थित राहण्यासाठी वॉशिंग्टन हिल्टन येथे आले होते. ते बाहेर पडत असताना, जॉन हिंकले ज्युनियर नावाच्या एका हल्लेखोराने कॅलिबरच्या रिव्हॉल्वरने त्यांच्यावर गोळीबार केला. या हल्ल्यात सिक्रेट सर्व्हिस एजंट टिमोथी मॅकार्थी, पोलिस अधिकारी थॉमस डेलाहँटी आणि प्रेस सेक्रेटरी जेम्स ब्रेडी हे देखील जखमी झाले. जेम्स ब्रेडी सर्वात गंभीर जखमी झाले आणि आयुष्यभरासाठी अपंग झाले. या घटनेनंतर, अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांच्या सुरक्षा प्रणालीमध्ये मोठे बदल करण्यात आले. *(वृत्तसंस्था)*

### एकाच हॉटेलमध्ये दोन मोठे हल्ले

**वॉशिंग्टन हिल्टन आता त्या निवडक ठिकाणांच्या गटात सामील झाले आहे, जिथे वेगवेगळ्या वेळी दोन अमेरिकी राष्ट्राध्यक्षांच्या उपस्थितीत हल्ला झाला. १९८१ मध्ये, रोनाल्ड रेगन थेट हल्ल्याचे बळी ठरले होते, तर आता २०२६ मध्ये, ट्रम्प यांचा कार्यक्रम सुरू असताना गोळीबारामुळे सुरक्षेला आव्हान निर्माण झाले होते.**

### सिक्रेट सर्व्हिसमुळे अनर्थ टळला

**यूएस सिक्रेट सर्व्हिसने तत्काळ प्रतिसाद दिला आणि राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि त्यांच्या पत्नी मेलानिया यांना सुरक्षितपणे बाहेर काढले. हॉलमधील अनेक लोक टेबलांखाली लपले, तर काही जण जमिनीवर झोपले. काही मिनिटांतच वातावरण तणावपूर्ण झाले. सुरक्षा दलांनी संपूर्ण परिसर सील केला आणि हॉटेलच्या लॉबीजवळ संशयिताला ताब्यात घेतले.**

### २,६०० लोकांच्या उपस्थितीत हल्ला

**कार्यक्रमाला विविध क्षेत्रातील २६०० नागरिक उपस्थित होते. अशातच अचानक, मोठा आवाज ऐकू आला. सुरुवातीला लोकांना वाटले की हा तांत्रिक बिघाड आहे, पण लवकरच हे गोळीबाराचे आवाज असल्याचे स्पष्ट झाले. प्रत्यक्षदर्शींच्या मते, लॉबी आणि बॉलरूमच्या बाहेर चार ते सहा गोळ्या झाडल्याचा आवाज आला.**

# नासातील प्रशिक्षणार्थी बंदूकधारी कसा बनला?

## गूढ उकलण्याचे तपास यंत्रणासाठी आव्हान

**◆ वॉशिंग्टन, २६ एप्रिल**



वॉशिंग्टनमधील ट्रम्प यांच्या कार्यक्रमात गोळीबार केल्याचा आरोप असलेल्या कोल थॉमस ॲलनची ओळख उघड झाली आहे. तो अमेरिकेची अंतराळ संशोधन संस्था अर्थात् नासाचा प्रशिक्षमार्थी आणि एक शिक्षकही आहे. तपास यंत्रणा त्याच्या पार्श्वभूमीची चौकशी करत आहेत.

३१ वर्षीय थॉमस कॅलिफोर्नियातील टॉरन्सचा रहिवासी आहे. तो कार्यक्रमाच्या पूर्वीपासूनच हॉटेलमध्ये उपस्थित होता. त्याने कॅलिफोर्निया इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीमधून मेकॅनिकल इंजिनिअरिंगची पदवी आणि नंतर कॉम्प्युटर सायन्समध्ये पदव्युत्तर पदवी मिळवली होती. त्याने नासाच्या जेट प्रोपल्शन लॅबोरेटरीमध्ये उन्हाळी संशोधन फेलोशिपमध्ये भाग घेतला होता. तो अर्धवेळ शिक्षक म्हणूनही काम करत होता. त्याच्याकडे एक शॉटगन, एक हँडगन आणि अनेक चाकू होते. तो सुरक्षा घेरा तोडत पुढे जात असताना, त्याला यू.एस. सिक्रेट सर्व्हिसच्या कर्मचाऱ्यांनी थांबवले. *(वृत्तसंस्था)*

### हल्ला करणाऱ्याची शैक्षणिक पृष्ठभूमी

**ॲलनने २०१७ मध्ये कॅलिफोर्निया इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (कॅलटेक) मधून मेकॅनिकल इंजिनिअरिंगची पदवी मिळवली. गेल्या वर्षी, त्याने कॅलिफोर्निया स्टेट युनिव्हर्सिटी-डोमिंगेझ हिल्समधून कॉम्प्युटर सायन्समध्ये पदव्युत्तर पदवी (मास्टर डिग्री) देखील मिळवली. ॲलन राजकारणातही सक्रिय आहे. फेडरल इलेक्शन कमिशनच्या नोंदींनुसार, त्याने ऑक्टोबर २०२४ मध्ये कमला हॅरिसच्या अध्यक्षीय प्रचार मोहिमेसाठी २५ डॉलरची देणगी दिली होती.**

## चित्रपट वार्ता

### २२ वर्षांनंतर सलमान अभिषेक एकाच चित्रपटात



**मुंबई** : अभिनेता रितेश देशमुखच्या ‘राजा शिवाजी’ या चित्रपटाची सध्या मनोरंजनसृष्टीत एकच चर्चा आहे. मे २०२६ मध्ये प्रदर्शित होणाऱ्या चित्रपटात रितेश देशमुख, संजय दत्त, अभिषेक बच्चन यांच्यासह अनेक दमदार कलाकारांची स्टारकास्ट आहे. दरम्यान रितेशने केलेल्या एका खुलास्यानुसार या चित्रपटात एक सरप्राईज एन्ट्री प्रेक्षकांना पाहायला मिळणार आहे. ही एन्ट्री सलमान खानची असणार आहे. त्यामुळे सलमान खान आणि अभिषेक बच्चन तब्बल २२ वर्षांनंतर एकत्र दिसणार आहे. चित्रपटात सलमान खान एका प्रभावी योद्याच्या भूमिकेत झळकणार आहे. त्याच्या भूमिकेबद्दल सविस्तर माहिती अद्याप समोर आलेली नसली तरी चित्रपटात महत्त्वाचा सहभाग असणार आहे. त्यामुळे प्रेक्षकांची उत्सकुता शिगेला पोहोचली आहे.



### ३३ वर्षांनंतर ‘बल्लू’ परतला

**मुंबई** : बॉलीवूडचा प्रसिद्ध अभिनेता संजय दत्त याचा बहुप्रतिक्षित चित्रपट ‘खलनायक- २’चा टीझर नुकताच रिलीज झाला आहे. १९९३ मध्ये आलेल्या ‘खलनायक’ चित्रपटाचा सिक्वेल असलेला हा चित्रपट एक नवीन वळण घेऊन प्रेक्षकांच्या समोर येणार आहे. या टीझरमध्ये संजय दत्तचा लूक आणि त्याच्या अभिनयाचे विशेष आकर्षण दिसून येते आणि ‘बल्लू’ या त्याच्या पात्राची पुन्हा एकदा गाजलेली ओळख प्रेक्षकांसमोर ठेवण्यात आली आहे. ३३ वर्षांच्या अंतराने, संजय दत्त या लोकप्रिय भूमिकेत परतत आहे. चित्रपटाची कथा तसेच चित्रपटाच्या अन्य पात्रांबद्दल अधिक माहिती अजून तरी गुलदस्त्यात ठेवली गेली आहे. तथापि, हा चित्रपट त्या काळातील अपराध, राजकारण आणि गुन्हेगारी सृष्टीवर आधारित असावा, असे संकेत आहेत.



### ...अन् आमिषाने गमावली ‘तेरे नाम’ची संधी

**मुंबई** : बॉलिवूडची चर्चित अभिनेत्री अमिषा पटेल आपल्या अभिनयाच्या जोरावर मोठ्या प्रमाणात लोकप्रिय झाली आहे. ‘तेरे नाम’ चित्रपटाबद्दल तिने नुकताच एक खुलासा केला आहे. चित्रपटासाठी तिला सुरुवातीला ऑफर करण्यात आला होता. मात्र, काही कारणांमुळे तिने नकार दिला होता. या नकाराचा आजही पश्चाताप होतो, असे तिने एका मुलाखतीत सांगितले. ‘तेरे नाम’ हा २००३ साली प्रदर्शित झालेल्या चित्रपटाने सलमान खानच्या करिअरला यामुळे नवीन दिशा मिळाली आणि तो चित्रपट बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ घालणारा ठरला. अमिषा पटेलने स्पष्ट केले की, जेव्हा सलमान खानने चित्रपटाची ऑफर दिली, तेव्हा हा सिनेमा अगदी सुरुवातीच्या टप्प्यावर होता. या अनिश्चिततेमुळेच मी नकार दिला ज्यामुळे माझे खूप नुकसान झाले. सलमान खानसोबत काम करण्याची एक चांगली संधी गमावली.



# हताश होऊन पक्ष सोडावा लागला

### राघव चड्ढाचे स्पष्टीकरण

**◆ नवी दिल्ली, २६ एप्रिल**

पहिला शीशमहल बांधला गेला, तेव्हाच आम आदमी पक्षाची प्रतिमा मलिन झाली होती. माझ्या मते, दिल्ली निवडणुकीत पराभवाचे सर्वात मोठे कारण कोणते असेल, तर त्यात या शीशमहलचा समावेश होता. पक्षाला दिल्ली निवडणुकीत पराभव होऊन एक वर्षही पूर्ण झालेलं नाही आणि आता शीशमहल पार्ट- २ प्रकरण समोर आले. खरी परिस्थिती लक्षात आणून देखील पक्षनेतृत्व ऐकण्याच्या मनस्थितीत नसल्याने हताश होऊन पक्षातून बाहेर पडावे लागले असे स्पष्टीकरण खासदार राघव चड्डा यांनी प्रसार माध्यमांशी बोलताना दिली.



चड्ढा पुढे म्हणाले की, समोर आलेले फोटो पाहिल्यास स्पष्ट होते की, हे निवासस्थान अत्यंत आलिशान बनवण्यात आले आहे. पक्षाने सर्व मुद्द्यांवर आत्मचिंतन करण्याची गरज आहे. पक्षात जे काही मोजके चांगले कार्यकर्ते उरले, ते या सर्वांना कसे उत्तर देणार, गल्लीबोळ्यात जेव्हा लोक शीशमहलबद्दल प्रश्न विचारतील, तेव्हा ते काय सांगणार, आपने या विषयांवर गांभीर्याने विचार केला पाहिजे. जो व्यक्ती आपशी जोडलेला होता, तो एकतर पक्ष सोडून गेला आहे किंवा सोडत आहे. आम्ही ७ खासदारांनी मिळून पक्ष सोडला आहे. आपचे नेते म्हणत आहेत की आम्ही घाबरलो आहोत, परंतु आम्ही घाबरुन नाही, तर हताश होऊन पक्ष सोडला आहे. *(वृत्तसंस्था)*

# भाजपात प्रवेश केलेल्या खासदारांना केंद्राची सुरक्षा

**चोवीस तास सीआरपीएफ कंमाडोचे सुरक्षाकवच**

**◆ नवी दिल्ली, २६ एप्रिल**

आम आदमी पक्षातून बाहेर पडलेल्या सात खासदारांची पंजाब सरकारने सुरक्षा काढून घेतल्यानंतर, केंद्रीय गृह मंत्रालयाने माजी क्रिकेटपटू हरभजन सिंग आणि इतर बंडखोर खासदारांना सीआरपीएफ सुरक्षा दिली आहे. हे नेते आता दिल्ली आणि पंजाबमध्ये केंद्रीय सुरक्षा कवचाखाली असतील.

गृह मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार हरभजन सिंग यांच्यासोबतच आम आदमी पार्टीतून भाजपामध्ये गेलेले इतर खासदार राघव चड्ढा, संदीप पाठक, अशोक मित्तल, स्वाती मालीवाल, राजेंद्र गुप्ता आणि विक्रमजीत साहनी यांनाही केंद्रीय सुरक्षा पुरवण्यात आली आहे. या नेत्यांना वाढता धोका आणि पंजाबमधील त्यांच्या निवासस्थानाबाहेर होणारी निदर्शने लक्षात घेऊन हे पाऊल उचलण्यात आले आहे. पंजाबमधील भगवंत मान सरकारने हरभजन सिंग यांची झेड प्लस श्रेणीची सुरक्षा हटवली. त्यांच्या जालंधर येथील निवासस्थानात तैनात असलेले नऊ ते दहा सुरक्षा कर्मचारी आणि सरकारी वाहने परत बोलावण्यात आली. हरभजन यांच्या घराबाहेर आंदोलकांनी भिंतीवर पंजाबचा गद्दार असे लिहिले होते. पोलिसांनी आंदोलकांना थांबवण्याची प्रयत्न केला नव्हता. *(वृत्तसंस्था)*

### कोलकातात सोना पप्पू प्रकरणात ईडीचे छापे

**◆ कोलकाता, २६ एप्रिल**

पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अंमलबजावणी संचालनालय (ईडी) पुन्हा एकदा सक्रिय झाले आहे. केंद्रीय तपास यंत्रणा रविवार सकाळपासून कोलकाताच्या अनेक भागांमध्ये छापे टाकत आहे. ईडीने आनंदपूर आणि अलीपूर येथील दोन व्यावसायिकांच्या घरांसह तीन ठिकाणी एकाच वेळी शोधमोहीम राबवली.

ईडीच्या सूत्रांनुसार, सोना पप्पू प्रकरणाच्या तपासादरम्यान मिळालेल्या पुराव्यांच्या आधारे ही कारवाई केली जात आहे. या प्रकरणात अटक करण्यात आलेल्या व्यावसायिक जय एस. कामदार यांच्या चौकशीतून अनेक नवीन तपशील समोर आले आहेत. *(वृत्तसंस्था)*

# भारताने एक इंचही जमीन गमावली नाही

## ● माजी लष्करप्रमुख जनरल नरवणे यांची माहिती ● निर्णय घेण्यास लष्कराला मोकळीक


**◆ नवी दिल्ली, २६ एप्रिल**

२०२० च्या पूर्व लडाखमधील संघर्षादरम्यान भारताने कोणताही भूभाग गमावला नाही. भारतीय लष्कराच्या निर्णयात राजकीय नेतृत्वाचा हस्तक्षेप होत नाही. राष्ट्रीय सुरक्षेशी संबंधित निर्णय कॅबिनेट सुरक्षा समितीद्वारे (सीसीएस) घेतले जातात आणि लष्करी अधिकाऱ्यांना निर्णय घेण्याची पूर्ण मोकळीक असते असा खुलासा माजी लष्करप्रमुख जनरल मनोज मुकुंद नरवणे यांनी केला आहे.

'फोर स्टार्स ऑफ डेस्टिनी' या अप्रकाशित पुस्तकावरून झालेल्या वादानंतर आणि विरोधकांनी केलेल्या आरोपाच्या पृष्ठभूमीवर जनरल नरवणे यांनी वृत्तसंस्थेला मुलाखत दिली. त्यांनी २०२० च्या भारत-चीन संघर्षावर बोलताना सांगितले, चीनने भारताची जमीन बळकावल्याचा आरोप निराधार आहे. संघर्षावेळी एक इंचही जमीन भारताने गमावली नाही. राजकीय नेतृत्व लष्करी बाबींमध्ये थेट हस्तक्षेप करत नाही. राष्ट्रीय सुरक्षेशी संबंधित निर्णय कॅबिनेट सुरक्षा समितीद्वारे घेतले जातात. लष्करी अधिकाऱ्यांना निर्णय घेण्याची पूर्णपणे मोकळीक आहे. सशस्त्र दलांना राजकारणापासून शक्य तितके दूर ठेवले पाहिजे. कोणत्याही विशिष्ट विधानाला पंतप्रधानांशी जोडणे योग्य नाही. पुस्तकातील उतारे संसदेत सादर केले त्यावेळीदेखील मी म्हटले होते की, आपण कोणताही प्रदेश गमावलेला नाही. मी आजही माझ्या त्या विधानावर ठाम आहे. जर कोणाला ते मान्य नसेल, तर तो त्यांचा निर्णय आहे. *(वृत्तसंस्था)*

### लडाख संघर्षावेळी सरकार पाठीशी

**सैन्यात घेतलेले कोणतेही निर्णय नेहमीच लष्करप्रमुखांच्या आदेशांवर आधारित असतात. लडाखमध्ये झालेल्या संघर्षादरम्यान सरकार आणि संपूर्ण देश लष्कराच्या पाठीशी पूर्णपणे उभा होता. चिनी सैन्यासोबत संघर्ष झाल्यास, भारतीय लष्कराने जे योग्य वाटेल ते करावे, अशा स्पष्ट सूचना पंतप्रधान मोदी यांच्याकडून होत्या. ही सूचना लष्करावरील सरकारचा विश्वास दर्शवते.**



### सैन्याला राजकारणात ओढणे धोकादायक

**जनरल नरवणे यांनी पाकिस्तानचा उल्लेख टाळत म्हटले की, आज आपला देश शेजारी देशांपेक्षा पुढे जाण्याचे सर्वात मोठे कारण म्हणजे आपले सैन्य राजकारणापासून अलिप्त आहे. सैन्याला राजकारणात ओढण्याचे प्रयत्न देशासाठी अत्यंत धोकादायक आहेत. जर आपल्याला विकासाच्या मार्गावर पुढे जायचे असेल, तर सैन्याने अराजकीय राहणे अत्यंत महत्त्वाचे आहे.**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



## अग्रलेख...

# बालेन शहांची तिरकी चाल

गेल्या दशकभरात भारताच्या शेजारी देशांमध्ये मोठ्या उलथापालथी सुरू आहेत. त्यातून भूतान वगळता एकही देश सुटलेला नाही. सुरुवात झाली ती पाकिस्तानपासून. २०१४ मध्ये नरेंद्र मोदी पंतप्रधान झाल्यापासून पाकिस्तानात मोठी अस्वस्थता निर्माण झाली. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या मुशीत वाढलेला, कट्टर देशभक्त हिंदू नेता आणि त्यांचा भारतीय जनता पक्ष पूर्ण बहुमताने भारताच्या केंद्रीय सत्तेत आला हे पाकिस्तानी लष्करशहा आणि राजकारण्यांच्या पचनी अद्याप पडले नाही. त्यावेळी नवाज शरीफ हे त्यामानाने थोडे मवाळ असलेले नेते पंतप्रधान होते. भारतासोबत कोणत्या पातळीवर संबंध ठेवायचे याची जाण आणि अनुभव त्यांच्या पाठीशी होता. पंतप्रधान झाल्यानंतर मोदी यांनीही संबंधात निदान कटुता वाढू नये म्हणून शपथविधीला शरीफ यांना आमंत्रित केले होते. एवढेच नव्हे तर काबूलच्या भेटीवर असताना शिष्टाचार सोडून मोदी हे शरीफ यांच्या निवासस्थानी गेले होते. दोन्ही देशांमधील तणाव कमी व्हावा, मैत्री निर्माण व्हावी, या उद्देशानेच मोदी यांनी हे पाऊल उचलले होते. पण, एका भ्रष्टाचार प्रकरणात न्यायालयाने अपात्र घोषित केल्याने शरीफ यांना सत्तेवरून पायउतार व्हावे लागले. काही काळ त्यांना देशही सोडावा लागला. २०१८ च्या निवडणुकीत 'प्ले बॉय' म्हणून परिचित असलेले माजी क्रिकेटपटू इम्रान खान यांचा 'पाकिस्तान तेहरिक-ए-इन्साफ' हा पक्ष सत्तेवर आला आणि ते पंतप्रधान झाले. पण, पुढचे वर्ष त्यांच्यातील राजकीय गुण आणि नेतृत्वाचे कसोटी घेणारे ठरले. कारण, २०१९ मध्ये नरेंद्र मोदी पुन्हा पंतप्रधान झाले. ऑगस्ट महिना भारत आणि पाकिस्तानात मोठे वादळ घेऊन आला. ५ ऑगस्ट २०१९ रोजी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी ३७० वे कलम हटविल्याची घोषणा केली. वास्तविक पाहता ३७० कलम हटविणे हा भारताचा अंतर्गत प्रश्न होता. इम्रान खान यांना मिरच्या झोंबण्याचे काहीच कारण नव्हते. पण, स्वतःला नायक म्हणून सिद्ध करण्याच्या नादात त्यांनी भारतासोबतचे संबंध तोडून टाकले. भारताच्या पंतप्रधानांबद्दल सातत्याने अपशब्दांचा वापर केला. अखेर एप्रिल २०२२ मध्ये या इम्रान खान नियाजींनाही भ्रष्टाचाराच्या आरोपाखाली पंतप्रधानपदावरून हाकलण्यात आले. मार्च २०२३ मध्ये अटक केल्यापासून भारत आणि मोदींना शिव्यांची लाखोली वाहणारे इम्रान खान अजूनही तुरुंगात सडत आहेत.

हा केवळ पाकिस्तानचाच किस्सा होता असे नाही. केपी ओली पंतप्रधान असताना नेपाळनेही भारताशी खाजविण्याचा प्रयत्न केला. भारताच्या पायथ्याशी असलेल्या लंकेनेही चीनच्या बळावर दिल्लीशी पंगा घेतला. याचा परिणाम असा झाला की लंकेचे नागरिक भिकेला लागले. मोठे मन केलेल्या भारताने मदत केल्यानेच श्रीलंका आज तग धरून आहे. बांगलादेशची परिस्थिती काय झाली हे सांगायलाच नको. भारताशी व्यापार सुरू असताना ज्या बांगलादेशची अर्थव्यवस्था शिलकीत होती, ती रसातळाला गेली. कारण, काय तर मोहम्मद युनूस सरकारचा भारतद्वेष आणि हे युनूस म्हणे अर्थतज्ज्ञ...असो, वास्तवात नेपाळ, बांगलादेश, श्रीलंका, पाकिस्तानसारख्या देशांना तर भारत काखेत घेऊन फिरू शकतो. भारताच्या शांततापूर्ण आणि संयमी धोरणाचा फटकाही अनेकदा बसला. त्याचे आर्थिक पातळीवर नुकसानही सहन करावे लागले. श्रीलंका आणि बांगलादेशातील घडामोडी ही ताजी उदाहरणे आहेत. नेपाळनेही भारताच्या उदार धोरणाचा गैरफायदा घेण्याचाच प्रयत्न केला. गणतंत्राच्या गोंडस नावाखाली चीनच्या मदतीने २००८ मध्ये जगातील एकमेव हिंदू राष्ट्र असलेल्या नेपाळमधील राजेशाही व्यवस्था संपविण्यात आली. नेपाळचे तत्कालीन राजे ज्ञानेंद्र यांना काठमांडूतील राजवाडा सोडण्यास भाग पाडले गेले आणि त्याचे संग्रहालयात रूपांतर करण्यात आले. त्यानंतर नेपाळमध्ये कम्युनिस्ट विचारांचा पगडा असलेली सरकारे सत्तेवर आली. अर्थात २००८ पासून जवळपास १८ वर्षांमध्ये १४ सरकारे आली अन् गेली. यापैकी पुष्पकमल दहल ऊर्फ प्रचंड आणि केपी शर्मा ओली यांनीच आलटून-पालटून सत्ता भोगली. विशेष म्हणजे हे दोघेही कट्टर भारतविरोधी आणि चीनचे समर्थक. गेल्या १८ वर्षांत नेपाळमध्ये कधीही राजकीय अथवा आर्थिक स्थिरता आली नाही. भ्रष्टाचारामुळे देश पोखरून निघाला. प्रचंड गरिबी आणि बेकारीमुळे जनता दारिद्र्याच्या खाईत लोटली गेली. पोट भरण्यासाठी नागरिकांना परदेशी पलायन करण्यावाचून दुसरा पर्यायच उरला नाही. गरीब नेपाळी नागरिकांचा एकमेव आधार म्हणजे भारत. आज भारतातील प्रत्येक लहान-मोठ्या शहरांमध्ये नेपाळी नागरिक सुरक्षा रक्षकाचे वा अन्य किडूकमिडूक काम करून पोट भरताना आढळतात. प्रचंड आणि ओली यांनी सातत्याने भारतविरुद्ध भूमिका घेऊनही दिल्लीने कधीही प्रत्युत्तर दिले नाही. भारताचा हा मोठपणाच होय. सुदैव असे की बहुतांश नेपाळी जनता भारताच्या बाजूने आहे. काठमांडूत काहीही घडामोडी सुरू असल्या तरी सीमावर्ती भागांत मात्र, दोन्ही देशांमध्ये व्यापाराबरोबच रोटी-बेटी व्यवहार देखील सुरू असतात. राजकारणी आणि शासकीय अधिकाऱ्यांच्या भ्रष्ट कारभाराला नेपाळी जनता प्रचंड कंटाळली. सरकारी निधीचा दुरुपयोग होत असल्याने विकासकामे ठप्प पडली होती. त्यातच पंतप्रधान ओली यांनी ४ सप्टेंबर २०२५ रोजी सोशल मीडियावर बंधने घातल्याने जनरेशन-झेडच्या (जेन-झी) संतापाचा उद्रेक झाला. महसूल वाढीसाठी सोशल मीडियावर बंधने घातल्याचा दावा सरकारने केला असला तरी त्यामागील खरे कारण म्हणजे युवावर्गाचा राजेशाही व्यवस्थेकडे वाढत असलेला ओढा हे होते. या निर्णयानंतर जनता रस्त्यावर उतरली आणि भ्रष्ट नेत्यांचे इमले जाळत त्यांना रस्त्यावर आणत प्रसाद दिला. केपी शर्मा ओली सरकारला राजीनामा द्यावा लागला. काही काळ हंगामी सरकारच्या हातात सत्ता राहिल्यानंतर मार्च २०२६ मध्ये झालेल्या निवडणुकीत जेन-झी चे नेते बालेन शहा यांच्या राष्ट्रीय स्वतंत्र पार्टीचा प्रचंड विजय झाला. विशेष म्हणजे ३५ वर्षीय बालेन शहा यांनी माजी पंतप्रधान केपी शर्मा ओली यांनाच शिंगावर घेत त्यांचा दणदणीत पराभव केला. रॅपर असलेले बालेन मुळातच बंडखोर स्वभावाचे. गाण्यांमधून ते भ्रष्टाचारावर प्रहार करायचे. त्यामुळेच युवकांमध्ये ते प्रचंड लोकप्रिय. मात्र, बालेन शहा यांचा पवित्रा भारतविरोधी राहिला आहे. काठमांडूचे महापौर असताना त्यांनी 'ग्रेटर नेपाळ'चा मुद्दा उचलून धरत भारताचा बिहार आणि उत्तराखंडमधील काही भाग नेपाळच्या नकाशात दाखविला होता. तसेच भारताच्या चित्रपटांवर बंदीही घातली होती. त्यांचे शिक्षण कर्नाटकातील एका शिक्षण संस्थेत झाले आहे. पंतप्रधान म्हणून त्यांचा पहिला भारत दौरा होणार आहे. दौऱ्याची तारीख निश्चित झाली नाही. मात्र, दौऱ्यावर येण्यापूर्वीच त्यांच्याविरुद्ध सीमावर्ती भागातील नागरिक आणि युवकांनी आंदोलन सुरू केले आहे. विद्यार्थी संघटनांवर बंदी घालण्याचा निर्णय घेतल्याने काठमांडूत जेन-झी तरुण पुन्हा रस्त्यावर उतरले आहेत, तर राजस्व वाढविण्याच्या उद्देशाने भारतातून शंभर रुपयांपेक्षा जास्त किमतीच्या वस्तूंवर सीमाशुल्क आकारण्याचा निर्णय घेतल्याने गरीब नेपाळी नागरिक संतप्त झाले आहेत. कारण, खाद्यवस्तू आणि अन्य जीवनपयोगी सामान स्वस्त मिळत असल्याने नेपाळी नागरिक भारतात येऊन सामानाची खरेदी करतात. याशिवाय, नेपाळमध्ये जाणाऱ्या भारतीय वाहनांना नोंदणी करणे बंधनकारक केले आहे. पंतप्रधान झाल्यापासून महिनाभरातच त्यांच्या कारभारावर टीका होऊ लागली. भ्रष्टाचाराच्या आरोपावरून बालेन मंत्रिमंडळातील गृहमंत्री सुदन गुरूंग यांना राजीनामा द्यावा लागला. अनौपचारिक व्यापाराला आळा घालण्यासाठी आणि गैरव्यवहार रोखण्यासाठी सीमाशुल्क आकारत असल्याचा दावा केला जात असला तरी सीमेवरील देवाणघेवाणीचा संबंध गरीब जनतेच्या रोजच्या जीवनाशी आहे. दिवसभर काम केल्यानंतर नेपाळी नागरिक सायंकाळी खाण्यापिण्याच्या वस्तू खरेदीसाठी भारतात येतात. भारतात येणे ही काही चंगळ नव्हे तर त्यांची गरज आहे. जनतेच्या जगण्याच्या मुद्यांमध्ये अनावश्यक लुडबूड करण्याचे कारण नाही. तरीही बालेन शहा तिरकी चाल चालत आहेत. मात्र, ज्या जनतेने सत्ता बहाल केली, ती काढून घेण्याची शक्तीही जनतेत आहे, हे त्यांनी ध्यानात ठेवावे. त्यातच नेपाळचे आणि त्यांचेही भले आहे.

## दिल्ली दिनांक

रवींद्र दाणी

# युद्धबंदी आणि नाकेबंदी!

'जनरल समर'ने इराण युद्धात राष्ट्रपती ट्रम्प यांचे हात बांधले आहेत काय? दुसऱ्या महायुद्धात जनरल डिसेंबरने बलाढ्य जर्मनीला पराभूत केले असे मानले जात होते. जनरल डिसेंबर म्हणजे रशियातील डिसेंबर महिन्यातील कडक हिवाळा. जर्मन सैन्य तो हिवाळा सहन करू शकले नाही आणि याची परिणती जर्मनीच्या पराभवात झाली असे नंतर सांगितले गेले आणि त्यात तथ्यही होते.

आता 'जनरल समर' म्हणजे आखाती देशांमधील उन्हाळ्यामुळे राष्ट्रपती ट्रम्प यांचे हात बांधले गेले असल्याचे मानले जाते. इराणमध्ये फौजा घुसविण्याची त्यांनी योजना होती. यासाठी त्यांनी २५०० सैनिक असलेल्या 'यूएसएस ट्रिपोली' या आपल्या युद्धनौकेला जपानहून आखाती देशात आणले होते. पण, अमेरिकन सैन्य इराणचा उन्हाळा सहन करू शकणार नाहीत. अनेक सैनिक या उन्हानेच मरण पावतील असे ट्रम्प यांना सांगण्यात आले. मग, त्यांनी इराणमध्ये फौजा घुसविण्याचा विचार सोडून दिला व हवाई हल्ले करण्याची योजना आखली. आता ती योजनाही थंड्या बस्त्यात ठेवण्यात आली असल्यासारखे दिसते.

एकदा थांबलेले युद्ध पुन्हा सुरू करणे किती अवघड आहे याचा प्रत्यय राष्ट्रपती ट्रम्प यांना येत असावा. आमची नवी शस्त्रास्त्रे तयार आहेत, आजवर इराणने न पाहिलेली, न अनुभवलेली शस्त्रास्त्रे आता मी वापरणार आहे, आमचे बॉम्ब जहाजावर चढविले जात आहेत- अशा आणि आणखी काही वल्गना करणाऱ्या राष्ट्रपती ट्रम्प यांना पाकिस्तानची मध्यस्थी पुन्हा एकदा मान्य करावी लागली. कारण, ट्रम्प यांच्यासमोर दुसरा पर्याय नव्हता. पाकिस्तानचे पंतप्रधान व फिल्ड मार्शल यांनी मला युद्धबंदी वाढविण्याची विनंती केली आणि मी ती विनंती मान्य केली. मात्र होर्मुझच्या सामुद्रधुनीची नाकेबंदी कायम राहील असे ट्रम्प यांनी घोषित केले. म्हणजे युद्धबंदी आणि नाकेबंदी या दोन परस्परविरोधी बाबी आता समोर आल्या आहेत. यासाठी दोन्ही देशांनी परस्परांवर अटी लादल्या आहेत. इराण चर्चेला राजी झाल्याशिवाय होर्मुझची नाकेबंदी उठणार नाही असे अमेरिकेने म्हटले आहे तर अमेरिकेने ही नाकेबंदी उठविल्याशिवाय इराण युद्धबंदीवर चर्चा करणार नाही असे या देशाने म्हटले आहे. आणि यात अडकला आहे पाकिस्तान.

**इराण सज्ज** : दुसरीकडे इराण युद्धाच्या दुसऱ्या भागासाठी सज्ज होत आहे. एकीकडे युद्धविरामची चर्चा तर दुसरीकडे युद्धाची तयारी अशी इराणची भूमिका दिसते. अमेरिका व इराण यांच्यातील अविश्वासाची दरी एवढी खोल आहे की इराण अमेरिकेच्या कोणत्याही आश्वासनावर विश्वास ठेवण्यास तयार नाही. त्यामुळे इराण जराही गाफील नाही.

**नवे खेळाडू** : पश्चिम आशियात सुरू असलेल्या या युद्धात चीन व रशिया यांचा अधिकृतपणे प्रवेश होण्याचा संकेत आहे. चीन व रशिया यांच्या भूमिका लक्षात घेत ट्रम्प यांनी युद्धविराम वाढविण्याची घोषणा केली असे मानले जाते. युद्धाच्या पहिल्या भागात ट्रम्प यांना चीन व रशियाच्या अप्रत्यक्ष सहभागाची फार कल्पना आली नसावी, आता ती आली आहे असे दिसते. युद्धाच्या पहिल्या भागात चीन व रशिया यांनी इराणला तांत्रिक लष्करी साहाय्य पुरविले होते. मात्र त्यांनी स्वतःला अलिप्त ठेवले होते. आता या दोन्ही देशांनी सरळसरळ इराणला पाठिंबा देत अमेरिकेचा विरोध केला आहे. यातही चीनच्या राष्ट्रपतींनी आंतरराष्ट्रीय कायद्याचे पालन व्हावे असे म्हटले आहे. आंतरराष्ट्रीय कायद्याचा विचार करता होर्मुझच्या सामुद्रधुनीवर इराणचा अधिकार स्थापित होतो. चीनने हीच भूमिका वेगळ्या प्रकारे मांडली आहे. इराणच्या सार्वभौमत्वाचे रक्षण करण्यासाठी चीन कटिबद्ध आहे असे या देशाने स्पष्ट शब्दांत सांगितले आहे. या साऱ्याचा विचार अमेरिकेला करावा लागत आहे.

**अरब देश विरोधात** : इराणच्या वीजकेंद्रांवर अमेरिकेने हल्ला केल्यास, बहरिन, सौदी अरेबिया, संयुक्त अरब अमिरात, कुवैत व कतार या पाच देशांवर इराण हल्ला चढविणार याची कल्पना ट्रम्प यांना आली आहे. या देशांना आता युद्ध नको आहे. युद्धाच्या पहिल्या भागात या देशांना फार मोठी किंमत मोजावी लागली आहे. युद्ध पुन्हा सुरू झाल्यास ते अधिक भयावह असेल व त्यात आपली तेल शुद्धीकरण यंत्रणा बेचिराख होऊ शकते याची कल्पना आल्याने या देशांनी ट्रम्प यांच्यावर युद्ध न करण्याचा दबाव वाढविला आहे.

**फक्त इराण तयार** : अमेरिका युद्धासाठी तयार नाही, अरब देश युद्धासाठी तयार नाहीत. पण, इराण मात्र युद्धासाठी पूर्णपणे सज्ज असल्याचे मानले जाते. अमेरिका इराणचे लष्करी सामर्थ्य उद्ध्वस्त झाले असल्याचा दावा करीत असला तरी ते शाबूत असल्याचे मानले जाते. इराणने आपली सारी लष्करी यंत्रणा भूमिगत उभारली आहे. आपल्या भात्यातही नवनवी शस्त्रास्त्रे आहेत आणि त्याची चुणूक अमेरिकेला दिसेल असे इराणने म्हटले आहे.

**आण्विक संयंत्रही शाबूत?** : इराणचे आण्विक संयंत्र अमेरिकेने पूर्णपणे उद्ध्वस्त केल्याचा दावा राष्ट्रपती ट्रम्प यांनी केला असला तरी इराणचे आण्विक संयंत्र भूमिगत असून ते पूर्णपणे सुरक्षित असल्याचे निष्कर्ष काही आंतरराष्ट्रीय निरीक्षकांनी काढले आहेत. इराणच्या आण्विक कार्यक्रमाला पायबंद घालणे हे आमचे आता एकमेव उद्दिष्ट असल्याचे ट्रम्प म्हणत आहेत आणि २०१५ मध्ये अमेरिका-इराण यांच्यात झालेल्या करारापेक्षाही चांगला करार दोन्ही देशात होत असल्याचा दावा ट्रम्प करीत आहेत. त्यांचा हा दावा पोकळ असल्याचे मानले जाते.

**ओबामा करार** : बराक ओबामा राष्ट्रपती असताना त्यांनी इराणच्या आण्विक कार्यक्रमाला लगाम घालणारा सर्वांत चांगला करार घडवून आणला होता. दोन वर्षांच्या अथक परिश्रमानंतर हा करार करण्यात आला होता. त्यात इराणवर ३.७ टक्के युरेनियम शुद्धतेची मर्यादा घालण्यात आली होती. म्हणजे इराणला युरेनियम युद्धतेचा आपला कार्यक्रम तर सुरू ठेवता येईल मात्र युरेनियमची शुद्धता ३.७ टक्क्यांपेक्षा अधिक वाढविता येणार नाही हे साध्य करण्यात आले होते. आण्विक ऊर्जा तयार करण्यासाठी युरेनियमची शुद्धता ३ ते ५ टक्के असावी लागते. तेवढीच सूट इराणला देण्यात आली होती. आंतरराष्ट्रीय तज्ज्ञांकडून इराणच्या आण्विक प्रकल्पांची नियमित तपासणी केली जात होती आणि इराण ३.७ टक्क्यांपेक्षा अधिक युरेनियम शुद्ध करू शकणार नाही याची काळजी घेण्यात येत होती. एकप्रकारे इराणचा आण्विक कार्यक्रम गोठविण्यात अमेरिकेला यश आले होते.

**ट्रम्प यांचा आत्मघात** : बराक ओबामा यांच्यानंतर ट्रम्प राष्ट्रपती झाले आणि त्यांनी हा करार मोडीत काढला आणि याचा फायदा उठवीत इराणने आपली युरेनियम शुद्ध करण्याची क्षमता ६० टक्क्यांवर केली. कारण अण्वस्त्र तयार करण्यासाठी युरेनियमची शुद्धता ९० टक्के असावी लागते. ज्या गतीने इराणची वाटचाल सुरू होती, ती पाहता दोन वर्षांत इराण अण्वस्त्र तयार करील आणि नंतर आपल्याला काहीच करता येणार नाही याची कल्पना आल्याने ट्रम्प बिथरले. त्यात इस्रायलने त्यांना साथ दिली आणि दोघांनी युद्धाचा निर्णय घेतला.

**बेपत्ता युरेनियम** : इराणजवळ ६० टक्के शुद्धतेचे ४४० किलो युरेनियम असल्याचे मानले जाते. इराणने हे युरेनियम चीनमध्ये लपविले आहे की रशियात याची चिंता ट्रम्प यांना भेडसावीत आहे. कारण या युरेनियमचा ठावठिकाणा अद्याप अमेरिकेला लावता आलेला नाही. इराणने अति सुरक्षित जागी ते ठेवले असल्याचे मानले जाते. आणि हे युरेनियम कोणत्याही परिस्थितीत अमेरिकेच्या स्वाधीन न करण्याची भूमिका इराणने घेतली आहे. सध्या सारे जग युद्ध आणि युद्धविराम यांच्यातील सूक्ष्म सीमारेषेवर श्वास रोखून थांबले आहे. आणि ही सीमारेषा ओलांडण्याचा निर्णय फक्त एक व्यक्ती करणार आहे, राष्ट्रपती डोनाल्ड ट्रम्प.

## वेध

अनिल उमाकांत फेकरीकर

# विवाहासाठी पालकांची संमती अनिवार्य करा!

लग्न म्हणजे केवळ अडीच अक्षरे नव्हेत. सात पावलांनी जोडले जाणारे जन्मभराचे ऋणानुबंध, आयुष्यातील एक अनोखा मनस्वी प्रसंग व आयुष्यभर जतन करण्यासाठीचा आनंदी सोहळा आहे. मात्र कटकारस्थानी लोकांमुळे हा आनंदमय सोहळा दुःखात परिवर्तित होत आहे. हेच दुःख दूर करायचे झाल्यास कायद्यानुसार आता विवाहासाठी पालकांची संमती अनिवार्य करायलाच हवी. ही आता काळाची गरज बनली आहे. तसे पाहता हिंदू विवाह कायदा १९५५ अंतर्गत सज्ञान व्यक्तींना लग्नासाठी आई-वडिलांची परवानगी बंधनकारक नाही. जर वधूचे वय १८ आणि वराचे वय २१ वर्षे पूर्ण असेल तर ते स्वतःच्या मर्जीने लग्न करू शकतात. कायद्यानुसार प्रेमविवाह किंवा कोर्ट मॅरेजसाठी पालकांची परवानगी आवश्यक नसते. याच कायद्याच्या आड आज आपल्या भारतात 'लव्ह जिहाद' आणि फसवणुकीच्या घटना वाढल्या आहेत. यावर आळा घालणे काळाची गरज असल्याने कायद्यात त्यानुसार बदल अनिवार्य आहे. आई-वडील मुलांना जन्माला घालतात. त्यांना चांगले संस्कार देत मोठे करतात. त्यांच्या शिक्षणासह सर्व गरजांची पूर्तता व्हावी म्हणून रात्रीचा दिवस करतात. त्यांना सक्षम नागरिक बनविण्यासाठी आपल्या गरजा कमी करतात. मात्र मुलगा असो किंवा मुलगी वयात आले की, पळून जाऊन लग्न करतात. आम्ही सज्ञान झालो, आता आम्हाला तुमच्या परवानगीची गरज नाही असेही मुले, मुली ठासून सांगतात. अशावेळी त्या पालकांसमोर रडण्याशिवाय दुसरा पर्यायच नसतो. याचा अर्थ भावनेच्या विश्वात आंधळे झालेली मुले-मुली आपल्या आई-वडिलांच्या घराला धर्मशाळा समजतात की काय, असाही प्रश्न आता उपस्थित झाला आहे.



नागपुरातील प्रख्यात विधिज्ञ ॲड. श्याम आंभोरे यांनी तर चुकीच्या गोष्टी घडू नयेत, म्हणून पालकांचा वचक मुलांवर असावाच यावर भर दिला आहे. हा वचक कायद्याने संमतीच्या रूपात केला तर नक्कीच चुकीच्या घटना टळतील असेही त्यांनी स्पष्ट केले आहे. ज्या काळात हिंदू विवाह कायदा पारित झाला, तेव्हाची परिस्थिती वेगळी होती. आज परिस्थिती पूर्णतः बदलली आहे. शाळा लघुकोन, काटकोन, चौकोनसह सर्व काही शिकवते. पण आपले कोण हे मात्र परिस्थिती शिकवते. याच परिस्थितीची जाणीव नसल्याने सज्ञान असूनही मुला-मुलींचा निर्णय चुकतो. ते भावनेच्या भरात निर्णय घेतात आणि नंतर आयुष्यभर पश्चात्तापाच्या आगीत जळतात, म्हणूनच कौटुंबिक न्यायालयातील निवृत्त प्रमुख विवाह समुपदेशक डॉ. शेखर पांडे यांनी लग्नासाठी पालकांची संमती अनिवार्य करा, यावर शिक्कामोर्तब केले आहे. सामाजिक कार्यकर्ते रत्नाकर मेंघर आणि मुकेश अग्रवाल यांनीही लग्नासाठी आई-वडिलांची संमती कायद्याने अनिवार्य करण्यावर भर दिला आहे. वर्तमानात प्रेमविवाहाचे फॅड वाढले आहे. जे भावनेच्या भरात निर्णय घेतात ते पुढे एका वर्षात घटस्फोट घेऊन मोकळे होतात. यात मुलींच्या आयुष्याचे वाटोळे होते. मुलेही सामाजिक आगीत होरपळले जातात. प्रेमविवाह करणे वाईट नाही. पण याकरिता मुला-मुलींनी आपल्या आई-वडिलांना विश्वासात घ्यावे. कायद्याचा कीस पाडून अनेकांनी जो काही पोरखेळ सुरू केला, तो शेकडो लोकांसाठी कर्दनकाळ ठरला आहे. समाजात आणि चित्रपटांच्या माध्यमातून कर्तव्यकठोर पालकांना बदनाम केले जात आहे. जाणीवपूर्वक अशाच गोष्टी चित्रपटातून दाखविल्या जातात. उदाहरण द्यायचे झाल्यास 'कयामत से कयामत तक,' 'एक दुजे के लिए' या चित्रपटांतून आई-वडिलांनाच बदनाम केले गेले. पण 'मैंने प्यार किया' या चित्रपटाने पालकांची संमती कशी लाभदायक ठरते हे दाखविले आहे. आपल्याही जीवनाचा शेवट हा सुखद आणि गोड व्हायला हवा. हीच मनोकामना ठेवत लग्नाचा निर्णय घेताना पालकांची संमती अनिवार्य करायला हवी. प्रत्येक प्रकरणात आई-वडील खलनायक कसे राहतील, याचाही विचार व्हायला हवा. शिक्षण, पालनपोषण आणि वैद्यकीय खर्च, सामाजिक संरक्षण देताना पालक योग्य होते. पण लग्नाची वेळ येताच ते मुला- मुलींसाठी खलनायक कसे यावरही मंथन व्हायलाच हवे. मुला-मुलींचे जसे अधिकार असतात, तशीच काही कर्तव्येदेखील आहेत ना? मग केवळ अधिकार सांगायचे आणि कर्तव्य विसरायचे का? आई-वडिलांना दुःख देऊन कुठला मुलगा किंवा मुलगी सुखी झाला यासंदर्भातील उदाहरण शोधूनही सापडणार नाही. मग आपण त्यांनाच बदनाम का करतो? लग्न करण्यापूर्वी त्यांची संमती का घेत नाही. कायद्यानुसार जे काही बदल घडायचे ते भविष्यात होतील. पण तत्पूर्वी समाजानेच लग्नासाठी पालकांची संमती असेल तरच त्यांना मान्यता द्यावी.

९८८१७१७८५९

## कानोसा

अमोल पुसदकर

# बेपत्ता महिलांचे भयावह वास्तव

यवतमाळ जिल्ह्यातील राळेगाव तालुक्यातील ३४ मुली काही महिन्यांपासून बेपत्ता असल्याची बातमी काही दिवसांपूर्वी वृत्तपत्रात झळकली आणि संपूर्ण समाजाला अस्वस्थ करून गेली. राज्य शासनाने या गोष्टीची गंभीर दखल घेत पोलिस प्रशासनाला तत्काळ कठोर कारवाईचे आदेश दिले ही गोष्ट संतोषजनक असली तरीही ही घटना केवळ एका तालुक्यापुरती मर्यादित नाही, तर देशभर पसरलेल्या एका गंभीर वास्तवाची ती जाणीव करून देते. भारताच्या विविध राज्यांमध्ये महिलांच्या बेपत्ता होण्याच्या घटना सातत्याने समोर येत आहेत आणि अनेक प्रकरणांमध्ये त्यांचा शोध लागत नाही. शोध जेव्हा शोध लागतो तेव्हा त्या स्वतःचे अस्तित्व हरवून बसलेल्या असतात. या पृष्ठभूमीवर हा विषय केवळ बातमीपुरता न राहता समाजाच्या चिंतनाचा आणि कृतीचा विषय बनणे आवश्यक आहे.

भारतामध्ये महिलांच्या बेपत्ता होण्याचे प्रमाण चिंताजनक आहे. राष्ट्रीय गुन्हे नोंदवही (एनसीआरबी) च्या अहवालांनुसार दरवर्षी लाखो महिला आणि मुली बेपत्ता होतात. काही वर्षांच्या आकडेवारीवर नजर टाकली, तर परिस्थिती किती गंभीर आहे हे लक्षात येते. एका अहवालानुसार २०२१ साली सुमारे साडेतीन लाखांहून अधिक महिला बेपत्ता झाल्या होत्या. यामध्ये मोठ्या प्रमाणात अल्पवयीन मुलींचा समावेश आहे. यातील अनेक प्रकरणे नंतर शोधली जात असली, तरी हजारो महिलांचा मागमूसही लागत नाही. ही बाब केवळ आकड्यांपुरती मर्यादित नसून प्रत्येक आकड्यामागे एक कुटुंब, एक आयुष्य आणि असंख्य स्वप्ने उद्ध्वस्त झालेली असतात.

महिलांच्या बेपत्ता होण्यामागील कारणे विविध प्रकारची आहेत. काही प्रकरणांमध्ये मुली प्रेमसंबंधामुळे किंवा कौटुंबिक तणावामुळे, घरगुती भांडणांमुळे, सावत्र आई किंवा वडील यांच्या त्रासामुळे किंवा मनोरुग्ण असल्यामुळे घर सोडून जातात. काही वेळा नोकरीच्या आमिषाने किंवा चांगल्या आयुष्याच्या स्वप्नांनी त्यांना शहरांकडे खेचले जाते. मात्र, या सर्व कारणांपलीकडे एक भयावह वास्तव म्हणजे मानव तस्करीचे जाळे आहे. ग्रामीण आणि आदिवासी भागातील गरीब, अशिक्षित आणि असुरक्षित मुली या टोळ्यांच्या निशाण्यावर असतात. त्यांना चांगल्या नोकरीचे, लग्नाचे किंवा शहरात स्थायिक होण्याचे आमिष दाखवून पळवून नेले जाते आणि नंतर त्यांचा विविध प्रकारे गैरवापर केला जातो. मानव तस्करी ही या समस्येची सर्वांत भीषण बाजू आहे. बेपत्ता झालेल्या अनेक महिलांना जबरदस्तीने वेश्याव्यवसायात ढकलले जाते. काहींना घरगुती नोकर म्हणून विकले जाते, तर काही महिलांना जबरदस्तीने लग्नासाठी विकले जाते. विशेषतः अशा राज्यांमध्ये जिथे स्त्रियांचे प्रमाण कमी आहे. या सर्व प्रक्रियेत महिलांची ओळख, स्वातंत्र्य आणि मानवी हक्क पूर्णपणे हिरावून घेतले जातात. अनेक वेळा त्यांचे धर्मांतरण केले जाते. एका विशिष्ट धर्माची संख्या वाढवून घेण्यासाठी या महिलांचा उपयोग केला जातो. याशिवाय, बेपत्ता झालेल्या महिलांवर शोषण आणि हिंसेचे संकट मोठ्या प्रमाणात कोसळते. त्यांच्यावर अत्याचार, मारहाण, मानसिक छळ यासारखे आघात होतात. अनेक वेळा या महिलांना अशा परिस्थितीत ठेवले जाते की त्यांना बाहेरच्या जगाशी संपर्क साधता येत नाही. त्यांची ओळख लपवली जाते, त्यांना वेगळ्या ठिकाणी हलवले जाते आणि त्यांना सतत भीतीच्या छायेत जगावे लागते. या सगळ्या प्रक्रियेत त्यांचे मानसिक आणि शारीरिक आरोग्य गंभीरपणे बिघडते. काही प्रकरणांमध्ये महिलांचा वापर गुन्हेगारी कृत्यांसाठीही केला जातो. भीक मागणाऱ्या टोळ्या, ड्रग्ज तस्करी, लहानसहान गुन्हेगारी नेटवर्कमध्ये त्यांना जबरदस्तीने सामील केले जाते. काही वेळा त्यांना अशा परिस्थितीत ढकलले जाते की त्यांना गुन्हेगारी जीवन स्वीकारण्याशिवाय पर्याय उरत नाही. ही परिस्थिती केवळ त्या महिलांसाठीच नव्हे, तर समाजासाठीही धोकादायक आहे.

या समस्येमागे सामाजिक, आर्थिक आणि प्रशासनिक कारणांची साखळी आहे. गरिबी, बेरोजगारी, शिक्षणाचा अभाव, कुटुंबातील हिंसा, सुखवस्तू जीवनाची स्वप्न, समाज माध्यमे ही या समस्येची मूळ कारणे आहेत. ग्रामीण आणि दुर्गम भागांमध्ये शिक्षण आणि रोजगाराच्या संधींचा अभाव असल्यामुळे मुली प्रलोभनाने सहजपणे फसवल्या जातात. सोशल मीडियाचा वाढता वापरही या समस्येला खतपाणी घालत आहे. अनोळखी व्यक्तींशी संपर्क, खोटी ओळख आणि फसवणूक यामुळे अनेक मुली जाळ्यात अडकतात.

प्रशासनाच्या पातळीवरही काही मर्यादा दिसून येतात. अनेक वेळा लोक आपली बदनामी होईल किंवा पोलिसांची झंझट नको म्हणून तक्रार करायला समोर जात नाही. अनेक वेळा बेपत्ता प्रकरणांची नोंद उशिरा होते किंवा त्याकडे गांभीर्याने पाहिले जात नाही. पोलिस यंत्रणेवर मोठा ताण असल्यामुळे प्रत्येक प्रकरणावर सखोल तपास होणे कठीण जाते. काही वेळा राज्यांमधील समन्वयाचा अभावही तपासात अडथळा ठरतो. त्यामुळे अनेक प्रकरणे वर्षानुवर्षे प्रलंबित राहतात. या पृष्ठभूमीवर समाजाची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरते. कुटुंबांनी आपल्या मुलींशी संवाद वाढवणे, त्यांना योग्य मार्गदर्शन करणे आणि त्यांच्यावर विश्वास ठेवणे आवश्यक आहे. शिक्षणाच्या माध्यमातून मुलींमध्ये जागरूकता निर्माण करणे गरजेचे आहे. आधुनिक शिक्षणासोबतच त्यांना धर्म आणि जीवन मूल्यांचे शिक्षण देणे गरजेचे आहे. नोकरी, शिक्षण किंवा इतर कारणांसाठी बाहेर पडताना योग्य पडताळणी करणे, अनोळखी लोकांवर सहज विश्वास न ठेवणे यासारख्या गोष्टींची जाणीव करून देणे आवश्यक आहे.

प्रशासनानेही या समस्येकडे अधिक संवेदनशीलतेने पाहण्याची गरज आहे. बेपत्ता प्रकरणांची तत्काळ नोंद, तांत्रिक साधनांचा वापर, राज्यांमधील समन्वय यावर भर दिला पाहिजे. तसेच, वाचवलेल्या महिलांचे पुनर्वसन आणि त्यांना पुन्हा समाजात सन्मानाने उभे करण्यासाठी ठोस धोरणे राबवणे गरजेचे आहे. लहानपणी हरवलेली 'उमा' मोठेपणी 'उमराव जान' झाल्यावर सापडली तरीही तिला स्वधर्मात आणण्याची आणि तिचे पुनर्वसन करण्याची हिंमत आणि क्षमता समाजाची हवी अन्यथा शोधमोहीम राबविण्याचा काही अर्थ उरणार नाही.

माध्यमांची भूमिका देखील येथे महत्त्वाची आहे. अशा घटना केवळ एकदाच बातमी म्हणून न मांडता त्याचा पाठपुरावा करणे गरजेचे आहे. कारण माध्यमांमुळेच अनेक वेळा अशा घटनांकडे समाजाचे लक्ष वेधले जाते. राळेगावमधील ३४ मुली बेपत्ता होण्याची घटना ही एक इशारा आहे. ती आपल्याला सांगते की ही समस्या आपल्या आजूबाजूलाच आहे आणि आपण तिच्याकडे दुर्लक्ष करू शकत नाही. या घटनेने दिलेला हा इशारा आपण वेळेत ओळखला पाहिजे. मुलींच्या शाळा, महाविद्यालये व कार्यालयांमध्ये सुद्धा महिलांसमोर या विषयाची गंभीरता मांडली गेली पाहिजे तरच भविष्यात अशा घटनांना आळा घालता येईल.

९५५२५३५८१३

(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

## वाचक पत्रे

### ध्येयवेड्या कलावंतांची संघ-गंगा : शंभर प्रयोगांचा मैलाचा दगड!

''साधनेविण जे साध्य होते, त्यासी चमत्कार म्हणती...'' पण जेव्हा ही साधना राष्ट्रभक्तीने रसरसलेली असते आणि ध्येयवादाने भारलेली असते, तेव्हा इतिहास घडतो. 'संघ गंगा के तीन भगीरथ' या नाटकाचा प्रवास अथांग प्रखर राष्ट्रभक्तीच्या अनुभूतीचा प्रवाह आहे. शून्यातून विश्व निर्माण करणाऱ्या आणि राष्ट्रवादाचे बीजारोपण करणाऱ्या महापुरुषांची गाथा आज शंभर प्रयोगांच्या सुवर्णशिखरावर पोहोचली आहे.

प्रसिद्ध वक्ते आणि लेखक श्रीधरराव गाडगे यांच्या सिद्धहस्त लेखणीतून संघ-गंगा प्रवाहित झाली आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या प्रथम तीन सरसंघचालकांचे जीवनचरित्र या नाटकाच्या रूपाने साक्षात रंगमंचावर जिवंत होते, तेव्हा प्रेक्षक केवळ प्रेक्षक राहत नाहीत, तर त्या महान परंपरेचे साक्षीदार बनतात. या ऐतिहासिक नाट्यप्रवासाचा श्रीगणेशा ३० एप्रिल २०२५ रोजी नागपूरच्या वनामती सभागृहात झाला. रा. स्व. संघाचे केंद्रीय कार्यकारिणी सदस्य भय्याजी जोशी यांच्या उपस्थितीत आणि मार्गदर्शक प्रा. रवींद्र भुसारी, निखिल मुंडले यांच्या मार्गदर्शनाखाली या प्रयोगाला वैचारिक उंची प्राप्त झाली. पहिल्या प्रयोगाच्या अभूतपूर्व यशानंतर निर्मात्या सारिका पेंडसे आणि दिग्दर्शक संजय पेंडसे यांनी एका वर्षात १०० प्रयोगांचा अद्‌भुत संकल्प सोडला. निष्ठेच्या बळावर अशक्यही शक्य झाले. या नाट्यप्रवासाला गती दिली ती रामटेकच्या प्रयोगाने. राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांनी केवळ सामाजिक उत्तरदायित्व म्हणून पाच प्रयोगांच्या प्रायोजकत्वाची जबाबदारी पेलली. तिथून निघालेली ही नाट्यदिंडी महाराष्ट्र ओलांडून गुजरात, राजस्थान, उत्तर प्रदेश, उत्तरांचल आणि कोकणच्या डोंगरदऱ्यांत पोहोचली. सर्वश्री मंगल प्रभात लोढा, अरुण लखानी, देवेश पेंढरकर, अजय संचेती, प्रसाद पुल्लीवार यांच्यासारख्या दानशूर व्यक्तिमत्त्वांच्या पाठबळामुळे या नाटकाला राष्ट्रीय स्वरूप प्राप्त झाले. नाटकाचा २५ वा प्रयोग नागपूरच्या सुरेश भट सभागृहात झाला. या प्रयोगाला केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, कृष्ण गोपालजी आणि डॉ. मनमोहन वैद्य यांच्या उपस्थितीने कलाकारांचे चैतन्य द्विगुणित झाले. मुंबईचे रवींद्र नाट्यमंदिर या सुवर्णमयी ५० व्या प्रयोगाचे



साक्षीदार ठरले. सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांच्या उपस्थितीत हा सोहळा पार पडला. गुजरात दौऱ्यात सलग ३८ तास बसचा प्रवास करून, थकवा बाजूला सारून ४० व्या तासाला जुनागडच्या १,००० प्रेक्षकांसमोर झालेला प्रयोग या चमूच्या समर्पणाची साक्ष देणारा ठरला.

अहेरीच्या दुर्गम भागात ६०० ग्रामस्थांनी स्वतःची वाहने करून नाटकाला लावलेली हजेरी ही या कलेला मिळालेली सर्वांत मोठी पावती आहे. ९० प्रयोगांचा टप्पा पार करून ही गंगा आता राजधानी दिल्लीत पोहोचली आहे. दिल्लीचे सांस्कृतिक मंत्री कपिल मिश्रा यांच्या सहकार्याने ९१ ते १०० या प्रयोगांचे आयोजन करण्यात आले आहे. शंभरावा प्रयोग दिल्लीतील केशव कुंज (झेंडेवाला) येथे पार पडणार आहे. यावेळी दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता आणि विजया रहाटकर यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. या नाटकाचे सर्वांत विलोभनीय वैशिष्ट्य म्हणजे त्यात एकही व्यावसायिक कलाकार नाही. संसार, नोकरी, व्यवसाय आणि कौटुंबिक जबाबदाऱ्या सांभाळून केवळ राष्ट्रभक्तीच्या ओढीने ही सामान्य माणसे रंगमंचावर असामान्य कामगिरी करत आहेत. दिग्दर्शक संजय पेंडसे याचे संपूर्ण श्रेय आपल्या टीमवर्कला आणि पडद्यामागील कलाकारांच्या अहोरात्र परिश्रमाला देतात.

संघ गंगा के तीन भगीरथ हा राष्ट्रभक्तीच्या जीवनरसांनी भरलेला एक आविष्कार आहे. भारतीय रंगभूमीच्या इतिहासात हा प्रयोग एका देदीप्यमान सुवर्ण अक्षरांनी कोरला जाईल यात शंका नाही.

**अमोल तपासे**/९९६०६७३७८९

### युद्धखोर राष्ट्राध्यक्ष

तरुण भारतच्या २५ एप्रिलच्या 'नतद्रष्ट, नाठाळ आणि निर्ढावलेला...' ही उचित विशेषणं अमेरिकन राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना लावणारं संपादकीय परखड आहे. खोटं बोल पण रेटून बोल यावर ट्रम्प यांचा विश्वास आहे ही यातील महत्त्वाची टिप्पणी. महासत्ता म्हणवून घेण्याची या डॉलरदेशाची खुमखुमी तहहयात मक्तेदारी असल्यासारखाच ट्रम्प यांचा निर्णय घेण्याचा व फिरवण्याचा खाक्या दिसतो. आत्ताही राजकीय मताधिक्यासाठी इस्रायली ज्यू लोकांची अमेरिकास्थित लॉबी सांभाळून ठेवण्यासाठी इराण विरुद्ध युद्ध उकरून काढून सर्व जगाला वेठीला धरून ठेवण्याची शेखचिल्ली चाल अमेरिकेच्या आर्थिक स्थैर्यालाही बाधा आणणारी असू शकते हा विचार का केला जात नाही? भारत कधी कधी अमेरिकेचा मित्रही असतो असा आव आणणाऱ्या ट्रम्प यांना संयुक्त राष्ट्रसंघानं सदस्य देशांच्या दबावानं युद्धखोर इस्रायल व अमेरिका या तथाकथित परस्पर मित्रराष्ट्रांना युद्ध वल्गना आणि प्रत्यक्ष युद्ध बंद करायला भाग पाडलं पाहिजे.

**श्रीपाद कुलकर्णी**/९४२२५१५६४०

# जेईई मेनमध्ये ए. डी. जोशी कॉलेजचे प्रत्युष, समर्थ प्रथम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ एप्रिल-**

नुकत्याच जाहीर झालेल्या जेईई मेन २०२६ परीक्षेच्या निकालात येथील ए. डी. जोशी कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी यश संपादन केले आहे.





महाविद्यालयाचा विद्यार्थी प्रत्युष काळे आणि समर्थ कुलकर्णी यांनी तब्बल ९६.८७ पर्सेंटाईल मिळवत महाविद्यालयात प्रथम क्रमांक पटकावला आहे. खान जैद ९२.५४, अस्मिता काळे २१.५२, आकांक्षा सुरवसे ९१.०९, मृण्मयी कुलकर्णी ९०.०९, सोहम क्षीरसागर ८९.३५ आणि तेजस हुल्ले ८७.६२ यांनीही उत्कृष्ट पर्सेंटाईल मिळवून महाविद्यालयाचा गौरव वाढवला आहे.

यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे संस्थापक अध्यक्ष ए. डी. जोशी, सचिव अमोल जोशी, सायली जोशी, प्राचार्य प्रवीण देशपांडे यांनी कौतुक केले.

# टेंभुर्णीमध्ये भागवत कथा सप्ताहाची सांगता

**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि. २६ एप्रिल-**

अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य आणि अपरिग्रह हे धर्माचे तत्व आहेत. हे पाचही तत्व मनुष्य जीवन जगत असताना गरजेचे असल्याचे प्रतिपादन वेदांताचार्य बालयोगी गोपाल महाराज कारखेडकर यांनी केले. टेंभुर्णी (ता. माढा) येथे संगीतमय भागवत कथा सप्ताहाच्या सांगते प्रसंगी कथेच्या विवेचनात त्यांनी सांगितले.टेंभुर्णी येथे आयोजित संगीतमय भागवत कथा सप्ताहाची उत्साही वातावरणात सांगता झाली.

सांगता प्रसंगी वेदांताचार्य बालयोगी गोपाल महाराज कारखेडकर यांनी अध्यात्म, सदाचार आदी विषयांवर



प्रवचनपर मार्गदर्शन केले.मल, विक्षेप आणि आवरण असे तीन दोष आहेत. निषिद्ध कर्म करण्याची वासना तिथ मल दोष. स्नानसंध्या केल्याने दोष नष्ट होतात. तर चित्ताची चंचलता झाली की, विक्षेप दोष निर्माण होतो.

देवाच ध्यान केल्याने विक्षेप संपून जातो. तिसरा आवरण जो पर्यंत बुद्धीच्या ठिकाणी अज्ञानाच आवरण आहे. एकदा ज्ञान प्राप्त झाले की अज्ञानाच आवरण नष्ट होते.माझी जीवाची आवड, पंढरपुरा नेईल गुढे

पांडुरंगी मन रंगले । पंढरपुरची वारी करा. एकादशीच व्रत करा. कपाळी तिलक करा. चांगल कर्म करा. अन्नदान करा. पांडुरंगाच दर्शन घ्या.पवित्र तुळशीची माळ घाला.जगा आणि जगू द्या. टेंभुर्णी येथील भागवत कथा सप्ताहाच्या सांगता दिवशी गोपाल महाराज कारखेडकर यांचा संयोजक व समस्त टेंभुर्णी ग्रामस्थांच्या वतीने सत्कार करण्यात आला.

### कथा ऐकण्यासाठी एक ते दीड हजार भाविकांचा सहभाग

टेंभुर्णी (ता. माढा) येथे सुरू असलेल्या संगीतमय भागवत कथेचा समारोप झाला. कथा श्रवण्यासाठी सुमारे एक ते दिड हजार भाविक उपस्थित असतात.या सप्ताहाला भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. १९ एप्रिल पासून या सोहळ्याची सुरुवात झाली. २५ एप्रिल ला सांगता झाली.यात महिलांची उपस्थिती अधिक असते.कथा श्रवण्यासाठी टेंभुर्णी, मोडनिंब, इंदापूर, बेंबळे, नंदोरे व पंचक्रोशीतून भाविक उपस्थित असतात.टेंभुर्णी ग्रामस्थाच्या वतीने आयोजित या सोहळ्याचे यंदाचे यजमान सौ व श्री सुधाकर जोशी हे होते.

# शेठ गोविंदजी रावजी आयुर्वेद महाविद्यालयात ग्रंथदिन साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ एप्रिल-**

शेठ गोविंदजी रावजी आयुर्वेद महाविद्यालयात जागतिक ग्रंथदिन विविध उपक्रमांच्या माध्यमातून साजरा करण्यात आला. ग्रंथ प्रदर्शन तसेच ग्रंथ विवेचनाचा कार्यक्रम पार पडला.

कार्यक्रमाच्या निमित्ताने महाविद्यालयाच्या ग्रंथालयात विविध विषयांवरील संदर्भग्रंथ, आयुर्वेद विषयक पुस्तके, मूळ संहिता ग्रंथ, मॉडर्न पुस्तके, संशोधनपर उपयुक्त ग्रंथांचे आकर्षक प्रदर्शन मांडले होते. कार्यक्रमाच्या उद्घाटनपर भाषणात उपप्राचार्य डॉ. शांतीनाथ बागेवाडी यांनी 'स्क्रीन टू ग्रीन' ही संकल्पना मांडली. व्यासपीठावर डॉ. अविनाश चव्हाण, डॉ. विवेक चांदुरकर, डॉ. आनंद मादगुंडी, डॉ. सविता चौगुले, ग्रंथपाल महावीर लाळे, डॉ. सीमा शहा, डॉ. स्नेहल धायफुले यांची प्रमुख उपस्थिती होती. समृद्धी देसाई हिने औषधी गुणधर्म शास्त्र, अपूर्वा धोंडलकरने प्रेरणादायी लेडी डॉक्टर्स, प्रथमेश पाटील यांनी अग्नी कर्म व विद्धकर्म या ग्रंथाचे मार्मिक विवेचन सादर



केले. जागतिक ग्रंथदिनाचे महत्त्व यशराज तातेड यांनी सांगितले, प्रास्ताविकात ग्रंथपाल महावीर लाळे यांनी केले. बेस्ट टॉप टेन ग्रंथालय वाचक म्हणून दिनेश जैन व कोमल साजणे या विद्यार्थ्यांना ग्रंथरूपी बक्षीस देण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात दिव्याणी महाजनच्या नमोकार महामंत्र व धन्वंतरी स्तवनाने झाली. सूत्रसंचालन सूर्यांक जैन यांनी तर आभार प्रदर्शन ऋतुजा पाटील हिने केले. कार्यक्रमासाठी धीरज जैन, श्रुती गोयल, सुजल संघवई, पारस दोशी, अनिश जैन, छवी जैन आदी विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले. विद्यार्थी व प्राध्यापकांनी ग्रंथसंपदेची पाहणी केली. कार्यक्रमासाठी प्राचार्या डॉ. वीणा जावळे, प्रशासकीय अधिकारी अनुप दोशी, डॉ. गायत्री देशपांडे, विद्यार्थी कल्याण मंडळ यांचे सहकार्य लाभले.



## सिद्रामप्पा हत्तुरे शाळेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ एप्रिल-**

सिद्रामप्पा हत्तुरे प्राथमिक शाळेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी करण्यात आली. मुख्याध्यापक सचिन जाधव, सुधाकर कामशेट्टी, संगीता हुमनाबादकर, बाल अध्यक्ष ईसाअली मुल्ला यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन झाले. मनिषा पाटील यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. प्रास्ताविक सिध्दार्थ आळगी यांनी केले. सूत्रसंचालन आरव राठोड यांनी केले. आभार अरहान शेख यांनी मानले. कार्यक्रमास सुधाकर कामशेट्टी, संगीता हुमनाबादकर उपस्थित होते.

# ज्ञानभारतम् प्रकल्पांतर्गत राष्ट्रीय हस्तलिखित सर्वेक्षण मोहिमेला प्रारंभ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ एप्रिल-**

भारत देशाला हस्तलिखितांचा समृद्ध आणि वैभवशाली वारसा लाभलेला असून, पारंपारिक ज्ञान पिढ्यान्पिढ्या या हस्तलिखितांद्वारे जतन व प्रसारित होत आले आहे. मात्र ही मौल्यवान हस्तलिखिते विविध ठिकाणी विखुरलेल्या अवस्थेत असल्याने त्यांचे एकत्रित संवर्धन व दस्तऐवजीकरण करण्याची गरज ओळखून भारत सरकारने 'ज्ञानभारतम्' हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प हाती घेतला आहे.

या प्रकल्पाचा मुख्य उद्देश देशातील हस्तलिखित वारशाचे सर्वेक्षण, नोंदणी, संवर्धन, डिजिटायझेशन आणि प्रसार करणे हा असून या अंतर्गत देशव्यापी हस्तलिखित सर्वेक्षण मोहिमेला दि. १६ मार्च २०२६ पासून प्रारंभ करण्यात आला आहे. केंद्रीय अर्थसंकल्प २०२५ मध्ये जाहीर करण्यात आलेल्या या योजनेद्वारे देशभरातील शैक्षणिक संस्था, संग्रहालये, ग्रंथालये, धार्मिक संस्था तसेच खाजगी संग्राहक यांच्या सहकार्याने एक कोटीहून अधिक हस्तलिखितांचा शोध व नोंदणी करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. याशिवाय, या हस्तलिखितांचा राष्ट्रीय डिजिटल संग्रह तयार करून तो राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर उपलब्ध करून देण्याचा मानस आहे. हस्तलिखितांची मालकी संबंधित संस्था किंवा संग्राहकांकडेच राहणार असून इच्छुकांनी स्वेच्छेने शासनाकडे हस्तांतरण केल्यास ते स्वीकारण्यात येईल. या मोहिमेच्या अंमलबजावणीमध्ये राज्य सरकारची महत्त्वपूर्ण भूमिका आहे. या प्रकल्पासाठी विशेषतः Gyan Bharatam मोबाईल ॲप विकसित करण्यात आले असून, त्याद्वारे हस्तलिखितांचे क्षेत्रीय मूल्यांकन, पडताळणी व दस्तऐवजीकरणाची प्रक्रिया सुलभ करण्यात येणार आहे.

राज्यातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांना त्यांच्या स्तरावर जिल्हा नोडल अधिकारी नियुक्त करणे, जिल्हास्तरीय समित्या स्थापन करणे तसेच मंदिरे, मठ, धार्मिक संस्था, विद्यापीठे, ग्रंथालये, शैक्षणिक संस्था व खाजगी संग्राहक यांना या सर्वेक्षण मोहिमेत सहभागी करून घेण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या उपक्रमात शैक्षणिक संस्था, संशोधक, संस्कृत पाठशाळा, पारंपरिक पंडित, स्वयंसेवक, विद्यार्थी तसेच वारसा संवर्धन संस्था यांचा सक्रिय सहभाग अपेक्षित आहे.

### या संस्था प्रकल्पासाठी कार्यरत

कवी कालिदास संस्कृत विद्यापीठ, नागपूर, भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्था, पुणे, आनंद आश्रम संस्थान, पुणे, भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे, महाराष्ट्र राज्यासाठी पुराभिलेख संचालनालय, मुंबई यांची राज्य नोडल संस्था म्हणून नियुक्ती करण्यात आली असून सुजितकुमार उगले (संचालक) हे राज्य नोडल अधिकारी म्हणून कार्य पाहणार आहेत. तसेच अंजली ढमाळ (उपसंचालक, मराठी भाषा विकास संस्था) या सह-नोडल अधिकारी म्हणून कार्यरत राहणार आहेत.

# अडीच महिन्यांपासून रस्ता उकरुन ठेवला

## तामलवाडी ते वडगाव काटी रस्त्यावर चालणेही मुश्किल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ एप्रिल-**

तुळजापूर तालुक्यातील तामलवाडी ते वडगाव काटी हा सात किलोमीटरचा रस्ता अडीच ते तीन महिन्यांपासून उकरुन ठेवल्याने त्या रस्त्यावरून धड चालताही येईना... अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. रस्त्याचे काम सुरू करण्यासाठी कितीही वेळा मागणी केली तरी लोकप्रतिनिधींना घाम फुटत नाही. दरम्यान, या रस्त्याचे काम कशासाठी थांबले..? अन् ते काम का बर.. सुरू होईना ? असे अनेक सवाल वाहनधारकांसह नागरिकांमधून उपस्थित केले जात आहेत.



तुळजापूर तालुक्यातील तामलवाडी ते वडगाव काटी या सात किलोमीटरच्या रस्त्याची अनेक वर्षांपासून दयनीय अवस्था झाली होती. रस्त्यावर मोठ मोठे खड्डे पडून पावसाळ्यात या रस्त्याला शेततळ्याचे स्वरूप आले होते. विधानसभा निवडणुकीच्या काळात वडगावकर ग्रामस्थांनी या रस्त्याची अवस्था आमदारांना दाखवली. आमदार राणा जगजितसिंह पाटील यांनी मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेतून हा रस्ता मंजूर केला. रस्त्याच्या कॉंक्रीट कामासाठी ७ कोटी २० लाख रुपये मंजूर केले. मागील आठ ते नऊ महिन्यात प्रत्यक्षात कामाला सुरुवातही करण्यात आली. सुरुवातीला झाडे, झुडपे काढुन पुलाची (मोऱ्याची ) कामे पार पडली. नंतर याचवेळी पुर्वीचा असलेला रस्ता जेसीबीच्या सहाय्याने उकररण्यात आला. नागरिकांनी काम चालु झाल्यावर आमदारांचे आभार व्यक्त केले. जवळपास सात किलोमीटरचा रस्ता जेसीबीच्या सहाय्याने उकरुन जे संबंधित गुत्तेदार गायब झालेत ते आजतागायत तीन महीने झाले तरीही इकडे फिरकलेच नाहीत. याकडे कुणाचे लक्षच जाईना? असे झाले आहे.

गेल्या तीन महिन्यांपासून उकरुन ठेवलेल्या या रस्त्यावरुन नागरीक, शेतकरी यांना खडी उघडी पडल्याने नीट चालताही येईनासे झाले आहे. दोनचाकी गाडीवरुन पडून अनेकजण जखमी झाल्याच्या घटना घडत आहेत. रस्त्यांवरुन जाताना दोनचाकी गाड्यांच्या टायरची वाट लागत असल्याने विनाकारण नागरीकांना आर्थिक भुर्दंड सोसावा लागत असल्याचे नागरीकांनी सांगितले. तामलवाडी, वडगाव काटी येथील महिला, शेतकरी यांना या उकरुन ठेवलेल्या रस्त्यावरुन चालताना जीव मुठीत धरून चालावे लागते. कारण एखादे चारचाकी वाहन जाताना कधी दगड उडुन लागेल काहीच सांगता येत नाही, असे शेतकऱ्यांनी सांगितले. संपूर्ण रस्ता उकरुन ठेऊन आज तीन महिने होत आले तरीही रस्त्याच्या कामाला का सुरूवात होत नाही? काम अर्धवट अवस्थेत सोडून संबंधित गुत्तेदार कुठे गायब झालेत? याकडे संबंधित अधिकारी का लक्ष देत नाहीत? लोकप्रतिनिधींनाही ही रस्त्याची अवस्था, नागरीकांचे होणारे प्रचंड हाल दिसत नाहीत का? असे एक ना अनेक प्रश्न तामलवाडी व वडगाव काटी, गंजेवाडी येथील नागरीक व शेतकरी वर्गातून उपस्थित केले जात आहेत.



**सोलापूर : महाराष्ट्रातील प्रसिद्ध गीतकार संगीतकार लेखक अभिनेता अष्टपैलू व्यक्तिमत्व असलेले श्री गुरु ठाकूर यांना श्री स्वामी समर्थांची मूर्ती व छत्रपती शिवाजी महाराजांची प्रतिमा भेट दिली.**

# शिष्यवृत्ती परीक्षा; जिल्ह्यातील १ हजार ६९२ विद्यार्थ्यांची दांडी

## २९६ केंद्रांवर ४६ हजार ९४६ विद्यार्थ्यांची उपस्थिती, शिक्षण विभागाचे नियोजन यशस्वी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ एप्रिल -**

शहर व जिल्ह्यातील शासनमान्य शाळांमधील इयत्ता चौथी (प्राथमिक) व सातवी (उच्च प्राथमिक) विद्यार्थ्यांसाठी रविवारी शिष्यवृत्ती परीक्षा शांततेत आणि सुरळीत पार पडली. जिल्ह्यातील एकूण २९६ परीक्षा केंद्रांवर ४६ हजार ९४६ विद्यार्थ्यांनी उपस्थिती लावली, तर १ हजार ६९२ विद्यार्थ्यांनी दांडी मारली.

प्राथमिक शिक्षणाधिकारी कादर शेख यांच्या नेतृत्वाखाली शिक्षण विभागाने केलेल्या नियोजनामुळे परीक्षा यशस्वीरीत्या पार पडल्याचे सांगण्यात आले. इयत्ता चौथीच्या शिष्यवृत्ती परीक्षेसाठी जिल्ह्यातून ३१ हजार ३३६ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी पेपर क्रमांक १ साठी ३० हजार ३१९ विद्यार्थी उपस्थित राहिले, तर १ हजार १७ विद्यार्थी गैरहजर होते. पेपर क्रमांक २ साठी ३० हजार २९२ विद्यार्थी उपस्थित राहिले असून १ हजार ४४ विद्यार्थी अनुपस्थित राहिले.

इयत्ता सातवीच्या परीक्षेसाठी १७ हजार ३०२ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी पेपर क्रमांक १ साठी १६ हजार ६२६ विद्यार्थी उपस्थित राहिले, तर ६७६ विद्यार्थी गैरहजर होते. पेपर क्रमांक २ मध्ये १६ हजार ६५४ विद्यार्थी उपस्थित राहिले असून ६४८ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली नाही.

एकूण उपस्थितीमध्ये इयत्ता चौथीतील ३० हजार २९२ आणि इयत्ता सातवीतील १६ हजार ६५४ विद्यार्थ्यांचा समावेश होता. या दोन्ही वर्गांतील मिळून १ हजार ६९२ विद्यार्थी अनुपस्थित राहिल्याची नोंद झाली. सर्व परीक्षा केंद्रांवर विद्यार्थ्यांसाठी आवश्यक सुविधा, सुरक्षा व्यवस्था आणि प्रशासकीय नियोजन करण्यात आले होते.परीक्षा शांततेत पार पडल्याने पालक आणि प्रशासनाने समाधान व्यक्त केले.

**CHANGE OF NAME**

I hereby declare that my Old Name :- **Aejaz Md. Razzaque Pyare** has been changed to New Name :- **Aejaz Abdul Razzaque Pyare** The person with both names is one and the same. Address:- 223, Telangi paccha Peth, Solapur - 413005

P-1740501

## मंगळवेढा नगरपरिषद, मंगळवेढा
**विद्युत विभाग**

**वार्षीक ई-निविदा सन २०२६-२७**

**ई-निविदा सूचना जा.क्र./कार्या-५/विद्युत/५९५/२०२६-२७ दि.२२/०४/२०२५**

मंगळवेढा नगरपरिषदेकडून खालील कामांकरीता ब-१ नमुन्यामध्ये दोन लिफाफा पध्दतीने (ई-निविदा पध्दतीने) अशा कामांचा दिर्घ अनुभव असलेल्या महाराष्ट्र शासनाचे सार्वजनिक बांधकाम (विद्युत) विभागाकडील नोंदणीकृत कंत्राटदारांकडून विद्युत कामांच्या वार्षीक ई-निविदा मागविण्यात येत आहेत. कामांची निविदा केवळ ई-निविदा पध्दतीने सादर करावयाची आहे.

निविदेचा वितृत नमूना महाराष्ट्र शासनाच्या https.//mahatender.gov.in या संकेतस्थळावर (वेबसाईटवर) दिनांक २७/०४/२०२६ पासून दिनांक ०४/०५/२०२६ पर्यंत उपलब्ध आहे. बयाणा रक्कम व कोरी टेंडर फॉर्म फी नेट बँकिंग पध्दतीने स्विकारली जाईल.

| अ. न. | कामांचे नाव | अंदाजे रक्कम रूपये (वार्षीक र. रु.) | बयाणा रक्कम | ई-निविदा विक्रीची किंमत |
|---|---|---|---|---|
| १ | विद्युत विभागाकडे आवश्यकतेप्रमाणे इलेक्ट्रीक साहित्य पुरवठा करणे तसेच इलेक्ट्रीक कामे करणे. | ४०,००,०००/- | ४०,०००/- | १,०००/- |
| २ | मंगळवेढा नगरपरिषद येथे कुशल, अर्धकुशल व अकुशल कंत्राटी पध्दतीने विद्युत विभागाकडे विविध कामे करण्याकरीता कर्मचारी पुरवठा करणे. | ९,००,०००/- | ९,०००/- | १,०००/- |
| ३ | मंगळवेढा नगरपरिषद विद्युत विभागाकडे विद्युतीकरणाच्या कामांचे रेखा नकाशे तयार करणे, अंदाजपत्रक तयार करून त्यास मजीप्रा/सार्व. बांधकाम कार्यालयाकडील तांत्रिक मंजूरी घेणेकामी विद्युत अभियंता/ कन्सलटिंग इंजिनिअर यांची टक्केवारी फी पध्दतीने नेमणूक करणे | ५,००,०००/- | ५,०००/- | ५००/- |

**शर्ती व अटीः-**

**१)** प्राप्त निविदापैकी कोणतीही एक अथवा सर्व निविदा कारण न देता नामंजूर करण्याचा अधिकार मुख्याधिकारी यांनी राखून ठेवलेला आहे. तसेच काहीही वाद झाल्यास सर्वाधिकार मुख्याधिकारी यांना असतील. सबब कारणे दिली जाणार नाहीत. **२)** इतर सर्व अटी व शर्ती ई-निविदा पत्रामध्ये (फॉर्मवर) देण्यांत आल्या आहेत.

**सही/-**
**(सुमित जाधव)**
**मुख्याधिकारी**
**मंगळवेढा नगरपरिषद**

**फॉर्म ''Z'' नोटीस नियम १०७ चे (उप नियम ११ (ड -११)**
**अन्वये स्थावर मिळकत ताबा नोटीस**

दिनांक :२३/०४/२०२६

ज्या अर्थी खाली सही करणार विशेष वसुली अधिकारी शरद नागरी सहकारी बँक लि. सोलापूर यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम चे कलम १५६ नियम १०७ (३) अन्वये मागणी नोटीस देऊन थकबाकीदार शिंगारे शिवाजी माणिक व शिंगारे वंदना शिवाजी (सहकर्जदार) तसेच जामीनदार कदम पांडुरंग निवृत्ती, शिंगारे विलास हरिबा, चव्हाण अनंत महादेव, इत्यादी यांना कर्जफेडीसाठी मागणी केली होती परंतु उपरोक्त जाब देणार यांनी नोटीसप्रमाणे रकमेचा भरणा केलेला नाही. त्यामुळे परिशिष्टात नमूद केलेली मिळकत खाली सही करणार वसुली अधिकारी यांनी दि. ०२/०३/२०२६ रोजीच्या जप्ती आदेशाप्रमाणे जप्त केली आहे.

ज्या अर्थी सदरील जप्ती आदेश पारित केल्यानंतर देखील उपरोक्त जाब देणार यांनी वैयक्तिक व संयुक्तरीत्या कर्ज रकमेचा भरणा केला नाही. उपरोक्त जाब देणार यांना सदरील मिळकतीचा ताबा देण्यासाठी नोटीस पाठवली होती. ज्याअर्थी वरील उल्लेखित कर्जदाराने सदर मिळकतीचा ताबा विशेष वसुली अधिकारी शरद नागरी सहकारी बँक लि, सोलापूर यांना देण्यास नकार दिल्याने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६१ चे नियम १०७ (११(ड -११)) अन्वये प्रतीकात्मक ताबा (symbolic possession) दि. २०/०३/२०२६ रोजी दोन पंचांच्या समक्ष त्यांच्या सहीने घेतला आहे.

तरी उपरोक्त जाब देणार व तमाम लोकांस सूचित करण्यात येते कि, खालील परिशिष्टात वर्णन केलेल्या मिळकती संदर्भात कोणीही, कोणताही, कसल्याही प्रकारचा व्यवहार शरद नागरी सहकारी बँक लि, सोलापूर यांच्या लेखी परवानगी शिवाय करू नये आणि जर केल्यास सदरील व्यवहार शरद नागरी बँक सहकारी लि, सोलापूर यांच्यावर बंधनकारक असणार नाही. आणि सदरील मिळकतीवरील बँकेचा दि. २८/०२/२०२६ अखेर रक्कम रु. २१,२५,६०३/- अक्षरी. एकवीस लाख पंचवीस हजार सहाशे तीन रुपये व व्याज इतर खर्चाचा बोजा अबाधित राहील यांची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

१) मौजे :- रांझणी ता. पंढरपूर येथील शेतजमीन गट नं. ५०/१/क/१/ब एकूण क्षेत्र २ हे. ०० आर यासी चतुःसिमा येणेप्रमाणे,
पूर्वेस - गट नं. ५०/१/क/१/ब मोहन रावसाहेब शिंदे यांची शेत जमीन
दक्षिणेस - बाळासाहेब प्रल्हाद शिंदे यांची शेत जमीन
पश्चिमेस - कॅनॉल उत्तरेस - आनंदराव आवताडे यांची शेत जमीन
(सदरीची मिळकत कर्जदारः-श्री. शिवाजी माणिक शिंगारे यांच्या मालकीची आहे)
२) मौजे :- सुस्ते ता. पंढरपूर येथील शेतजमीन गट नं. ३८२/१ एकूण क्षेत्र ० हे. ४२ आर यासी चतुःसिमा येणेप्रमाणे,
पूर्वेस - गट नं. ३८७ दक्षिणेस - दिलीप ज्ञानोबा शिंगारे यांची शेत जमीन
पश्चिमेस - धनंजय सुभाष शिंगारे यांची शेत जमीन
उत्तरेस - अनिल शिंगारे यांची शेत जमीन
(सदरीची मिळकत कर्जदारः-श्री. शिवाजी माणिक शिंगारे यांच्या मालकीची आहे)
३) मौजे :- सुस्ते ता. पंढरपूर येथील शेतजमीन गट नं. ३८७ एकूण क्षेत्र १ हे. ४१ आर यासी चतुःसिमा येणेप्रमाणे,
पूर्वेस - बाळासाहेब सपाटे यांची शेत जमीन, दक्षिणेस - विलास हरिबा शिंगारे यांची शेत जमीन, पश्चिमेस - गट नं. ३८२, उत्तरेस - दत्तात्रय शंकर चव्हाण यांची शेतजमीन
(सदरीची मिळकत कर्जदारः-श्री. शिवाजी माणिक शिंगारे यांच्या मालकीची आहे)
४) मौजे :- सुस्ते ता. पंढरपूर येथील शेतजमीन गट नं. ४९०/१/ब क्षेत्र ० हे. ९२ आर. यासी चतुःसिमा, पूर्वेस - तारापूर - शिव रस्ता, दक्षिणेस - गट नं. ४९१, पश्चिमेस - सुस्ते तुंगत रस्ता, उत्तरेस - गट नं. ४८९ व गट क्र. ७/१ क्षेत्र ० हे. ४३ आर. यासी चतुःसिमा येणेप्रमाणे पूर्वेस - गट नं. ७ पैकी, दक्षिणेस - रोड, पश्चिमेस - गट नं- ८, उत्तरेस - गावठाण पैकी
(सदरीची मिळकत जामीनदार :- श्री. कदम पांडुरंग निवृत्ती मालकीची आहे)
५) मौजे :- सुस्ते ता. पंढरपूर येथील शेतजमीन गट नं. ३८३ एकूण क्षेत्र १ हे. ८१ आर यासी चतुःसिमा येणेप्रमाणे,
पूर्वेस - गट नं. ३९२ व गट नं. ३९९, दक्षिणेस - सुस्ते - ईश्वर वठार रस्ता, पश्चिमेस - गट नं. ३८२, उत्तरेस - गट नं. १) ३८७ २) ३८५ ३) ३९०
(सदरीची मिळकत जामीनदार :- श्री. विलास हरिबा शिंगारे मालकीची आहे)
६) मौजे :- देगांव, ता. पंढरपूर येथील शेतजमीन गट नं. १९/२ एकूण क्षेत्र ० हे. ८० आर यास चतुःसिमा येणेप्रमाणे,
पूर्वेस - गट नं. १९/३, दक्षिणेस - गट नं. १८, पश्चिमेस - गट नं. १९/१, उत्तरेस - रस्ता
(सदरीची मिळकत जामीनदार :- श्री. अनंत महादेव चव्हाण मालकीची आहे)

**सही/-**
**विशेष वसुली अधिकारी**
**शरद नागरी सहकारी बँक**
**लि.सोलापूर**

दिनांक - २३/०४/२०२६
ठिकाण - सुस्ते व रांझणी ता.पंढरपूर, जि.सोलापूर.
कर्जदार - शिंगारे शिवाजी माणिक व शिंगारे वंदना शिवाजी (सहकर्जदार)
जामीनदार - तसेच जामीनदार कदम पांडुरंग निवृत्ती, शिंगारे विलास हरिबा, चव्हाण अनंत महादेव.




## महत्त्वाचे

### हेमंत बर्मनला रौप्यपदक; १६ पदकांसह भारत अव्वल



**कैरो** : पुरुष गटातील ५० मीटर रायफल ३-पोझिशन्स प्रकारात हेमंत बर्मनने रौप्यपदक जिंकले, तर ट्रॅप मिश्र सांघिक प्रकारात झुहैर खान आणि आद्या कात्याल या जोडीने कांस्यपदक पटकावले. या कामगिरीसह, इजिप्तमधील कैरो येथे पार पडलेल्या आयएसएसएफ कनिष्ठ गट विश्वचषक (रायफल/ पिस्तूल/ शॉटगन) स्पर्धेत भारताने एकूण १६ पदके (पाच सुवर्ण, सहा रौप्य आणि पाच कांस्य) जिंकत पदकतालिकेत अव्वल स्थान मिळवले. पुरुष गटातील ५० मीटर ३-पोझिशन्स प्रकारातील तीनही पोझिशन्समध्ये ३५१.७ गुण मिळवत हेमंतने ही कामगिरी केली. या १८ वर्षीय हेमंतने ५७८-२४ गुणांसह सातव्या क्रमांकावर राहत अंतिम फेरीसाठी पात्रता मिळवली होती. कझाकस्तानच्या ओलेग नोस्कोव्हने ३५५.६ गुणांचा नवीन ज्युनियर विश्वविक्रम प्रस्थापित करत सुवर्णपदक जिंकले, तर उझबेकिस्तानच्या निकिता सोलोकोव्हने ३४१.२ गुणांसह कांस्य पदक पटकावले. पात्रता फेरीत सहभागी झालेले इतर भारतीय नेमबाज - मानवेंद्र सिंग शेखावत (५७८-२३), कुशग्र सिंग राजावत (५७६-२४) आणि हितेश श्रीनिवासन (५७४-२६) - हे अव्वल आठ स्पर्धकांमध्ये स्थान मिळवण्यात अपयशी ठरले. ■

### सत्ता पक्षाने बंगालच्या क्रीडा संस्कृतीचे नुकसान केले : मोदी

**कोलकाता** : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी, गत वर्षी अर्जेंटिनाचा फुटबॉल सुपरस्टार लिओनेल मेस्सी याच्या कोलकाता येथील सॉल्ट लेक स्टेडियमला दिलेल्या भेटीच्या नियोजनातील त्रुटींवरून तृणमूल काँग्रेसवर टीका केली. या कार्यक्रमातील गैरव्यवस्थापनाचे खापर त्यांनी तृणमूल काँग्रेसच्या महा जंगलराजवर फोडले. तसेच, येथील सत्ताधारी पक्षाने राज्याच्या क्रीडा संस्कृतीचे नुकसान केले आहे, असेही त्यांनी नमूद केले. तृणमूलच्या एका गटाने येथील क्रीडा व्यवस्थेचा नाश केला आहे. अवघ्या काही महिन्यांपूर्वीच कोलकातामध्ये जे काही घडले आणि ज्याची छायाचित्रे जगभरातील फुटबॉल चाहत्यांपर्यंत पोहोचली, ते सर्व या महा जंगलराजचाच परिणाम होते. मी बंगालच्या खेळाडूंना खात्री देतो की, खेलो इंडिया मोहिमेअंतर्गत बंगालमध्ये एक नवी क्रीडा व्यवस्था उभारली जाईल, असे पंतप्रधान मोदी म्हणाले. भाजपा बंगालच्या क्रीडा संस्कृतीला नवी चालना देईल, असे आश्वासन त्यांनी यावेळी तेथील जनतेला दिले.

### दीक्षा डागर २४ व्या स्थानी



**केप टाऊन** : येथे सुरू असलेल्या इन्वेस्टेक एसए वुमेन्स ओपन गोल्फ स्पर्धेत, अत्यंत कठीण आणि सोसाट्याचा वारा असलेल्या दिवशी भारतीय गोल्फपटू दीक्षा डागरला चार बोगींच्या तुलनेत केवळ एकच बर्डी नोंदविता आली. लेडीज युरोपियन टूरच्या या स्पर्धेत अजून एक दिवस बाकी असताना, दीक्षाची क्रमवारी घसरली असून ती संयुक्तपणे २४ व्या स्थानावर पोहोचली आहे. मात्र, ओव्हर-पार फेऱ्या खेळूनही, प्रणवी उर्स आणि अवनी प्रशांतने आपली क्रमवारी सुधारली. पिया बाबनिक आणि एस्मे हॅमिल्टन या दोघी संयुक्तपणे लेडीज युरोपियन टूरच्या या स्पर्धेत आघाडीवर आहेत. त्वेसा मलिक आणि वाणी कपूरसह अनेक भारतीय गोल्फपटूंना पुढच्या फेरीसाठी पात्र होण्याची मर्यादा गाठता आला नाही.

### जलद गोलंदाजी ही एक कठीण कला : ओव्हर्टन

**चेन्नई** : जलद गोलंदाजी ही एक कठीण कला आहे आणि तुम्ही प्रत्येक वेळी १५० किमी प्रति तास वेगाने गोलंदाजी करू शकत नाही. यात शक्य तितका वेग सातत्याने टिकवून ठेवणे महत्त्वाचे असते. हे कठीण नक्कीच आहे, पण सध्या मी या प्रक्रियेचा आनंद घेत आहे, असे चेन्नई सुपर किंग्जचा वेगवान गोलंदाज जेमी ओव्हर्टन गुजरात टायटन्सविरुद्धच्या सामन्यापूर्वी म्हणाला. जलद गोलंदाजीसाठी प्रचंड सहनशक्ती, लय आणि परिस्थितीनुसार सतत जुळवून घेण्याची क्षमता आवश्यक असते. या आव्हानांचा स्वीकार करणे हीच माझी आयपीएलमधील भूमिका आहे, असे तो म्हणाला. मी संपूर्ण उन्हाळ्यात जे करत आलो आहे, त्याचाच हा एक पुढचा भाग सातत्य आहे. बिग बॅश स्पर्धेत व विश्वचषकातही मी अशीच काहीशी भूमिका निभावत होतो असे मला वाटते. मी शक्य तितक्या जोरात व अचूकपणे यष्टींवर मारा करण्याचा प्रयत्न करीत असतो, असे तो म्हणाला. ■

# गुजरातने चेन्नईचे मनसुबे उधळले

## सामनावीर रबाडा, सलामीवीर साई सुदर्शनची जबरदस्त कामगिरी

### ऋतुराज गायकवाडची खेळी व्यर्थ

◆ **चेन्नई, २६ एप्रिल**

रविवारी एम. ए. चिदम्बरम् स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या आयपीएल सामन्यात गुजरात टायटन्सने यजमान चेन्नई सुपर किंग्सचजे मनसुबे उधळून लावले. गुजरातने चेन्नईवर २० चेंडू शिल्लकठेवित ८ गड्यांनी शानदार विजय नोंदविला.

गुजरात टायटन्सने नाणेफेक जिंकून चेन्नईला प्रथम फलंदाजीसाठी पाचारण केले. कर्णधार शुभमन गिलचा निर्णय योग्य ठरवित कॅगिसो रबाडासह इतर गोलंदाजांनी प्रभावी मारा केला आणि चेन्नईला २० षटकांत ७ बाद १५८ धावांवर रोखले. प्रत्युत्तरात गुजरात टायटन्सने १६.४ षटकांत २ ब ाद १६२ धावा काढून आपला विजय साकार केला. आयपीएलमधील सर्वोत्तम नवीन चेंडूच्या आक्रमणाने पॉवरप्लेमध्ये केलेल्या झंझावाताने चेन्नई सुपर किंग्सला नामोहरम केले. सीएसके गुजरातविरुद्ध आपल्या विजयाची लय कायम राखण्यात अपयशी ठरला. २५ धावांत ३ बळी टिपणारा कॅगिसो रबाडा सामनावीर पुरस्काराचा मानकरी ठरला.



साई सुदर्शन व शुभमन गिलची ५८ धावांची सलामी भागीदारी

या विजयाबरोबरच गुजरात टायटन्सने ८ गुणांसह गुणतालिकेत सातव्या स्थानावरून पाचव्या स्थानावर झेप घेतली, तर यापूर्वी हे स्थान टिकवून असलेला सीएसके (६ गुण) आता सहाव्या स्थानावर घसरला आहे.

संजू सॅमसन व कर्णधार ऋतुराज गायकवाड नेहमीप्रमाणे सलामीला आले, परंतु यावेळी सॅमसनची बॅट तळपली नाही, तर गायकवाडला सूर गवसला. या दोघांनी २१ धावांची सलामी भागीदारी केली असताना रबाडाने सीएसकेला पहिला धक्का दिला. रबाडाने सॅमसनला (११) बटलरकडून झेलबाद केले. पुढे ऋतुराज गायकवाडने जबाबदारीपूर्वक फलंदाजी केली, परंतु दुसऱ्या टोकावरून त्याला सहकाऱ्यांची पुरेशी साथ मिळत नव्हती. ऋतुराजने एका बाजूने एकाकी किल्ला लढवित नाबाद



कॅगिसो रबाडाचे २५ धावांत ३ बळी

७४ धावांची खेळी करून सीएसकेला २० षटकांत ७ बाद १५८ धावांचा टप्पा गाठून दिला. गायकवाडने आपल्या ६० चेंडूंच्या खेळीत ६ चौकार व ४ षट्कार खेचलेत. यादरम्यान गायकवाडला शिवम दुबे ( २२) व कार्तिक शर्माची (१८)थोडी फार साथ मिळाली, परंतु इतर फलंदाज रबाडासह मोहम्मद सिराज, सुथार व अर्शद खानच्या गोलंदाजीला बळी पडले.

गुजरातकडून रबाडाने ३ बळी, अर्शद खानने २ बळी, तर मोहम्मद सिराज व मानव सुथारने प्रत्येकी एक बळी टिपण्यात यश मिळविले.

सलामीवीर बी. साई सुदर्शनने ४६ चेंडूंमध्ये ४ चौकार व ७ षट्कारांच्या मदतीने ८७ धावा करून धावांचा पाठलाग यशस्वी केला. सुदर्शनने शुभमन गिलच्या साथीने ५८ धावांची सलामी भागीदारी करून गुजरातचा विजयाचा इरादा स्पष्ट केला. नूर अहमदच्या गोलंदाजीला बळी पडण्यापूर्वी गिलने २३ चेंडूंत १ चौकार व ३ षट्कारांसह ३३ धावांची खेळी केली. पुढे साई सुदर्शनने जोस बटलरच्या मदतीने संघाला विजयाच्या समीप आणले असतानाच अकील हुसेनने सुदर्शनला रोखले. ब्रेव्हिसने घेतलेल्या एका अप्रतिम झेलमुळे सुदर्शनला तंबूचा रस्ता धरावा लागला. साई सुदर्शनने अवघ्या ४६ चेंडूंत ४ चौकार व ७ षट्कारांसह ८७ धावांची खेळी केली. सुदर्शनने गत सामन्यातील शतकानंतर आपल्या घरच्या मैदानावर अर्धशतक झळकावले. तोपर्यंत गुजरातने १६.२ षटकांत २ बाद १५५ धावा केल्या होत्या. पुढे जोस बटलरने वॉशिंग्टन सुंदरच्या साथीने संघाला विजय साकार केला. (वृत्तसंस्था)

# भारतीय महिलांचा युक्रेनवर ४-१ ने विजय

## थॉमस-उबर चषक बॅडमिंटन







◆ **हॉर्सेन्स, २६ एप्रिल**

रविवारी रात्री डेन्मार्कच्या हॉर्सेन्स येथे गट अ मधील दुसऱ्या सामन्यात, युरोपियन चॅम्पियनशिपमधील कांस्यपदक विजेत्या युक्रेनचा ४-१ ने पराभव करीत भारतीय महिलांच्या युवा संघाने थॉमस व उबर चषक बॅडमिंटन स्पर्धेत आपला पहिला विजय नोंदवला.

भारतीय संघाने एकेरीच्या सामन्यांमध्ये माजी विश्वविजेती पी.व्ही. सिंधूला विश्रांती देण्याचा निर्णय घेतला आणि तिसऱ्या एकेरीच्या सामन्यात २०२६ च्या थायलंड मास्टर्स विजेती देविका सिहागला संधी दिली.

भारतासाठी सामन्यांची सुरुवात उन्नती हुडाने केली. तिने पोलिना बुह्रोवाचा २१-१९, २२-२० अशा गुणांनी पराभव केला. त्यानंतर, कनिष्ठ गट विश्व स्पर्धेतील रौप्यपदक विजेत्या तन्वी शर्माने येव्हेनिया कान्तेमिरला २१-१२, १७-२१, २१-१० ने हरवून भारताची आघाडी दुप्पट केली.

त्यानंतर देविकाने मारिया स्टोलियारेन्कोचा २३-२१, २१-१३ ने पराभव करीत भारताचा विजय निश्चित केला.

भारताला एकमेव अपयश पहिल्या दुहेरीच्या सामन्यात आले. या सामन्यात कविप्रिया सेल्वम-वसिमरन सिंघी या जोडीला बुह्रोवा आणि कान्तेमिर यांच्याकडून ११-२१, १७-२१ ने पराभव पत्करावा लागला. त्यानंतर सिंधू व तनिषा क्रास्टो या जोडीने स्टोलियारेन्को आणि सोफिया लावरोवा यांचा २१-१८, २१-१५ ने पराभव करीत भारताचा अंतिम गुणफलक पूर्ण केला.

आता सोमवारी होणाऱ्या आपल्या गटातील शेवटच्या सामन्यात या महिला संघाला बलाढ्य चीनचा सामना करावा लागणार आहे. उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश करण्याची संधी मिळविण्यासाठी, या संघाला गतविजेत्या चीनचा पराभव करणे अनिवार्य असेल.

**निकाल :- महिला विभाग : भारताची युक्रेनवर ४-१ ने मात**

(उन्नती हुडा मात पोलिना बुह्रोवा २१-१९, २२-२०. तन्वी शर्मा मात येव्हेनिया कॉंटेमिर २१-१२, १७-२१, २१-१०. देविका सिहाग मात मारिया स्टोलियारेन्को २३-२१, २१-१३. कविप्रिया सेल्वम- वसिमरन सिंघी पराभूत वि. बुह्रोवा-कान्तेमिर ११-२१, १७-२१. तनिषा क्रास्टो-सिंधू मात सोफिया लव्हरोवा-स्टोलियारेन्को २१-१८, २१-१५) (वृत्तसंस्था)

# लुंगी नगिदीला रुग्णालयातून सुटी

◆ **नवी दिल्ली, २६ एप्रिल**

सध्या सुरू असलेल्या इंडियन प्रीमियर लीगमध्ये शनिवारी दिल्ली कॅपिटल्स व पंजाब किंग्स यांच्यातील सामन्यादरम्यान डोक्याला दुखापत झाल्यानंतर, दक्षिण आफ्रिकेचा वेगवान गोलंदाज लुंगी नगिदीने एक दिलासादायक माहिती दिली आहे. 'तुमच्या संदेशांसाठी धन्यवाद, सर्व काही ठीक आहे,' असे नगिदीने रविवारी आपल्या इन्स्टाग्राम स्टोरीवर लिहिले.

शनिवारी नवी दिल्ली येथे पंजाब किंग्सविरुद्धच्या सामन्यात दुखापत झाल्यानंतर लुंगी नगिदीला एअका स्थानिक रुग्णालयात वैद्यकीय तपासणीसाठी नेण्यात आले होते. ही तपासणी पूर्ण झाल्यानंतर त्याला रुग्णालयातून सुटी देण्यात आली.

एका झेलचा प्रयत्न करत असताना जमिनीवर जोरात पडून डोक्याला मार लागल्यामुळे, या दक्षिण आफ्रिकन खेळाडूला रुग्णवाहिकेतून मैदानाबाहेर नेण्यात आले. वैद्यकीय तपासणीसाठी त्याला नवी दिल्लीतील पुसा रोड येथील मॅक्स हॉस्पिटलमध्ये तातडीने दाखल करण्यात आले होते. (वृत्तसंस्था)

# बंगळुरूचे आव्हान स्वीकारण्यास दिल्ली सज्ज

◆ **नवी दिल्ली, २६ एप्रिल**

२६४ धावा करूनही झालेल्या मोठ्या पराभवामुळे दुखावलेल्या दिल्ली कॅपिटल्सकडे भावनिकदृष्ट्या सावरण्यासाठी फार कमी वेळ आहे, कारण सोमवारी नवी दिल्लीत होणाऱ्या आयपीएल सामन्यात त्यांचा सामना गतविजेत्या रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू या आणखी एका बलाढ्य संघाशी होणार आहे.

पंजाब किंग्सकडून सहा गडी राखून झालेल्या पराभवामुळे दिल्ली कॅपिटल्स हादरली आहे. या सामन्यात विक्रमी धावसंख्येचा पाठलाग करताना त्यांच्या गोलंदाजांची धुलाई झाली.

गुणतालिकेत सहाव्या स्थानावर असलेला हा संघ आता प्ले-ऑफच्या चुरशीच्या शर्यतीत अडकला आहे, जिथे आणखी एक पराभव त्यांच्या संधींना गंभीर धक्का देऊ शकतो.





दिल्ली कॅपिटल्सने आतापर्यंत सातपैकी तीन सामन्यात विजय मिळविला व त्यांना चार सामन्यात पराभव पत्करला. ते ६ गुणांसह सहाव्या स्थानावर आहे. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने सातपैकी पाच सामने जिंकले व त्यांना दोन सामन्यात पराभव पत्करावा लागला, ते १० गुणांसह दुसऱ्या स्थानावर आहे.

दिल्लीची आतापर्यंतची मोहीम शानदार फलंदाजीने गाजली आहे, परंतु गोलंदाजीतील कामगिरी मात्र सातत्यपूर्ण नाही.

केएल राहुलच्या नेतृत्वाखालील त्यांच्या आघाडीच्या फळीने वारंवार धडाकेबाज सुरुवात करून दिली आहे, तर नितीश राणा आणि डेव्हिड मिलरसारख्या गोलंदाजांनी मधल्या षटकांमध्येही धावगती कायम राखली आहे.

मात्र, धावसंख्येचा पाठलाग करताना मिळालेल्या माफक यशानंतर, मोठ्या धावसंख्येचाही बचाव करण्यात आलेले अपयश ही चिंतेची बाब आहे. विशेषतः, अखेरच्या षटकांमध्ये गोलंदाजी दबावाखाली कमकुवत दिसत आहे. त्यामुळे त्यांच्या गोलंदाजी विभागावर अतिरिक्त जबाबदारी येते.

जर दिल्लीला अलीकडच्या सामन्यांमध्ये केलेल्या त्रुटी दूर करायच्या असतील, तर वेगवान गोलंदाज आकिब नबी, कुलदीप यादव आणि कर्णधार अक्षर पटेलला विशेषतः निर्णायक क्षणी, लक्षणीय कामगिरी करावी लागेल.

याउलट, आरसीबीने सर्व विभागांमध्ये अधिक संतुलन दाखविले आहे. आरसीबीची फलदाजी विराट कोहलीच्या नेतृत्वाखालील अव्वल फळीतील फलंदाजाच्या भक्कम योगदानावर अवलंबून आहे. कोहली व देवदत्त पडिक्कलच्या फॉर्ममध्ये परतल्याने संघाला आणखी खोली आणि स्थिरता मिळाली आहे. मधल्या फळीनेही सामने जिंकून देण्यात अधिक निर्णायक भूमिका बजावली आहे.

आरसीबीच्या गोलंदाजी विभागाने दबावाखाली प्रभावी संयम दाखवला. गुजरातविरुद्ध सुयश शर्मा, भुवनेश्वर कुमार व जोश हेझलवूड या त्रिकुटाने अखेरच्या षटकांमध्ये आपल्या योजनांची अचूक अंमलबजावणी केली. (वृत्तसंस्था)

**आजचा सामना**

**दिल्ली कॅपिटल्स**
**वि. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू**
**स्थळ** : अरुण जेटली स्टेडियम, नवी दिल्ली
**वेळ** : सायंकाळी ७.३० वाजतापासून
**थेट प्रसारण** : स्टार स्पोर्ट्सवर

# मोहसीनच्या भेदक माऱ्यापुढे कोलकाता नतमस्तक

### मोहसिनचे पाच बळी; केकेआर ७ बाद १५५

◆ **लखनौ, २६ एप्रिल**

१९ व्या इंडियन प्रीमियर लीग हंगामात रविवारी एकाना स्टेडियमवर आयपीएल सामन्यात लखनौ सुपर जायण्टसच्या डावखुरा मध्यम वेगवान गोलंदाज मोहसीन खानने घरच्या खेळपट्टीवर कमालीची गोलंदाजी केली आणि कोलकाता नाईट रायडर्सच्या फलंदाजीच्या चिंधड्या उडविल्या, सहाव्या क्रमांकावर फलंदाजीस आलेल्या रिंकू सिंगने केलेल्या नाबाद ८३ धावांच्या आधारावर कोलकाता नाईट रायडर्सने २० षटकांत ७ बाद १५५ धावा रचल्या. त्यामुळे लखनौ सुपर जायण्टस् संघासमोर विजयासाठी १५६ धावा काढण्याचे सोपे लक्ष्य



मोहसीन खान : २३ धावांत ५ बळी

राहिले. मोहसीन खानने २३ धावांत ५ बळी टिपण्याची किमया केली.

लखनौ संघाचा कर्णधार ऋषभ पंतने नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला. कर्णधाराचा




निर्णय योग्य ठरवित मोहसीन खानने कोलकाताच्या सलामीवीरांना स्वस्तात बाद केले. मोहसीनने सलामीवीर टिम सेफर्टला (०) चौधरीकडून, तर अजिंक्य रहाणेला (१०) एडन मार्करामकडून झेलबाद केले. कोलकाताने ३.४ षटकांत १६ धावांत दोन महत्त्वपूर्ण फलंदाज गमावले.

त्यानंतर युवा फलंदाज अंगकृश रघुवंशी व कॅमेरून ग्रीनने केकेआरचा डाव सावरण्याचा प्रयत्न केला, परंतु पाचव्या षटकादरम्यान एक गोंधळ उडाला. रघुवंशीने चेंडू मिड-ऑनच्या दिशेने पंच केला आणि धाव घेण्यासाठी निघाला; मात्र अर्ध्या वाटेतूनच त्याला माघारी पाठवण्यात आले. तो मैदानावर आडवा पडला व या गडबडीत त्याला शमीने फेकलेला चेंडूही लागला. लखनौच्या खेळाडूंनी पंचांकडे अपील केली होती. रघुवंशीने चेंडूच्या फेकीच्या रेषेत येण्यासाठी आपली दिशा बदलली होती. निर्णयासाठी तिसऱ्या पंचांना पाचारण करण्यात आले आहे आणि तिसऱ्या पंचांच्या मते, रघुवंशीने आपली दिशा बदलली होती, परिणामी रघुवंशीला आता माघारी लागले. कोलकात्याने २७ धावांत ३ फलंदाज गमावले. त्यानंतर मोहसीन खानने कोलकात्याला आणखी दोन हादरे दिले. त्याने रोवमन पॉवेल (१) व कॅमेरॉन ग्रीनला यष्टीमागे पंतकडे झेल सोपविण्यास भाग पाडले. कॅमेरॉन ग्रीनने २१ चेंडूंत ३४ धावांची भर घातली. तोपर्यंत कोलकाताने १०.५ षटकांत ७३ धावांत निम्मा संघ गमावला होता.

पुढे रिंकू सिंगने एक टोकावरून बाजू सांभाळीत अनुकूल रॉय (०), रमणदीप सिंग (६) व सुनील नरेनच्या (नाबाद ४) साथीने कोलकाता संघाला २० षटकांत ७ बाद १५५ धावांचा टप्पा गाठून दिला. रिंकू सिंगने ५१ चेंडूंत ७ चौकार व ५ षट्कारांसह नाबाद ८३ धावांची खेळी केली.

लखनौकडून मोहसीन खानने २३ धावांत ५ बळी व जॉर्ज लिंडेने एक बळी टिपला. (वृत्तसंस्था)

# कोको गॉफ चौथ्या फेरीत


**माद्रिद** : जागतिक क्रमवारीत तिसऱ्या क्रमांकावर असलेल्या कोको गॉफने रविवारी माद्रिद ओपन टेनिस स्पर्धेत रोमानियाच्या सोराना सिर्स्टियाचा पराभव केला आणि स्पर्धेच्या चौथ्या फेरीत आपले स्थान निश्चित केले. गत वर्षी या स्पर्धेत उपविजेतेपद पटकावणाऱ्या या २२ वर्षीय अमेरिकन खेळाडूने, एका सेट व एका ब्रेकची पिछाडी भरून काढत ४-६, ७-५, ६-१ असा संघर्षपूर्ण विजय मिळविला. हा सामना तिच्या शारीरिक क्षमतेची आणि मानसिक कणखरतेची कसोटी पाहणारा ठरला. २५ वे मानांकन मिळालेल्या आणि कदाचित आपल्या कारकिर्दीतील शेवटचा हंगाम खेळत असलेल्या सिर्स्टियाने सामन्याची सुरुवात आत्मविश्वासाने केली. पहिल्याच सेटमध्ये तिने सुरुवातीलाच गॉफची सर्व्हिस ब्रेक केली आणि अमेरिकन खेळाडूने ४-४ अशी बरोबरी साधली. असतानाही सामन्यावरील आपले नियंत्रण कायम राखले. रोमानियाच्या या खेळाडूने आणखी एक ब्रेक मिळवत पुन्हा आघाडी घेतली आणि त्यानंतर ६-४ अशा फरकाने पहिला सेट आपल्या नावावर केला. ■


# संजीवनी जाधवची हॅट्ट्रिक, हरमनजोत सिंगही चमकला

### टीसीएस १० के शर्यत

◆ **बंगळुरू, २६ एप्रिल**

रविवारी येथे आयोजित टीसीएस वर्ल्ड १० या वर्ल्ड ॲथ्लेटिक्स गोल्ड लेबल शर्यतीत पुरुष व महिला गटांत हरमनजोत सिंग व संजीवनी जाधवने भारतीय धावपटूंच्या कामगिरीचे नेतृत्व केले. त्यांनी आपापल्या गटांमध्ये उत्कृष्ट धाव घेत सर्वोच्च सन्मान मिळविला, तसेच अनुक्रमे ३,००,००० आणि २,७५,००० रुपये इतकी बक्षीस रक्कमही पटकावली.





हरमनजोतने २९:१३ अशी वेळ नोंदवित सर्वात वेगवान भारतीय धावपटूचा मान मिळवला; मात्र तो स्पर्धेच्या विक्रमापेक्षा (इव्हेंट रेकॉर्ड) केवळ एका सेकंदाने मागे राहिला आणि १,००,००० रुपयांच्या अतिरिक्त बोनसला थोडक्यात मुकला. दरम्यान, त्यानंतर लगेचच कर्नाटकचे शैलेश कुशवाह (२९:२१) व दीपक भट्टने (२९:५२) अनुक्रमे दुसरे व तिसरे स्थान पटकावले.


संजीवनीने या स्पर्धेतील आपली उत्कृष्ट कामगिरी कायम राखत ३५:०१ अशी वेळ नोंदवली आणि सलग तिसरे, तसेच एकूण पाचवे विजेतेपद आपल्या नावी केले. दुसऱ्या स्थानासाठी सोनियाने (३५:३१) भागीरथीला (३५:३२) अगदी थोड्या फरकाने मागे टाकले आणि गेल्या वर्षीच्या सहाव्या स्थानातील कामगिरीत सुधारणा केली. (वृत्तसंस्था)

# सिंहगड स्कूलच्या विद्यार्थ्यांची साऊथ एशियन गोल शॉट बॉल स्पर्धेसाठी निवड

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ एप्रिल-**

सिंहगड पब्लिक स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज केगाव येथील विद्यार्थ्यांची साऊथ एशियन गोल शॉट बॉल चॅम्पियनशिप २०२६ साठी भारतीय संघात निवड झाली आहे. कोलंबो, श्रीलंका येथे २४ ते २८ एप्रिल या कालावधीत येथे सुरू झालेल्या या स्पर्धेत हे सहभागी झाले आहेत.

सब-ज्युनिअर गर्ल्स गटात सिंहगड पब्लिक स्कूलच्या जानवी दिनेश बुराडे (इयत्ता ८ वी) हिची तसेच युथ गर्ल्स संघात श्रद्धा बालाजीसिंग चव्हाण (इयत्ता १० वी) व आर्या मनीषा रविंद्र पाटणे (इयत्ता १२ वी) यांची निवड झाली आहे.



तसेच सब-ज्युनिअर बॉईज संघात आदित्य गणेश गुंड (इयत्ता ८ वी), आशिष अविनाश बनसोडे (इयत्ता ९ वी) व समर्थ रमेश मगर (इयत्ता ९ वी) यांची निवड झाली आहे. युथ बॉईज संघात अथर्व वेणुगोपाल गुर्रम (इयत्ता १० वी) व वरुण विजयकुमार सरडा (इयत्ता १० वी) यांचा समावेश आहे.

या यशाबद्दल सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळाचे सहसचिव तथा कॅम्पस डायरेक्टर संजय नवले यांनी सिंहगड इन्स्टिट्यूटच्या सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांना स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

# स्मार्ट व समृध्द गाव नरोटेवाडीचं आता हरित क्रांतीचे देखील स्वप्न साकारणार

## जलपूजन करताना नागरिकांचा आनंद गगनात मावेना

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ एप्रिल-**

स्मार्ट गाव बहुमानानंतर समृद्ध गाव स्पर्धेत जिंकायचं म्हणून काम करीत असलेल्या नरोटेवाडी गावातील शेतकऱ्यांच्या हरीतक्रांतीचं स्वप्न पुर्ण होणार असून शिरापूर उपसा सिंचन योजनेअंतर्गत पाणी नरोटेवाडीपर्यत सोडण्याची चाचणी घेण्यात आली. यावेळी उजनीची गंगा अंगणी आल्याचा आनंद नागरीकांनी जलपुजन करुन व्यक्त केला.

उत्तर सोलापूर तालुक्यातील नरोटेवाडी गावातील नागरिकांनी एकीचे बळावर शासनाच्या स्व.आर आर पाटील स्वच्छ व सुंदर गाव स्पर्धेत तालुक्यात प्रथम क्रमांक मिळविला आता शासनाच्या मुख्यमंत्री समृद्ध गाव पंचायत राज अभियानात जिंकायचं या ध्येयाने वाटचाल करीत



आहे.या गावातील बचत गटाच्या माध्यमातून महिलांनी सुरू केलेला शिवणकाम उद्योग हा जिल्ह्यात आदर्श पॅटर्न ठरला आहे.मात्र गेली अनेक वर्षांपासून उजनीचं

### पाणी शेतकऱ्यांसाठी सर्वस्व-भगत

शासन शेतकऱ्यांना विविध योजनेतून मदत करीत असले तरी पाणी हे शेती व शेतकऱ्यांसाठी सर्वस्व आहे शिरापूर योजना ही उत्तर सोलापूर सह नरोटेवाडी गावातील शेतकऱ्यांसाठी हरीत क्रांतीचे स्वप्न पुर्ण करणारी असून आजचा क्षण आमचे गावासाठी सोनेरी असल्याचे सरपंच उमेश भगत यांनी सांगितले

पाणी गावास येणार येणार या प्रतिक्षेत शेतकरी होते.

उजनीच्या शिरापूर उपसा सिंचन योजनेच्या नान्नज फाट्यावरून पुढे नरोटेवाडी पर्यंत झालेल्या कामांची जलसंपदा विभागाने पाणी सोडून चाचणी घेतली. कसलाही अडथळा न येता पाणी नरोटेवाडीच्या ओढीने पोहचल्याचा आनंद नागरीक शेतकऱ्यांनी जलपूजनाने व्यक्त केला. नरोटेवाडी गावचे जेष्ठ नागरिक बाबुराव उंबरे यांच्या हस्ते विधीवत पुजा करण्यात आली उजनीची गंगा नरोटेवाडीत आवतरलीचे आनंदात सरपंच उमेश भगत,उपसरपंच महेंद्र खटके, सोसायटी चेअरमन भिमाशंकर उंबरे, सुधाकर भगत, केदार उंबरे, सिध्देश्वर भगत, आप्पासाहेब उंबरे, शाखा अभियंता देवकते उपस्थित होते.

## महत्वाचे...



### जागतिक पशुवैद्यकीय दिनानिमित्त डॉ. बोधनकर यांना पुरस्कार वितरण

**सोलापूर, दि. २६ एप्रिल -**

जागतिक पशुवैद्यक दिनानिमित्त ज्येष्ठ पशुवैद्यक प्रतिष्ठान, सोलापूरच्या वतीने स्वेरी कॉलेज ऑफ इंजिनियरिंग, गोपाळपूर येथे स्व. डॉ. चंद्रकांत निंबाळकर उत्कृष्ट पशुवैद्यक पुरस्कार सघन कुक्कुट विकास गट, नेहरू नगर, सोलापूरच्या पशूधन विकास अधिकारी डॉ. स्नेहंका बोधनकर यांना देण्यात आले. सन २०२५-२६ कुक्कुटपालन व्यावसायिक प्रकल्प उभे करण्यासाठी सोलापूर जिल्ह्यात उत्कृष्ट कार्य केल्यामुळे त्यांचा सन्मान स्वेरी कॉलेजच्या उपप्राचार्य डॉ. माधवी पवार यांच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पुणे विभाग प्रादेशिक सहआयुक्त डॉ. समीर बोरकर होते. माजी राज्यपाल सी. विद्यासागर राव यांच्या हस्ते सुवर्णपदक प्राप्त झालेले असून यापूर्वी कन्यारत्न वाचवा समाज देश वाचवा २००९- १० मध्ये FOGSI या राष्ट्रीय संस्थेमार्फत पुरस्कार प्राप्त झाले आहे. २०१५ मध्ये नॅशनल सेफ्टी कौन्सिल तर्फे त्यांच्या संशोधन कार्याबद्दल अवॉर्ड देण्यात आला आहे. २६ जानेवारी २०२४ रोजी क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले पशुधन प्रहरीमार्फत गौरविण्यात आले आहे.



### छत्रपती ग्रुपकडून अनुष्का शिंदे हिच्या नावे अकरा हजारांची 'एफ.डी.'

**बार्शी, दि. २६ एप्रिल-**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त व छत्रपती ग्रुपचे मार्गदर्शक विजयसिंह पाटील यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून इयत्ता नववीत शिकणाऱ्या कु. अनुष्का शिरीष शिंदे हिला अकरा हजारांची मदत करण्यात आली. अनुष्काच्या वडिलांचे नुकतेच निधन झाले असून त्यांच्या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती अतिशय बिकट आहे. त्यामुळे अनुष्काच्या नावाने श्री भगवंत मल्टिस्टेट क्रेडिट को-ऑप. सोसायटी लि. येथे ही रक्कम फिक्स डिपॉझीट करण्यात आली आहे. यावेळी नगरसेवक विजय नाना राऊत, माजी नगराध्यक्ष रमेशअण्णा पाटील, डॉ. गणेशकुमार सातपुते, किरण कोकाटे, पत्रकार संजय बारबोले, चंद्रकांत करडे, विजय कोरे, छत्रपती ग्रुपचे सचिव बापूसाहेब पवार, किरण कोकाटे, जय शिवराय प्रतिष्ठान अध्यक्ष विजय राऊत, ॲड. गणेश हांडे, अंकुश नान्नजकर, उडान फाउंडेशनचे शकीलभाई मुलाणी, अमोल डिसले, तानाजी नवले, अजित कदम, अमर लोमटे, सावंत, जाफर शेख, अनिल दळवी, अमोल पाटील, छत्रपती ग्रुपचे टिंकू पाटील, अमोल पाटील, दत्ता मुकटे, नागेश मोहिते रोहित मोहिते, अखिल पठाण, मयूर पवार, सागर थोरात, कोमल लाड, दिनेश सदाफुले, विजय चव्हाण, समाधान राऊत, राहुल आसवदे, रवी मस्के, भगवान जाधव, प्रवीण पिचके, गोविंद थोरात, नागेश जाधव, रोहन भगत, अभिजीत चव्हाण, पृथ्वीराज पाटील, गणेश कोल्हे, श्रावण भालेराव, पिंटू छापेकर, रोहित देवकते, दत्ता गात, सचिन सुपेकर, सचिन शिंदे, चिकू डाके, चिऊ शिंदे, बप्पा हुळे व मित्र परिवार उपस्थित होते. वाढदिवसाचा अनाठायी खर्च टाळून असा नावीन्यपूर्ण उपक्रम केल्याबद्दल नाना राऊत यांनी छत्रपती ग्रुपचे कौतुक केले.



**सोलापूर : भारतीय जनता पार्टी सोलापूर शहर अध्यक्ष, नगरसेविका रोहिणी तडवळकर यांना वाढदिवसानिमित्त भाजप युवा मोर्चा अध्यक्ष विजय कुलथे व पदाधिकारी यांच्या वतीने सत्कार करण्यात आला.**


### भारत विद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी

**सोलापूर, दि. २६ एप्रिल-**

मजरेवाडी परिसरातील भारत मराठी विद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून विक्रीकर उपायुक्त डॉ. समीना बागवान व कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थाध्यक्ष रजाक बागवान होते. सहशिक्षिका हीना बागवान यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. महामानवाच्या प्रतिमा पूजनाने कार्यक्रमाची सुरवात झाली. याप्रसंगी विद्यालयातील विद्यार्थी रहेमान हिरापुरे, मरियम शेख, तमन्ना मकानदार, फरहीन शेख, झैन मुजावर, उमर कल्याणी या विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन जे.एच.हवालदार यांनी केले. तर आभार मुख्याध्यापक एस.के. सरसंबे यांनी मानले.

## निधन वृत्त...

### उषा कुलकर्णी



**सोलापूर, दि. २६ एप्रिल -**

सात रस्ता परिसरातील माजी मुख्यध्यापक पांडूरंग कुलकर्णी यांच्या पत्नी उषा पांडुरंग कुलकर्णी यांचे वृद्धापकाळामुळे वय वर्ष ८३ व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, तीन मुली, सुना, जावई, नातवंडे व परतवंडे आहेत. पत्रकार महासंघाचे सचिव व प्रा. पी.पी. कुलकर्णी, धनंजय कुलकर्णी यांचे त्या आई होत. अंत्यसंस्कार रात्री १० वाजता बाळे स्मशानभूमी येथे करण्यात आले.

## मंद्रुपच्या जबरी चोरीतील आरोपींना तीन दिवस पोलिस कोठडी

**तभा वृत्तसेवा,**
**मंद्रूप, दि.२६ एप्रिल -**

मंद्रपमध्ये २४ एप्रिल रोजी रात्री घडलेल्या जबरी चोरीच्या गुन्ह्याचा सहा तासात उलगडा केल्यानंतर मंद्रूप पोलिसांनी तीनपैकी दोन आरोपींना अटक केली असून त्यांना तीन दिवस पोलीस कोठडी मिळाली आहे. आनंद भारत गावडे वय २९ वर्ष रा.भिमनगर मंद्रुप व आशीष मळसिध्द कांबळे वय २४ वर्ष भिमनगर मंद्रुप , सध्या राहणार राहुल नगर संभाजी चौक ए ब्लॉक २८९ बुध्द विहार जवळ उल्हासनगर ४ ठाणे या दोघांना अटक करण्यात आली आहे. तर रूपेश गावडे रा.भिमनगर, मंद्रुप ता.दक्षिण सोलापूर याचा तपास करीत आहेत.

मंद्रूप पोलिस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक राजकुमार डांगे व त्यांच्या सहकार्यांनी जबरी चोरी करून लूटमार करणार्या आरोपींच्या मुसक्या आवळल्या आहेत. फिर्यादींनी मंद्रूप पोलीसात तक्रार दिल्यानंतर सदर घटनेची गंभीर दखल घेत पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी अप्पर पोलीस अधीक्षक प्रितम यावलकर व उपविभागीय पोलीस अधिकारी संकेत देवळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली मंद्रूप पोलीस ठाण्याचे पोलिस निरीक्षक शंकर पटवारी यांना सदर गुन्हा उघडकीस आणण्यासाठी सूचना व मार्गदर्शन केले होते . त्या अनुसार पोलीस उपनिरीक्षक राजकमार डांगे, सहायक फौजदार बापू शिंदे, पोलिस कॉन्स्टेबल माजिद शेख, संदीप काळे, चालक श्रीशैल शिवणे यांचे पथक तात्काळ तपास करून आरोपींना अटक केले. तांत्रिक विश्लेषण, सीसीटीव्ही फुटेज व गोपनीय बातमीदारांच्या मदतीने आरोपींचा माग काढून आरोपींना तीन दिवस पोलीस कोठडी मिळवून दिली आहे. फिर्यादी यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार आयशर टेम्पो मधून मालवाहतूक करत असताना मळसिध्दप्पा मंदिर परिसरात तीन अज्ञात इसमांनी त्यांचा टेम्पो अडवून जबरदस्तीने वाहन थांबवले. फिर्यादीस मारहाण करून अंदाजे २०,००० रूपये रक्कम जबरदस्तीने हिसकावून घेतली होती .

### सरस्वती जाधव हिची सांस्कृतिक केंद्रात विशेष कामगिरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ एप्रिल-**



नवी दिल्ली सांस्कृतिक स्त्रोत प्रशिक्षण केंद्रात घेतल्या जाणाऱ्या विशेष परिक्षेत महाराष्ट्रातून १५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. यात सरस्वती जाधव हिने प्रथम क्रमांक मिळवला. सरस्वती जाधव ही सुंद्रीवाद्य निर्मिती झाल्यापासून पहिलीच विद्यार्थिनी आहे. सुप्रसिध्द सुंदरीसम्राट सिद्राम जाधव यांची पणती आहे. ती सिध्देश्वर कन्या प्रशालेत इयत्ता आठवीत शिकत आहे. ती राजकुमार सावळगी यांच्याकडे संगीताचे प्रशिक्षण घेत आहे. ती सुंद्रीचे शिक्षण आकाशवाणी कलावंत कपिल जाधव आणि पिताश्री गोरखनाथ जाधव यांच्याकडे घेत आहे.



## ग्लोबल व्हिलेजचा निकाल १०० टक्के

### सलग सहाव्या वर्षी सीबीएसईचा शंभर टक्के निकाल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ एप्रिल-**

कै. ब. ई. चनशेट्टी गुरुजी प्रतिष्ठान संचलित महात्मा गांधी ग्लोबल व्हिलेज येथे सीबीएसई अभ्यासक्रमासोबतच महात्मा गांधीजींच्या 'नई तालीम' तत्त्वज्ञानावर आधारित शिक्षण दिले जाते. कर्मातून ज्ञान, ज्ञानातून व्यवहार आणि व्यवहारातून जीवन शिक्षण या संकल्पनेवर आधारित अध्यापन पद्धतीमुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास घडवून आणला जातो.

विद्यार्थी केंद्रित शिक्षणपद्धतीचा अवलंब केल्यामुळे यंदाही इयत्ता दहावीचा निकाल शंभर टक्के लागून सलग सहाव्या वर्षी ही परंपरा कायम ठेवण्यात यश आले आहे. यावर्षी इयत्ता दहावीमध्ये पूनम भोसले हिने ९२.२० टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला. प्रतीक प्रकाश शिवनगी याने ९२.१०% गुणांसह द्वितीय क्रमांक मिळवला, तर सानिका जगताप हिने ९१.०६ टक्के गुणांसह तृतीय क्रमांक प्राप्त केला. या परीक्षेत ३३ विद्यार्थ्यांपैकी १८ विद्यार्थ्यांनी ८० टक्के पेक्षा अधिक गुण मिळवून उल्लेखनीय यश संपादन केले. या यशामध्ये प्राचार्य आसमा नदाफ तसेच मल्लिनाथ जळकोटे, राहुल काळे, प्रदीप राठोड, प्रियांका माने, संगीता कोनापुरे आदी शिक्षकांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ. उमाकांत चनशेट्टी, सचिवा संगीताशहा आणि शैक्षणिक समन्वयक प्रा. अनिकेत चनशेट्टी यांनी सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

## विक्रमी कट-ऑफच्या वादळातही नेहरू विद्यालयाच्या गुणवत्तेची नौका पार



**तभा वृत्तसेवा,**
**जेऊर दि.२६ एप्रिल -**

यंदा 'राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती' (छचचड) परीक्षेच्या निकालात राज्यभर विक्रमी गुणांचा 'कट-ऑफ' लागला. अनेक मोठे शैक्षणिक गड या स्पर्धेत कोलमडले. मात्र रावगावच्या पंडीत जवाहरलाल नेहरू विद्यालयाने मात्र आपला यशाचा झेंडा अभिमानाने उंच फडकवला आहे. तालुक्यात उत्तम प्रकारचा निकाल नोंदवत या शाळेने ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या क्षमतेवर शिक्कामोर्तब केले आहे.

विद्यालयातील एकूण ११ विद्यार्थी परीक्षेला बसले होते, त्यापैकी ९ जणांनी उत्तुंग यश मिळवले. दोघांनी तर थेट जिल्हा गुणवत्ता यादीत धडक मारली आहे. पृथ्वीराज बाबरने प्रवर्गातून जिल्ह्यात २३ वा क्रमांक पटकावला. श्रावणी राखने प्रवर्गातून जिल्ह्यात तिसरा क्रमांक मिळवला. या दोन ताऱ्यांनी मिळवलेले हे यश संपूर्ण रावगावच्या शैक्षणिक चळवळीचे यश मानले जात आहे. यंदाचे मेरिट ऐतिहासिकरीत्या उच्च लागल्याने स्पर्धा अत्यंत चुरशीची होती. यामध्ये शाळेचे आणखी चार विद्यार्थी केवळ काही गुणांच्या फरकाने गुणवत्ता यादीत येण्यापासून हुकले आहेत. ही बाब शाळेच्या दर्जेदार शिक्षणाची साक्ष देत असल्याची भावना पालकांनी व्यक्त केल्या आहेत.

विद्यालयाच्या यशाबद्दल संस्थेचे संस्थापक अध्यक्ष एकनाथराव काकडे आणि भैय्यासाहेब काकडे यांनी विशेष कौतुक केले आहे. विद्यालयाने गुणवत्तेची ही परंपरा अशीच जोपासावी, अशा शुभेच्छाही दिल्या. मुख्याध्यापक विजय कोळेकर यांनीही यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. विद्यार्थ्यांची मेहनत, शिक्षकांचे सातत्यपूर्ण मार्गदर्शन, शाळेत दररोज होणारे विशेष सराव वर्ग यामुळेच आज रावगावचे नाव जिल्ह्यात चमकल्याची भावना व्यक्त केली.



## 'लोटस'च्या विद्यार्थ्यांचा परदेशातील विद्यार्थ्यांसोबत 'इंग्लिश लर्निंग प्रोग्रॅम' मध्ये सहभाग

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२६ एप्रिल -**

येथील लोटस इंग्लिश स्कूलमध्ये 'इंग्लिश लर्निंग बडीप्रोग्रॅम' या नाविन्यपूर्ण उपक्रमाचे आयोजन केले आहे. दि. १९ एप्रिल ते दि. २१ जूनपर्यंत म्हणजे तब्बल १० आठवडे हा उपक्रमचालणार आहे. उपक्रमात 'लोटस'च्या विद्यार्थ्यांना अमेरिका व कॅनडा येथील विद्यार्थ्यांसोबत सहभागी होता येणार आहे. उपक्रमाचे उद्घाटन नुकतेच करण्यात आले.

प्रास्ताविक प्राचार्या डॉ.जयश्री भोसले यांनी केले. सोबस इनसाइट फोरमचे दिग्विजय चौधरी यांनी स्थापन केलेली ही संस्था पंढरपूरमधील विविध प्रकल्पांवरही लक्ष केंद्रित करते. इंग्लिश बडी या प्रोग्रामची सुरुवात एसआयएफच्या सल्लागार समितीचे अध्यक्ष अर्जुन मल्होत्रा यांनी केली आहे. जागतिक स्पर्धेच्या काळात विद्यार्थ्यांना घरापासूनच इंग्रजी भाषेचा सराव मिळावा यासाठी पालकांचे सहकार्य मिळवणे हा या कार्यक्रमाचा मुख्य हेतू होता.

शाळेच्या वतीने स्वेरीज कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे डॉ.हर्षवर्धन रोंगे यांनी सविस्तर माहिती दिली. हा शैक्षणिक उपक्रम १० आठवड्याचा आहे. यासाठी महाराष्ट्रातून २ शाळांची निवड केली आहे. त्यातील लोटस इंग्लिश स्कूल ही पहिली शाळा आहे. उपक्रमासाठी अमेरिकेतून २३ तर कॅनडामधून १७ विद्यार्थी लोटस इंग्लिश स्कूलमधील विद्यार्थ्यांशी संवाद साधणार आहेत. विद्यार्थी एकमेकांच्या सहाय्याने आणि पालकांच्या मार्गदर्शनाखाली इंग्रजीचे कौशल्य कसे वृद्धिंगत करू शकतील याचे प्रात्यक्षिक दाखवण्यात आले.

स्कूलच्या प्राचार्या डॉ. जयश्री भोसले यांनी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रवासात पालकांची भूमिका किती महत्वाची आहे, यावर मार्गदर्शन केले. कार्यक्रमावेळी संस्थेचे अध्यक्ष भीमराव रोंगे, शाळा व्यवस्थापन कमिटीचे सदस्य डॉ.महेश्वर गायकवाड, पालक प्रतिनिधी मनिषा अरकिले, शाळेचे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शिक्षिका विभूती गवस यांनी केले.


## 'सहकार शिरोमणी' ची फसवणूक करुन फरार असलेल्या मुकादमास अटक

### सव्वा वर्षांपासून देत होता पोलिसांना गुंगारा

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.२६ एप्रिल -**

गळीत हंगाम २०२४-२५ मध्ये ऊस तोडणी वाहतुकीचा करार करुन भाळवणी येथील सहकार शिरोमणी वसंतराव काळे सहकारी साखर कारखान्याकडून करारापोटी १ कोटी दोन लाख रुपयांची उचल घेवून, दीड वर्षापासून फरार असलेल्या आरोपीच्या मुसक्या आवळण्यात अखेर पंढरपूर ग्रामीण पोलीसांना यश आले आहे.

सहकार शिरोमणी वसंतराव काळे सहकारी साखर कारखान्याच्या २०२४-२५ गळीत हंगामात करार करुन ऊस तोडणी वाहतुक ठेकेदारांना उचल दिली होती. मात्र जत तालुक्यातील काही ठेकेदारांनी एक कोटी दोन लाख रुपयांची उचल घेऊन गळीत हंगामात ऊस तोडणीवाहतुक यंत्रणा हजर केली नाही. कारखान्याच्या गळीतावर त्याचा परिणाम होऊन २०२४-२५ मध्ये कारखान्यास अपेक्षित उद्दिष्ट साध्य करता आले नाही. जत तालुक्यातील ऊस तोडणी वाहतुक मुकादम ज्ञानेश्वर तांबे रा.करेवाडी, अशोक निळे रा.व्हसपेठ, सुरेश गोफणे रा.करेवाडी, बाबु ओलेकर रा.करेवाडी, सुखदेव कोकरे रा.मोटेवाडी ता.जत जि.सांगली यांनी २४ नोव्हेंबर २०२४ ते १ जानेवारी २०२५ या कालावधीत कारखान्यास ऊस वाहतुक व तोडणी मजुर पुरवठा करण्यासाठी पंढरपूर येथील निशिगंधा सहकारी बँकेतुन वेळोवेळी १ कोटी २ लाख रुपये चेकद्वारे दिले होते. परंतु या मुख्य सुत्रधार असलेल्या चार जणांनी एकमेकांशी



संगनमत करून कराराप्रमाणे गळीत हंगामात ऊस तोडणी वाहतुक यंत्रणा व मजुर पुरवठा न केल्यामुळे कारखान्याची फसवणूक केल्याचे निदर्शनास आले.

अखेर कारखान्याकडून २७ जानेवारी २०२५ रोजी पंढरपुर ग्रामीण पोलीस ठाण्यात अशोक निळे, सुरेश गोफणे, बाबु ओलेकर, ज्ञानेश्वर तांबे, सुखदेव कोकरे यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. परंतु आरोपी एक वर्ष तीन महिन्यांपासून पोलिसांनी गुंगारा देत होते. परिणामी पंढरपूर न्यायालयाने आरोपींना फरार घोषीत केले होते. तदनंतर जतच्या पोलीस यंत्रणेस सुगावा लागल्यावर मोठ्या शिताफीने यातील मुख्य म्होरक्या असलेल्या ज्ञानेश्वर द्रोपदा तांबे याला अटक केली. न्यायालयाने त्याला चौदा दिवसांची न्यायालीन कोठडी सुनावली आहे. चौकशीत आरोपीने ट्रॅक्टरचे बनावट नंबर देऊन, बोगस आधार कार्ड वापरून व बोगस करारपत्र करुन कारखान्याकडून चेकद्वारे रक्कम घेतली, पण यंत्रणा मात्र कारखान्याकडे लावली नाही, असे सिद्ध झाले.

२३ एप्रिल रोजी आरोपीस न्यायालयासमोर उभे केले असता न्यायालयाने त्याला एक दिवसाची पोलीस कोठडी व २४ एप्रिल २०२६ रोजी १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. त्याची रवानगी सोलापूरच्या जिल्हा कारागृहात केली आहे. कारखान्यातर्फे याप्रकरणी प्रताप थोरात यांनी फिर्याद दिली होती. कारखान्याच्या वतीने न्यायालयीन कामकाज ॲड. राजेश भादुले यांनी पाहिले. याप्रकरणी पंढरपूर ग्रामीण पोलीस स्टेशनचे पी.आय. धनवट , ए.पी.आय. अनिल पाटील व वीरसेन पाटील, फुगारे, कारखान्याचे व्हा.चेअरमन भारत कोळेकर, मोहन नागटिळक, अमोल माने, सुनिल पाटील, अर्जुन जाधव तसेच कार्यकारी संचालक पोपट घोगरे, वसुली अधिकारी बंडु पवार व कृष्णा जगदाळे यांनी प्रयत्न केले.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

न मे कर्मफले स्पृहा

https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्वाचे...

### ग्रामपंचायत समोर झोपलेल्या इसमाच्या डोक्यात घातला दगड

**सोलापूर, दि.२६ एप्रिल-**

एका झोपलेल्या इसमास डोक्यात दगड घालून गंभीर जखमी केल्याची घटना पंढरपूर तालुक्यातील खर्डी ग्रामपंचायत कार्यालया जवळ घडली. महबूब इब्राहिम अत्तार (वय-४५, रा.खर्डी) असे जखमी व्यक्तीचे नाव आहे. तो शनिवारी रात्री खर्डी ग्रामपंचायत कार्यालयाजवळ झोपला असताना रविवारी पहाटे १ वाजता सचिन चंदनशिवे यांनी पैसे न दिल्याच्या कारणावरून त्याच्या डोक्यात दगड घातला. यात डोक्याला गंभीर मार लागून तो बेशुध्द होऊन पडला. त्याला पंढरपूरच्या आरोग्य केंद्रात प्रथमोपचार करुन हसन तांबोळी यांनी येथील शासकीय रुग्णालयात पुढील उपचारासाठी आज सकाळी दाखल केले.

### प्रियदर्शनी सोसायटी येथे महिलेची गळफास घेऊन आत्महत्या

**सोलापूर, दि.२६ एप्रिल-**

अज्ञात कारणावरून एका ३५ वर्षीय महिलेने घरातील लाकडी वाशाला साडीच्या साह्याने गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना कुमठा नाका परिसरातील प्रियदर्शनी सोसायटीत रविवारी दि. २६ एप्रिल रोजी सायंकाळी साडेचार वाजता उघडकीस आली. सविता रवी हुच्चे (रा. प्रियदर्शनी सोसायटी, दत्त मंदिर कुमठा नाका, सोलापूर) असे गळफास घेतलेल्या महिलेचे नाव आहे. ही खबर एमआयडीसी पोलिसांना समजली असता पोलिस हवालदार एस.एस. कांबळे यांनी घटनास्थळी दाखल होत इतरांच्या सहाय्याने गळफास सोडवून महिलेस येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले. मात्र डॉक्टरांनी तिला मृत घोषित केले.

# शिवी दिल्याचा राग मनात धरुन वीटभट्टी कामगाराचा खून

### मारेकरी स्वतःहून पोलिस ठाण्यात झाला हजर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२६ एप्रिल-**

शिवी दिल्याचा राग मनात धरुन एका वीटभट्टी कामगाराच्या डोक्यात दगड घालून निर्घुण खून करण्यात आल्याची घटना एम आयडीसी परिसरातील कलावती नगर येथील तेलुगु शाळेच्या समोरील मैदानात घडली. महेश गुरुसिध्दप्पा सावळतोटे (वय-२१, रा.सिध्दरामेश्वर नगर, अक्कलकोट रोड, एमआयडीसी, सोलापूर) असे खून झालेल्या तरुणाचे नाव आहे. दरम्यान, यातील मारेकरी सोमनाथ नागराज जवळकोटे (वय-३१, रा.शिवलिंग मंगल कार्यालयजवळ, कलावती नगर, सोलापूर) हा स्वतःहून पोलिस ठाण्यात हजर झाला.

यातील मयत महेश सावळतोटे हा घराजवळील एका वीटभट्टीवर कामास होता. शनिवारी रात्री तो दारु पिऊन तेलगू शाळेजवळील



कच्च्या रस्त्यावर पडला होता. यावेळी आरोपी सोमनाथ जवळकोटे हा रस्त्याने जात होता. तेव्हा त्याचा पाय महेश सावळतोटे याला लागला, त्यामुळे त्याने त्याला रस्त्यातून उठवण्याचा प्रयत्न केला. तेव्हा महेशने सोमनाथला शिवी दिली, त्यात दोघांमध्ये वाद झाला. एकमेकांना शिवीगाळ करीत दगडही मारले. दरम्यान एकाने मध्यस्थी केली होती. पण त्याचा उपयोग झाला नाही.




दरम्यान, सोमनाथ जवळकोटे तेथून मैदानात उघड्यावर शौचालयाला गेला. शिवीगाळ झाल्याचा राग मनात धरुन महेश सावळतोटे हा सोमनाथ जवळकोटे यांच्या मागे गेला. तेलगू शाळेसमोरील मैदानाच्या कंम्पाउंडजवळ शौचालयाला बसलेल्या सोमनाथ जवळकोटे याच्यापासून काही अंतरावर महेश सावळतोटे बसला. मात्र, तो पुन्हा शिवीगाळ करु लागला. त्यावेळी शिवी का दिली? असे म्हणत सोमनाथ जवळकोटेने तेथील दगड उचलून महेश सावळतोटे याच्या डोक्यात घातला. त्यात तो जखमी होऊन जागेवरच मृत्युमुखी पडला.

ही माहिती समजताच एमआयडीसी पोलिस ठाण्याच्या पोलिसांनी घटनास्थळी भेट दाखल होत पंचनामा केला. पोलिस हवालदार डी.के.डोके यांनी सदर मृतदेह शासकीय रुग्णालयात शवविच्छेदनासाठी दाखल केला. याप्रकरणी नागेश गुरुसिध्दप्पा सावळतोटे यांनी फिर्याद दिली. एमआयडीसी पोलिस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अटक करण्यात आलेल्या आरोपीला उद्या सोमवार रोजी येथील न्यायालयात सादर करण्यात येणार आहे. पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक इंगळे हे करीत आहेत.




सोलापूर : अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचा भिडे वाडा चित्ररथ सोलापुरात रविवारी सायंकाळी दाखल झाला. (छायाचित्र : केवल तिवारी)

# उपळाई खुर्द येथे विवाहितेचा शॉक लागून मृत्यू

### शिक्षक पतीवर घातपाताचा संशय

**तभा वृत्तसेवा,**
**माढा, दि. २६ एप्रिल-**

माढा तालुक्यातील उपळाई खुर्द येथील विवाहिता भाग्यश्री क्षिरसागर (वय ३६) राहते घरामध्ये विजेच्या तारेचा शॉक लागून मयत झाली. ही घटना २४ एप्रिल रोजी रात्री ९.३० वाजण्याच्या सुमारास घडली. दरम्यान मयताचे भाऊ विशाल गवळी रा. पेनुर ता. मोहोळ यांनी माढा पोलिसांमध्ये मयताचा पती रवींद्र रोहिदास क्षीरसागर रा. उपळाई खुर्द याच्यावर घातपाताचा संशय व्यक्त करत फिर्याद दाखल केली. फिर्यादीवरुन माढा पोलिसात २५ एप्रिल रोजी रात्री उशिरा गुन्हा दाखल झाला.



मयत भाग्यश्री हिचे २०११ साली शिक्षक असलेल्या रवींद्र क्षिरसागरशी लग्न झाले होते. मिरज, चिपळूण आणि उपळाई बुद्रुक या ठिकाणी शिक्षक म्हणून कार्यरत असलेले रवींद्र क्षीरसागर यांनी आपल्या पत्नीला वारंवार त्रास देत चारित्र्याचा संशय घेऊन मारहाण केली. माझे इतर बायकांबरोबर संबंध असून तू माझ्या घरी राहू नको असे म्हणत शारीरिक, मानसिक त्रास दिला. जमीन खरेदीसाठी माहेराहून दोन लाख रुपये घेऊन येण्यासाठी सातत्याने त्रास देत होता. दरम्यान २४ एप्रिल रोजी रात्री ९.३० वाजता राहत्या घरामध्ये निष्काळजीपणाने उघड्या ठेवलेल्या विजेच्या तारांचा शॉक लागून ती खाली पडली. डोक्याला मार लागल्याने तिचा मृत्यू झाला. या प्रकारात मयताचे पती रवींद्र रोहिदास क्षिरसागर हेच जबाबदार असून घातपात असल्याचा संशय मयताचे भाऊ विशाल गवळी यांनी व्यक्त केला आहे.

मयत भाग्यश्री ही नवऱ्याच्या त्रासाला कंटाळून अनेक वेळा माहेरी येत असल्याचे सांगण्यात आले. यावेळी मध्यस्तांमार्फत त्रास करणार नाही या हमीवर तिला सासरी नांदायला पाठवले जात असे. मोहोळ पोलीस स्टेशन, महिला आयोग यांच्याकडे या अगोदरच तक्रारी दाखल केल्या आहेत. दरम्यान भाग्यश्री यांच्या मयताची घटना समजताच पेनुर येथून तिच्या माहेरीकडील कुटुंबासह इतर नातेवाईकांनी माढा पोलीस स्टेशन गाठले. माढा ग्रामीण रुग्णालयामध्ये मयताचे शवविच्छेदन न करता सोलापूर येथे इन कॅमेरा शवविच्छेदन करण्यासाठी ते सिव्हिल हॉस्पिटल सोलापूरला नेले. गुन्हा दाखल होईपर्यंत आम्ही प्रेत सोलापुरातून आणणार नाही अशी भूमिका नातेवाईकांनी घेतल्याने रात्री ११ वाजता गुन्हा दाखल झाला. यानंतर मयत भाग्यश्रीच्या प्रेतावर उपळाई खुर्द येथे पहाटे १ वाजण्याच्या सुमारास पोलीस बंदोबस्तात अंत्यसंस्कार करण्यात आले. अधिक तपास माढा पोलिसांकडून पुढील तपास करण्यात येत आहे.

# विविध निवडणुकात भाजपाला अभूतपूर्व यश; मतदारांचे आभार मानण्यासाठी मुख्यमंत्री मंगळवारी सोलापुरात




### पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी दिली माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ एप्रिल-**

सोलापूर जिल्ह्यातील ११ पैकी १० नगरपालिका, जिल्हा परिषद, महानगरपालिकेच्या निवडणुकांमध्ये भाजपला शहर-जिल्ह्यातील मतदारांनी भरभरुन यश दिलं. ३० वर्षाच्या इतिहासामध्ये पहिल्यांदाच भारतीय जनता पक्षाने स्वतःच्या ताकतीवर ना भुतो ना भविष्यती असे यश मिळविले आहे. मतदारांचे आभार मानण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे मंगळवार, दि.२८ एप्रिल २०२६ रोजी सोलापूरच्या दौऱ्यावर येत आहेत, अशी माहिती पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना दिली.

जिल्ह्यातील ११ पंचायत समित्यांपैकी १० पंचायत समितीवर भाजपचा सभापती, जिल्हा परिषदेत भाजपाचा अध्यक्ष, उपाध्यक्ष, सोलापूर महापालिकेत एक हाती सत्ता येवून महापौर, उपमहापौर व काही विशेष समिती सभापतीपदी पदाधिकारी विराजमान झाले आहेत. यानिमित्ताने मतदारांचे आभार आणि कार्यकर्त्यांचा कौतुक असा दुहेरी कार्यक्रमाची गुंफण घालण्यात आली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शेतकऱ्यांच्या २ लाखांपर्यंतच्या कर्जमाफीचा मोठा निर्णय घेतलेला आहे आणि दोन लाखापर्यंत ज्या शेतकरी बांधवांचं कर्ज थकीत आहे त्या शेतकरी बांधवांचे कर्ज माफ होणार आहे. जे शेतकरी नियमित कर्ज भरतायत अशा लोकांना सानुग्रह अनुदान ५० हजार रुपये देण्याचा निर्णयही त्यांनी घेतलेला आहे. त्याची प्रक्रिया चालू आहे. मुख्यमंत्र्यांनी निवडणुकीमध्ये दिलेल्या प्रत्येक शब्दाला न्याय देण्याची भूमिका दिसून येत आहे.

राज्य सरकारी कर्मचाऱ्यांचं आंदोलन सुरु आहे. या आंदोलनात शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारीही सहभाग असल्यामुळे दहावी, बारावीच्या परीक्षांचा निकाल उशिरा लागता कामा नये म्हणून हा संप लवकरच मिटावा यासाठी संबंधित मंत्री प्रयत्न करीत आहेत. आरोग्य खाते, महसूल कर्मचाऱ्यांच्याही मागण्यांचा योग्य विचार केला जाईल, असेही त्यांनी एका प्रश्नाला उत्तर देताना सांगितले.

सोलापूर जिल्ह्यातील मनोहर बाबाला अटक झालेली आहे. त्यांचे अनेक कारनामे आता समोर येत आहेत. याकडे लक्ष वेधले असता आपण खरात बाबांचा प्रताप पाहता पाहता आता दुसऱ्या बाबांचा प्रताप आपण पाहतोय. असे अनेक बाबा सध्या महाराष्ट्रामध्ये असल्याची खंतही त्यांनी व्यक्त केली.

मुख्यमंत्री फडणवीस यांच्या नेतृत्वामध्ये महाराष्ट्रामध्ये सर्वांचे चांगले काम चालू आहे. महाराष्ट्र वेगाने प्रगती करताना आपण सगळेजण पाहतोय आणि मला वाटत नाही त्यांच्या पुढे दूर दूर पर्यंत दुसरा कुठला ऑप्शन आहे. निवडणुकीपूर्वी सरकारने कर्जमाफी शेतकऱ्यांना देऊ असं घोषित केलं होतं आता एक अहवाल समोर होतोय; ३५ लाख शेतकऱ्यांना या कर्जमाफीचा फायदा होण्याची शक्यता पालकमंत्री गोरे यांनी वर्तविली.



# जागतिक हिवताप दिनानिमित्त सोलापुरात जनजागृती रॅली

### कोरडा दिवस पाळा; महापालिका आरोग्य विभागातर्फे आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२६ एप्रिल-**

सोलापूर महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाच्या वतीने २५ एप्रिल रोजी जागतिक हिवताप दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. अतिरिक्त आयुक्त वीणा पवार, आरोग्याधिकारी डॉ.राखी माने यांच्या मार्गदर्शनाखाली नागरी हिवताप योजना व जिल्हा हिवताप कार्यालय पंढरपूर (उपपथक) यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय किटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रम ंतर्गत विविध उपक्रम राबविण्यात आले.

यानिमित्त आयोजित जनजागृती रॅलीला उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, अतिरिक्त आयुक्त वीणा पवार, शहर क्षयरोग अधिकारी डॉ.अरुंधती हराळकर यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून प्रारंभ करण्यात आला. रॅलीदरम्यान शहरातील नागरिकांना हिवताप प्रतिबंधासाठी स्वच्छतेचे महत्त्व पटवून देण्यात आले. घर परिसर स्वच्छ ठेवण्याबरोबरच आठवड्यातून एक दिवस 'कोरडा दिवस' पाळण्याचे आवाहन केले.

पाण्याचे साचलेले ठिकाण टाळल्यास डासांची उत्पत्ती रोखता येते, याबाबत जागरूकता निर्माण करण्यात आली. कार्यक्रमात जीवशास्त्रज्ञ स्वाती अनपट, नागरी हिवताप विभागातील अधिकारी-कर्मचारी तसेच आशा सेविका मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या.

# 'अवकाळी' वातावरण निवळल्यावर पुन्हा सोलापूर तापले

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ एप्रिल-**



सोलापूरसह राज्यातील इतर काही जिल्ह्यात अनेक ठिकाणी अवकाळी पाऊस आणि गारपिटीचे सावट आहे. हवामान विभागाने दिलेल्या अंदाजानुसार राज्यातील काही जिल्ह्यांत वादळी वाऱ्यासह पावसाचा 'यलो अलर्ट' आहे. सोलापूर, धाराशिव, कोल्हापूरसह अनेक भागात पिकांचे वादळी वारे, अवकाळीच्या पाऊस आणि गारांमुळे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

ढगाळ वातावरणामुळे गेल्या आठवड्यापासून तापमानातही घट आली होती. मात्र रविवारी पुन्हा तापमानाचा पारा ४३ अंशावर गेल्याने आज (दि. २६) दिवसभर शहर-जिल्ह्यात उष्णतेची लाट दिसून आली.

राज्यात पुढील काही दिवस अवकाळी पावसाचा अंदाज वर्तवला आहे. सोलापूर मात्र आता पुन्हा तापत असून, तापमानाचा पारा ४३ अंशावर पोहोचला आहे. यामुळे नागरिकांनी दुपारच्या सत्रात घराबाहेर पडू नये, असे आवाहन जिल्ह्याच्या आपत्ती विभागाकडून केले आहे.

काही दिवसांपूर्वी सोलापूर शहर आणि जिल्ह्यात पडलेल्या पावसामुळे ज्वारी, गहू आणि आंबा बागांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. याचबरोबर फळपिके, भाजीपाल्यांचेही नुकसान झाले आहे. एकंदरीत, निसर्गाच्या लहरीपणाचा शेतीवर मोठा परिणाम दिसून येत आहे.

# पुढील वर्षी व्हिजन एक्स्पोची व्याप्ती वाढवणार : अळ्ळीमोरे

### तीन दिवसात सोलापूरकरांचा भरभरुन प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ एप्रिल-**

सहकार भारतीच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या व्हिजन एक्स्पोला सोलापूरकरांनी भरभरून प्रतिसाद दिल्याने पुढील वर्षी या प्रदर्शनाची व्याप्ती वाढवण्यात येणार आहे, असे व्हिजन एक्स्पोचे स्वागताध्यक्षा सुधा अळ्ळीमोरे यांनी सांगितले. या एक्स्पोचा समारोपप्रसंगी त्या बोलत होत्या. यावेळी सहकार भारतीचे महाराष्ट्र प्रदेश संपर्क प्रमुख संजय परमणे यांची प्रमुख उपस्थिती होती. दरम्यान, गेल्या तीन दिवसात सोलापूरकरांनी व्हिजन एक्स्पोला भरभरुन प्रतिसाद दिला.




महिलांनी उत्पादित केलेल्या वस्तूंना योग्य व्यासपीठ आणि प्रचार प्रसिध्दी मिळावी यासाठी सोलापूर जिल्हा सहकार भारतीने व्हिजन एक्स्पो फॉर वुमन एम्पॉवरमेंट हे प्रदर्शन व विक्री उपक्रम सोलापूरमध्ये पहिल्यांदाच घेतला आहे. या उपक्रमाला राज्यभरातील महिला उद्योजिकांनी चांगला प्रतिसाद दिला. या प्रदर्शनाचे आणखी दोन दिवस वाढवावे अशी सूचना काहीजणांकडून आली. परंतु नियोजित कार्यक्रमामुळे ते शक्य नसल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले.

सहकार भारतीचे महाराष्ट्र प्रदेश संपर्क प्रमुख संजय परमणे यांप्रसंगी बोलताना म्हणाले, सहकारातील समस्या सोडवण्याचे काम करताना सहकारात उद्योग व्यवसाय वाढावेत; यासाठी महिलांनी महिलांकडून आयोजित करण्यात आलेला हा व्हिजन एक्स्पो कौतुकास्पद आहे. सहकार भारतीचे जिल्हाध्यक्ष किरण करकमकर म्हणाले, अत्यंत सामान्य महिलेला उद्योग व्यवसाय वाढावा या उद्देशाने आयोजित केलेल्या व्हिजन एक्स्पोमुळे सहकार भारतीचे नाव आणि कार्य महाराष्ट्रातील घराघरात पोहोचले आहे.

या तीन दिवसाच्या व्हिजन एक्स्पोमध्ये सहभागी झालेल्या व्यावसायिक-उद्योजक महिलांना प्रमाणपत्र देवून सन्मान करण्यात आला. ॲड.अर्चना कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन केले. सहकार भारतीच्या महिला प्रकोष्ठ प्रमुख प्राची धामणगांवकर यांनी आभार मानले. यावेळी विभाग प्रमुख संतोष गायकवाड, सुवर्णा पेठे, औदुंबर नाईक, उमेश विरजे, सुर्यकांत पाटील, यशवंत बुऱ्हाडे, ॲड.साधना संगवे, सुजाता इनामदार, डॉ.जयंत शेळगीकर, प्रशांत बडवे, उत्तरा बरडे, आरती पानगांवकर, कुमुद अंकाराम आदी उपस्थित होते.

# कांदा बाजारवर युध्दाचा परिणाम; दर कोसळल्याने शेतकरी आर्थिक संकटात



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ एप्रिल-**

आखाती देशांमध्ये निर्माण झालेल्या युद्धजन्य परिस्थितीचा थेट फटका राज्यातील कांदा बाजाराला बसला असून निर्यात ठप्प झाल्याने कांद्याचे दर अक्षरशः निम्म्यावर आले आहेत. अपेक्षित २,००० ते २,५०० रुपये प्रतिक्विंटल दराऐवजी सध्या विविध बाजार समित्यांमध्ये ६०० ते १,५०० रुपये प्रतिक्विंटल इतकाच दर मिळत आहे. त्यामुळे कांदा उत्पादक शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडला आहे. उत्पादन खर्च वाढलेला असताना बाजारभाव घसरल्याने शेतकऱ्यांच्या चिंतेत भर पडली आहे.

श्री सिद्धेश्वर कृषी उत्पन्न बाजार समितीत शनिवारी रब्बी व उन्हाळी कांद्याची तब्बल १२१ ट्रक आवक झाली. सोलापूरच्या कांद्याला पारंपरिकरीत्या दक्षिण भारतातून मोठी मागणी असते, तर उच्च प्रतीचा कांदा आखाती देशांत मोठ्या प्रमाणावर निर्यात केला जातो. मात्र, सध्याच्या युद्धस्थितीमुळे निर्यात विस्कळीत झाली असून व्यापाऱ्यांकडून मागणी घटल्याचे सांगितले जात आहे. परिणामी, स्थानिक बाजारात कांद्याची आवक वाढली. दरांवर दबाव निर्माण झाला आहे.

गेल्या वर्षभरापासून कांद्याच्या दरात कोणतीही लक्षणीय सुधारणा झालेली नाही. बियाणे, खते, औषधे, मजुरी, वाहतूक आणि साठवण खर्च सातत्याने वाढत असताना मिळणारा बाजारभाव अत्यल्प असल्याने शेतकऱ्यांना मोठा तोटा सहन करावा लागत आहे. सध्याच्या बाजारभावात उत्पादन खर्चही निघत नसल्याची खंत शेतकऱ्यांनी व्यक्त केली. अनेक शेतकऱ्यांनी कर्ज काढून पीक घेतले असून आता दरपतनामुळे परतफेडीची चिंता निर्माण झाली आहे.

सोलापूर, पुणे, अहिल्यानगर आणि नाशिक या प्रमुख कांदा उत्पादक पट्ट्यात सध्या उन्हाळी कांद्याची काढणी वेगाने सुरू आहे. महिनाअखेरपर्यंत काढणी पूर्ण होण्याची शक्यता आहे. मात्र, ऐन काढणीच्या काळात झालेल्या अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. शेतातून काढून ठेवलेला कांदा पावसात भिजल्याने त्याची गुणवत्ता घसरली असून बाजारात कमी दर मिळत आहेत.

एकीकडे अवकाळी पावसामुळे नुकसान आणि दुसरीकडे निर्यात बंद झाल्याने दरात घसरण, या दुहेरी संकटामुळे कांदा उत्पादक शेतकरी हतबल झाला आहे. अनेक ठिकाणी शेतकरी संताप व्यक्त करत असून तातडीने आर्थिक मदत व अनुदान देण्याची मागणी जोर धरत आहे. सोलापूर बाजार समितीत विक्रीस येणाऱ्या कांद्याला विशेषतः दक्षिण भारतातून मोठी मागणी असते. मात्र, राज्यातील इतर बाजार समित्यांमध्येही आवक वाढल्याने बाजारात स्पर्धा निर्माण झाली आहे. आखाती देशांतील परिस्थिती सुधारून निर्यात पुन्हा सुरू झाल्यास येत्या काळात कांद्याच्या दरात सुधारणा होऊ शकते, असे कांदा व्यापारी सादिक बागवान यांनी सांगितले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नुकतेच विधानसभेत यासंदर्भात निवेदन देत परिस्थितीवर सरकारचे लक्ष असल्याचे सांगितले आहे. निर्यात पुन्हा सुरू करणे, बाजारभाव स्थिर ठेवणे आणि शेतकऱ्यांना तातडीची आर्थिक मदत देणे, या उपाययोजनांची आता नितांत गरज असल्याची भावना व्यक्त होत आहे. कांदा उत्पादकांना दिलासा देण्यासाठी शासनाने लवकर निर्णय घ्यावा, अशी मागणी शेतकरी संघटनांकडून करण्यात येत आहे.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, श्री. मसलेकर निवास, जिल्हा न्यायालय पाठीमागे, समर्थ नगर, धाराशिव (उस्मानाबाद) ४१३५०१, कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ९७६७०९९७११ / ८८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. RNI No. MAHMAR/2023/86468. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003.**Publised at** TARUN BHARAT OFFICE Mr. Maslekar Residence, Behind District Court, Samarth Nagar, Dharashiv. PIN - 413501 |**RNI No. MAHMAR/2023/86468**

● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## नागेवाडी चौकातील मारहाण प्रकरणी ११ जणांवर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.२६ एप्रिल -**
**भूम, दि.२६ एप्रिल -**

ईट (ता. भूम) येथील नागेवाडी चौकात दि. २४ एप्रिल २०२६ रोजी रात्री ९ वाजता घडलेल्या मारहाण प्रकरणी वाशी पोलीस ठाण्यात ११ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी सुनील पोपटराव देशमुख (वय ४६, रा. ईट ता. भूम जि. धाराशिव) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, जिल्हा परिषद निवडणुकीत त्यांच्या पत्नीच्या पराभवाचा राग मनात धरून आरोपींनी गैरकायदेशीर जमाव जमवून त्यांच्यावर हल्ला केला.

यावेळी शिवीगाळ करत लाथाबुक्क्यांनी तसेच लोखंडी रॉड व काठ्यांनी मारहाण करून त्यांना गंभीर जखमी करण्यात आले.

या प्रकरणी ज्ञानेश्वर सोपान गिते, बाळासाहेब बब्रुवान लिमकर, अशोक चव्हाण, प्रमोद गिरी, सुनील नलवडे, संभाजी नलवडे, भास्कर लिमकर, अविनाश अनभुले,

निवृत्ती तावरे, विलास खोसे (सर्व रा. आंद्रुड ता. भूम) तसेच इतर दोन अनोळखी इसमांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सुनील देशमुख यांनी दि.२५ एप्रिल रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरून गुन्हा नोंदविण्यात आला असून पुढील तपास वाशी पोलीस करीत आहेत.



## ⏩ संक्षिप्त वृत्त...



### सास्तुर उपजिल्हा रुग्णालयात वसुंधरा दिन उत्साहात संपन्न

**लोहारा, दि.२६ एप्रिल -**

लोहारा तालुक्यातील सास्तुर येथील उपजिल्हा रुग्णालयात जागतिक वसुंधरा दिन विविध पर्यावरणपूरक उपक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी स्वच्छता मोहीम, वृक्षारोपण आणि जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला डॉक्टर, कर्मचारी व रुग्णांच्या नातेवाईकांनी वृक्षारोपण करून परिसर स्वच्छ केला. स्वच्छ आणि हरित परिसर, निरोगी जीवन या संकल्पनेवर आधारित उपक्रम राबविण्यात आले. प्रकल्प अधिकारी रमाकांत जोशी यांनी पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व अधोरेखित करताना प्लास्टिकचा वाढता वापर व प्रदूषणामुळे पर्यावरणाचा ऱ्हास होत असल्याचे सांगितले. यावेळी रुग्णालयातील सर्व डॉक्टर, कर्मचारी व नागरिक उपस्थित होते.



### लोहगावात 'एक तास आपल्या गावासाठी' उपक्रमाची सुरुवात

**नळदुर्ग, दि.२६ एप्रिल -**

तुळजापूर तालुक्यातील लोहगाव येथे 'एक तास आपल्या गावासाठी' या उपक्रमाची २६ एप्रिल रोजी सुरुवात करण्यात आली. या उपक्रमाअंतर्गत दर रविवारी गावातील स्वच्छता व विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. पहिल्याच दिवशी गावातील युवकांनी उत्स्फूर्त सहभाग घेत विठ्ठल मंदिर, भीमनगर सभागृह व ग्राम पंचायत कार्यालय परिसरात स्वच्छता मोहीम राबविली. यामध्ये माजी सैनिक आप्पाराव होळे यांच्यासह अनेक नागरिक सहभागी झाले होते. दर रविवारी हा उपक्रम राबविण्याचा संकल्प करण्यात आला असून, यामुळे गावात स्वच्छतेची सवय रुजून लोहगाव स्वच्छ व सुंदर होण्यास मदत होणार आहे.



### माळेवाडीत रक्तदान शिबिरास प्रतिसाद; ५० दात्यांचे योगदान

**भूम, दि.२६ एप्रिल -**

भूम तालुक्यातील माळेवाडी येथे अखंड हरिनाम सप्ताहानिमित्त आयोजित रक्तदान शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या शिबिरात एकूण ५० दात्यांनी रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली. किर्तनादरम्यान हभप. प्रकाश महाराज बोधले, हभप. परमेश्वर महाराज बोधले व ज्ञानदेव लहाने यांनी रक्तदानाचे महत्त्व पटवून देत नागरिकांना रक्तदानासाठी प्रेरित केले. शिबिरात महिला, युवक व मुलींचा मोठ्या प्रमाणात सहभाग होता. विशेष म्हणजे मधुरा लहाने व भाग्यश्री लहाने या आई-मुलीने दुसऱ्यांदा एकत्र रक्तदान केले. तसेच बिभीषण लहाने, राहुल लहाने यांच्यासह अनेकांनी सहभाग नोंदवला. यावेळी ज्ञानदेव लहाने, बप्पासाहेब लहाने, बप्पासाहेब बोराडे, सोमनाथ कोकाटे आदी उपस्थित होते. रक्त संकलन भगवंत ब्लड बँक, बार्शीच्या पथकाने केले. शेवटी ग्रामस्थांच्या वतीने कर्मचारी व अधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला.



### येडशीत मलेरिया दिनानिमित्त जनजागृती रॅली

**येडशी, दि.२६ एप्रिल -**

'जागतिक मलेरिया दिन' निमित्त प्राथमिक आरोग्य केंद्र येडशीच्या वतीने गावात जनजागृती रॅली काढण्यात आली. बदलत्या हवामानामुळे वाढणाऱ्या डासजन्य आजारांच्या पार्श्वभूमीवर आयोजित या रॅलीत ग्रामस्थ, विद्यार्थी व आरोग्य कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले. तालुका आरोग्य अधिकारी डॉ. प्रमोद गिरी यांच्या हस्ते रॅलीचे उद्घाटन करण्यात आले. उपचारांपेक्षा प्रतिबंध अधिक महत्त्वाचा असून 'हिवतापमुक्त गाव' ही संकल्पना सर्वांच्या सहभागातूनच साकार होईल, असे त्यांनी सांगितले. रॅलीत डास पळवा - देश वाचवा, स्वच्छता ठेवा - आजार टाळा अशा घोषणांनी परिसर दुमदुमला. विद्यार्थ्यांनी फलकांच्या माध्यमातून प्रभावी संदेश दिले. वैद्यकीय अधिकारी डॉ. दर्शना शिंदे यांनी डासांची पैदास रोखण्यासाठी पाणी साचू न देणे, स्वच्छता राखणे, मच्छरदाणीचा वापर आदी उपाययोजना करण्याचे आवाहन केले. तसेच ताप, अंगदुखी यांसारखी लक्षणे आढळल्यास त्वरित तपासणी करण्याचे सांगितले.

## कुरनूर मध्यम प्रकल्प दुरुस्तीवर प्रश्नचिन्ह । ठेकेदार व अधिकाऱ्यांवर कारवाईची मागणी...

# कोट्यवधी खर्चूनही कालव्याला पुन्हा गळती; निकृष्ट कामावर संताप

**विलास येडगे**
**नळदुर्ग, दि.२६ एप्रिल -**

जलसंपदा विभागाच्या गलथान कारभारामुळे आणि ठेकेदाराच्या निकृष्ट दर्जाच्या कामामुळे नळदुर्ग येथील कुरनुर मध्यम प्रकल्पाच्या कालवा दुरुस्तीचे काम पूर्ण होताच पुन्हा कालव्याला गळती लागल्याचे उघड झाले आहे. यामुळे मोठ्या प्रमाणात पाण्याची नासाडी होत असून शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. या प्रकरणाची वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तात्काळ पाहणी करून संबंधित ठेकेदार व जबाबदार अधिकाऱ्यांवर कडक कारवाई करावी, अशी मागणी जोर धरत आहे.





कुरनुर मध्यम प्रकल्पाची पाणी वितरण व्यवस्था सुमारे ५५ वर्षे जुनी होती. कालव्याच्या दुरुस्तीअभावी मोठ्या प्रमाणात गळती होत असल्याने पाण्याचे वितरण पूर्ण क्षमतेने होत नव्हते. परिणामी हजारो हेक्टर शेतीला पाण्याचा फटका बसत होता.

या पार्श्वभूमीवर आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी पुढाकार घेत शासनाकडून कालवा दुरुस्ती व देखभालीसाठी पहिल्या टप्प्यात १३ कोटी ९७ लाख रुपयांचा निधी मंजूर करून घेतला. या निधीतून कालव्याचे सिमेंट लाइनिंग करण्याचे काम हाती घेण्यात आले, जेणेकरून गळती थांबून पाण्याचे सुरळीत वितरण होईल.

मात्र प्रत्यक्षात संबंधित ठेकेदाराने काम निकृष्ट दर्जाचे केल्याचा आरोप होत आहे. ज्या ठिकाणी सिमेंट लाइनिंग करण्यात आले, त्याच ठिकाणी पुन्हा गळती सुरू झाल्याने 'ये रे माझ्या मागल्या' अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. कोट्यवधी रुपये खर्चूनही अपेक्षित परिणाम न मिळाल्याने नागरिक व शेतकरी संतप्त झाले आहेत.

सध्या काम अद्याप अर्धवट असून जलसंपदा विभागाने तातडीने लक्ष घालून दोषी ठिकाणी दुरुस्ती करून घ्यावी, अशी मागणी होत आहे.

या कालव्यावर १० गावांतील सुमारे ३,६४३ हेक्टर क्षेत्र अवलंबून असल्याने कामाची गुणवत्ता उत्तम असणे अत्यावश्यक असल्याचे मत व्यक्त होत आहे.

# टॉवर कंपन्यांचा 'धुमाकूळ'; शेतकऱ्यांना धमक्या

**⏩ गुंड व दलालांच्या माध्यमातून दबाव टाकल्याचे आरोप; परवानगीशिवाय कामामुळे शेतीचे नुकसान...**

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२६ एप्रिल -**

तुळजापूर तालुक्यात पवन व सौर ऊर्जा प्रकल्पांच्या उभारणीदरम्यान काही टॉवर उभारणी करणाऱ्या कंपन्यांकडून शेतकऱ्यांवर अन्याय होत असल्याच्या तक्रारी पुढे येत आहेत. या कंपन्यांनी गुंड प्रवृत्तीचे लोक व दलाल पोसून शेतकऱ्यांना धमकावून अत्यल्प मोबदल्यात त्यांच्या शेतात टॉवर उभारणे व उच्चदाब वाहिन्या टाकण्याचे काम सुरू केल्याचा गंभीर आरोप शेतकऱ्यांकडून करण्यात येत आहे. संबंधित कंपन्या व त्यांना मदत करणाऱ्या गुंडांवर जिल्हा प्रशासनाने तात्काळ कडक कारवाई करावी, अशी मागणी जोर धरत आहे.




सध्या तालुक्यात मोठ्या प्रमाणावर ऊर्जा प्रकल्प उभारणीचे काम सुरू आहे. मात्र, काही कंपन्या शेतकऱ्यांशी थेट संवाद न साधता दलालांच्या माध्यमातून व्यवहार करत असून दबाव तंत्राचा वापर करत असल्याचे चित्र दिसत आहे. कंपनीकडून पोसलेले काही गुंड शेतात जाऊन शेतकऱ्यांना धमकावत असल्याने गरीब शेतकरी हैराण झाले आहेत.

कार्ला (ता. तुळजापूर) येथे सेरेंटीका रिन्युएबल्स इंडिया प्रायव्हेट लिमिटेड ही कंपनी ४०० केव्ही उच्चदाब वाहिनी आणि टॉवर उभारणीचे काम करत आहे. या कंपनीच्या कर्मचाऱ्यांनी सुहास येडगे यांच्या शेतात परवानगी न घेता बांध फोडून तसेच वाहनांची ये-जा करून शेतीचे नुकसान केल्याचा आरोप करण्यात आला आहे. अशा प्रकारच्या अनेक तक्रारी शेतकऱ्यांकडून पुढे येत आहेत.

मुर्टा व शाहापूर जि.प. गटातही शेतकऱ्यांना योग्य मोबदला न देता त्यांच्या जमिनीत टॉवर उभारणे आणि उच्चदाब वाहिन्या टाकण्याचे प्रकार सुरू असल्याचे सांगितले जाते. या संदर्भात शाहापूर गटाचे जि.प. सदस्य सुनील बनसोडे यांनी शेतकऱ्यांसह नळदुर्ग पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.

## कुंभेजा येथे मध्यरात्री दरोडा; चाकू हल्ल्यात पती गंभीर जखमी

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.२६ एप्रिल -**

परंडा तालुक्यातील कुंभेजा येथे दि.२५ एप्रिल रोजी मध्यरात्रीच्या सुमारास दरोड्याची धक्कादायक घटना घडली. या घटनेत चोरट्यांनी एका महिलेच्या गळ्यातील सोन्याचे गंठण जबरदस्तीने काढून घेतले, तर विरोध केल्यामुळे तिच्या पतीवर चाकूने हल्ला करून गंभीर जखमी केले.

**सोन्याचे गंठण लंपास...**

फिर्यादी लता विश्वनाथ जगताप (वय ६५, रा. कुंभेजा ता. परंडा जि. धाराशिव, सध्या रा. ओंकार कॉलनी, पिंपळे गुरव, पुणे) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, त्या व त्यांचे पती विश्वनाथ जगताप हे दि. २५ एप्रिल रोजी रात्री १२.३० वाजता कुंभेजा येथील शेतातील घरासमोरील अंगणात झोपले होते. त्यावेळी पाच अनोळखी इसम दरोड्याच्या उद्देशाने तेथे आले.

यापैकी दोन जण बाहेर पाहणी करत थांबले, तर एका चोरट्याने लता जगताप यांच्या गळ्यातील सुमारे दोन तोळ्यांचे (अंदाजे ६० हजार रुपये किंमतीचे) सोन्याचे गंठण जबरदस्तीने काढून घेतले. त्याचवेळी अन्य दोन चोरट्यांनी त्यांच्या पतीकडे पैसे व दागिने देण्याची मागणी केली. मात्र त्यांनी नकार दिल्यावर चोरट्यांनी चाकूने हल्ला करून त्यांना गंभीर जखमी केले.

या प्रकरणी लता जगताप यांनी दिलेल्या फिर्यादीवरून परंडा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला असून पुढील तपास पोलीस करीत आहेत.

## 'तेरणा अभियांत्रिकी'त परदेशी फार्मा करिअरवर मार्गदर्शन

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२६ एप्रिल -**

तेरणा ट्रस्टच्या अभियांत्रिकी महाविद्यालयातील फार्मसी विभागातर्फे 'परदेशातील औषधनिर्माणशास्त्रातील उच्च शिक्षण व करिअर' या विषयावर विशेष मार्गदर्शन कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

न्यू स्ट्राइड्स एजन्सीच्या वरिष्ठ सल्लागार सोनाली देशमुख यांनी बी. फार्मसी विद्यार्थ्यांना परदेशातील विद्यापीठे, शिष्यवृत्ती, व्हिसा प्रक्रिया व नोकरीच्या संधींबाबत सविस्तर माहिती दिली. युरोप (विशेषतः आयर्लंड) व दुबईतील संधींवर त्यांनी विशेष भर दिला. कार्यक्रमात फार्माकोव्हिजिलन्स तज्ज्ञ प्रा. स्वप्निल कांबळे यांनी करिअरमधील आव्हाने स्पष्ट केली. प्राचार्य डॉ. विक्रमसिंह माने यांनी विद्यार्थ्यांना या संधींचा लाभ घेण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाचे आयोजन विभागप्रमुख डॉ. प्रीती माने यांनी केले. प्रा. संदीप नलगे व डॉ. राजेश ननवरे यांची उपस्थिती होती.

## धाराशिवमध्ये आज मोफत रोजगार मेळावा

**⏩ १० वी, १२ वी पास-नापास विद्यार्थ्यांना सुवर्ण संधी...**



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२६ एप्रिल -**

बेरोजगार तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांच्या पुढाकारातून तसेच आमदार दिलीप सोपल, कैलास पाटील, प्रवीण स्वामी यांच्या मार्गदर्शनाखाली व कुणाल ग्रुप, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवार, २७ एप्रिल रोजी मोफत रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

हा मेळावा समर्थ मंगल कार्यालय, धाराशिव येथे सकाळी ११ ते सायंकाळी ५ या वेळेत होणार असून महाराष्ट्रातील नामांकित कंपन्या सहभागी होणार आहेत. उमेदवारांची निवड प्रत्यक्ष मुलाखतीद्वारे केली जाणार आहे.

१० वी, १२ वी (पास/नापास), आयटीआय, डिप्लोमा, बी.कॉम, बी.एस्सी उत्तीर्ण उमेदवारांसाठी संधी उपलब्ध असून वयोमर्यादा १८ ते ४० वर्षे आहे. निवड झालेल्यांना १७ ते २५ हजार रुपये मासिक वेतनासह बस व कॅन्टीन सुविधा दिली जाणार आहे.

या मेळाव्याचा जास्तीत जास्त तरुण-तरुणींनी लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## जिल्हा परिषद हायस्कूल उमरगा येथे बेसबॉलचे दोन दिवसीय शिबिर संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.२६ एप्रिल -**

बेसबॉल या खेळाचा प्रचार व प्रसार करण्याच्या उद्देशाने जिल्हा परिषद हायस्कूल, उमरगा येथे आयोजित दोन दिवसीय प्रशिक्षण शिबिर उत्साहात पार पडले.

या शिबिरामध्ये जिल्हा परिषद हायस्कूल उमरगा येथील खेळाडूंसह श्री महात्मा बसवेश्वर विद्यालय, उमरगा व छत्रपती शिवाजी महाविद्यालय, उमरगा येथील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. एकूण सुमारे ७० खेळाडूंनी या प्रशिक्षणाचा लाभ घेतला.



शिबिरामध्ये विद्यार्थ्यांना बेसबॉल खेळाच्या मूलभूत तंत्रांसह तंत्रशुद्ध पद्धतीने प्रशिक्षण देण्यात आले. भविष्यात राज्यस्तरीय स्पर्धांमध्ये सहभागी होता यावे, या उद्देशाने खेळाडूंना मार्गदर्शन करण्यात आले.


या शिबिरासाठी नांदेड येथील अनुभवी प्रशिक्षक बालाजी गाडेकर यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी जिल्हा परिषद हायस्कूल, उमरगा येथील क्रीडाप्रेमी मुख्याध्यापक पद्माकर मोरे यांचे मोलाचे सहकार्य लाभले. शिबिर यशस्वी करण्यासाठी बेसबॉलचे जिल्हा सचिव महमदरफी शेख, धनराज तेलंग व शेख महेमद फसद नसरत यांचे विशेष योगदान लाभले.

यावेळी उमरगा तालुक्याचे ज्येष्ठ क्रीडाशिक्षक संजय कोथळीकर व मुनीर शेख उपस्थित होते.

## केसरजवळगा येथे मंदिरफोडी : देवीच्या दागिन्यांची चोरी; ६१ हजारांचा ऐवज लंपास

**तभा वृत्तसेवा**
**मुरूम, दि.२६ एप्रिल -**

उमरगा तालुक्यातील केसरजवळगा येथे अज्ञात चोरट्यांनी मंदिरफोडी करून देवीच्या अंगावरील सोन्याचे दागिने चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकारामुळे परिसरात खळबळ उडाली आहे.



पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, दि.२३ एप्रिल रोजी रात्री ११ ते दि.२४ एप्रिल रोजी पहाटे ४.३० या दरम्यान अज्ञात व्यक्तीने दुर्गा देवी व लालसाब देवी मंदिराचे कुलूप तोडून आत प्रवेश केला. यावेळी देवीच्या अंगावरील सुमारे ५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने, अंदाजे ६१,७६० रुपये किंमतीचा ऐवज चोरून नेण्यात आला.

या प्रकरणी रामू मरगू देवकर (वय ६८, रा. केसरजवळगा ता. उमरगा जि. धाराशिव) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून मुरुम पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला असून पुढील तपास पोलीस करत आहेत.

## उन्हाचा तडाखा वाढला : 'गरिबाचा फ्रिज'; आठवडी बाजारात माठ खरेदीसाठी गर्दी

**⏩ ४० शी पार तापमानामुळे नागरिक त्रस्त... ⏩ माठाला पुन्हा मागणीचे उधाण...**

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.२६ एप्रिल -**

धाराशिव जिल्ह्यातील वाशी तालुक्यात तापमान ४० अंश सेलसेसच्या पुढे गेल्याने उन्हाचा कडाका चांगलाच वाढला आहे. वाढत्या उष्णतेमुळे नागरिकांचे हाल होत असून अंगाची लाही लाही होत आहे. उष्णतेपासून बचावासाठी नागरिक विविध उपाययोजना करताना दिसत आहेत. थंड पेये, सरबत आणि पाण्याची मागणी मोठ्या प्रमाणात वाढली आहे.



या पार्श्वभूमीवर 'गरिबाचा फ्रिज' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या माठाला बाजारात पुन्हा एकदा चांगली मागणी निर्माण झाली आहे. नैसर्गिकरीत्या थंडगार पाणी मिळत असल्याने नागरिक माठ खरेदीकडे वळत आहेत.

इलेक्ट्रिक फ्रिज सर्वसामान्यांना परवडत नसल्याने माठ हा स्वस्त आणि पर्यावरणपूरक पर्याय ठरत आहे.

दि.२५ एप्रिल रोजी तेरखेडा येथील आठवडी बाजारात बाप्पा कुंभार हे माठ विक्री करताना दिसून आले. त्यांच्या स्टॉलवर ग्राहकांची मोठी गर्दी पाहायला मिळाली. विविध आकारांच्या माठांची विक्री मोठ्या प्रमाणात झाली असून विक्रेत्यांनाही याचा चांगला फायदा होत आहे.

उन्हाच्या तीव्रतेमुळे पारंपरिक माठ पुन्हा एकदा घराघरात पोहोचत असल्याचे चित्र सध्या स्पष्टपणे दिसून येत आहे.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर, येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# संक्षिप्त...

## अभिषेक कोंबडे NMMS शिष्यवृत्तीसाठी पात्र



**तभा वृत्तसेवा**
चाकूर **दि. २६ एप्रिल :** तालुक्यातील बोथी येथील केशवराव पाटील विद्यालयाचा विद्यार्थी अभिषेक श्रीराम कोंबडे छचवड परीक्षा उत्तीर्ण झाला असून तो शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरला आहे. त्यामुळे त्याचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.
अभिषेक कोंबडे हा विद्यार्थी इयत्ता आठवी वर्गात शिक्षण घेत असून त्याने डिसेंबर २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांसाठी घेण्यात आलेल्या परीक्षेत घवघवीत यश संपादन केले असून नुकत्याच जाहीर करण्यात आलेल्या शिष्यवृत्ती पात्र विद्यार्थी यादीत त्याने स्थान मिळविले आहे. ही परीक्षा भारत सरकारच्यावतीने घेण्यात येते. आर्थिक दृष्ट्या दुर्बल इयत्ता आठवीच्या विदयार्थ्यांसाठी ही शिष्यवृत्ती योजना असून सदरील परीक्षेतील पात्र विद्यार्थ्यांना इयत्ता नववी ते बारावी पर्यंत दरवर्षी १२ हजार रुपयाची शिष्यवृत्ती मिळते.
अभिषेक कोंबडे हा हुशार व शांत स्वभावाचा विद्यार्थी असून त्याच्या या यशाबद्दल संस्थेचे मार्गदर्शक माजी मंत्री बाळासाहेब जाधव , शाहू शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव तथा राज्याचे सहकार मंत्री ना. बाबासाहेब पाटील , संस्थाध्यक्षा दीपालीताई जाधव , संस्थेचे संचालक तथा सिद्धी शुगरचे व्यवस्थापकीय संचालक अविनाश जाधव , बळीराम भिंगोले ,अहमदपूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती मंचकराव पाटील ,अहमदपूर पंचायत समितीचे सभापती सुरज पाटील,उत्तमराव देशमुख , प्रशासकीय अधिकारी दीपक भराटे , संस्था कार्यालय प्रमुख माधव सरवदे,शाळेचे मुख्याध्यापक युवराज आलट व सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.

## ज्ञानभारतम् प्रकल्पांतर्गत राष्ट्रीय हस्तलिखित सर्वेक्षण मोहिमेला प्रारंभ

**तभा वृत्तसेवा**
**लातूर दि. २६ एप्रिल :** भारताला हस्तलिखितांचा फार मोठा वारसा लाभलेला आहे. पारंपारिक ज्ञान हे पिढीदर पिढी या हस्तलिखितांद्वारे प्रसारीत होत आलेले आहे. परंतू हे सर्व हस्तलिखिते जागोजागी विखुरलेल्या स्वरुपात आहेत. सदरील हस्तलिखिताचे ज्ञानभंडार एकत्र करुन एकाच ठिकाणी उपलब्ध करुन देता यावे या दृष्टीने भारत सरकारने ज्ञानभारतम् या प्रकल्पाची आखणी केली आहे. या प्रकल्पाचा मुख्य उद्देश भारतातील मौल्यवान हस्तलिखित वारशाचे सर्वेक्षण, दस्तऐवजीकरण, संवर्धन, डिजिटायझेशन व प्रसार करणे हा आहे.
भारत सरकारच्या संस्कृती मंत्रालयाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या ज्ञानभारतम् (GYAN BHARATAM) या महत्त्वाकांक्षी प्रकल्पांतर्गत देशव्यापी हस्तलिखित सर्वेक्षण मोहिमेला दिनांक १६ मार्च २०२६ पासून प्रारंभ करण्यात आला आहे.
केंद्रीय अर्थसंकल्प २०२५ मध्ये जाहीर करण्यात आलेल्या या योजनेअंतर्गत देशभरातील शैक्षणिक संस्था, संग्रहालये, ग्रंथालये, धार्मिक संस्था तसेच खाजगी संग्राहक यांच्या सहकार्याने एक कोटीहून अधिक हस्तलिखितांचा शोध व नोंदणी करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. तसेच भारताच्या समृद्ध ज्ञानपरंपरेशी संबंधित हस्तलिखितांचा राष्ट्रीय डिजिटल संग्रह (NATIONAL DIGITAL REPOSITORY) निर्माण करून तो राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर उपलब्ध करून देण्याचा केंद्र शासनाचा मानस आहे. यामध्ये हस्तलिखितांची मालकी ही संबंधीत संस्था, ग्रंथालय अथवा खाजगी संग्राहक यांचीच राहणार आहे. परंतू कोणाला स्वखुशीने सदरील हस्तलिखिते शासनाकडे सुपूर्द करावायाची झाल्यास शासन ती स्विकारेल.
या अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्य सरकारची महत्त्वपूर्ण भूमिका असून राज्यातील विविध सांस्कृतिक संस्था, विद्यापीठे, संशोधन संस्था, हस्तलिखित संग्रहालये तसेच विद्वान यांच्या सहकार्याने ही मोहीम राबविण्यात येणार आहे.

## हाळी हंडरगुळी परिसरात जनावर चोरीचे प्रमाण वाढले

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर दि. २६ एप्रिल :** तालुक्यातील हाळी हंडरगुळी परिसरातील वाढवणा पोलिस ठाण्याच्या हद्दीत काही दिवसांपासून जनावरे चोरणारी टोळी सक्रिय झाल्याने पशुपालकांत भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. दोन दिवसांपूर्वी हाळी शिवारातील शेळ्या चोरीनंतर बुधवारी रात्री उमरगा मन्ना शिवारातून म्हैस चोरीला गेली आहे.तालुक्यातील केसगीरवाडी येथील शेतकरी गुणवंत केसगिरे यांची उमरगा मन्ना शिवारात शेती आहे. त्यांनी शेतातील आखाड्यावर म्हैस बांधली होती.अज्ञात चोरट्यांनी बुधवारी रात्री ही म्हैस (किंमत ४० हजार रुपये) चोरून नेली. त्यामुळे शेतकऱ्याचे नुकसान झाले आहे. गुणवंत केसगिरे यांच्या फिर्यादीवरून पोलिसांत गुन्हा नोंद करण्यात आला असून अधिक तपास पोलिस करीत आहेत.

# तलाठी कार्यालय बंद असल्याने शेतकऱ्यांना त्रास

**तभा वृत्तसेवा**
**लातूर दि. २६ एप्रिल :** लातूर तालुक्यातील बाभळगाव येथे तलाठी कार्यालय वारंवार बंद राहत असल्याने ग्रामस्थांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. महसूल विभागाने ग्रामीण भागातील नागरिकांची कामे जलद व्हावीत, वेळ आणि पैसा वाचावा या उद्देशाने तलाठी सजा कार्यालये सुरू केली; मात्र प्रत्यक्षात बाभळगावातील कार्यालय अनेकदा कुलूपबंदच असल्याचे चित्र आहे. सातबारा फेरफार, चतुःसीमा नकाशे, दाखल्यांतील दुरुस्ती, पंचनामे, तसेच जमीन, घर किंवा फ्लॅट खरेदीनंतर नाव नोंदणी, कर्जासाठी बोजा उतरवणे यांसारखी महत्त्वाची कामे करण्यासाठी नागरिकांना वारंवार कार्यालयात जावे लागते.
परंतु प्रत्येक वेळी कुलूपच दिसत असल्याने ग्रामस्थांची कामे प्रलंबित राहत असून, वेळ व पैशाचा अपव्यय
होत आहे. महाराणा प्रताप नगर व बाभळगाव या दे सज्जांचा कारभार तलाठी हाकता परंतु, दोन्ही सज्जांमध्ये शेतकरी व नागरिकां भेटत नाहीत. शिवाय ते वारंवार फोन बंद ठेव असल्याने नागरिकांना संपर्क साधताही येत नाह अशी तक्रार समोर आली आहे. एवढेच नव्हे, अनेक नागरिकांचे फेरफार, बोजा चढवणे व १८ च्या दुरुस्तीची कामे धूळखात पडली असून, या नाहक त्रास नागरिकांना सहन करावा लागत आ तहसीलदारांनी लक्ष घालून तलाठी कार्यालयास ठेवून नागरिकांना सेवा देण्याची व्यवस्था कराव अशी मागणी बाभळगाव ग्रामस्थांतून होत आहे.

## चोरीमुळे शेळ्या-बकऱ्यांच्या पशुपालकांत दहशत !




**तभा वृत्तसेवा**
**लातूर दि. २६ एप्रिल :** उदगीर तालुक्यातील हाळी-हंडरगुळी व जळकोट तालुक्यातील घोणसी, तिरुका व बेळसांगवी परिसरात गेल्या काही महिन्यांपासून पशुधन चोरीच्या घटनांनी गंभीर स्वरूप धारण केले असून विशेषतः शेळी-बकऱ्यांच्या वाढत्या चोरीमुळे ग्रामीण भागातील पशुपालकांत दहशत निर्माण झाली आहे.
शेतीसोबत शेळीपालन हा येथे प्रमुख जोडधंदा असल्याने अनेक कुटुंबांचा उदरनिर्वाह या व्यवसायावर अवलंबून आहे. मुलांचे शिक्षण, लग्नखर्च आणि दैनंदिन गरजा भागवण्यासाठी शेतकरी वर्षानुवर्षे कष्ट करून शेळ्या-बकरे वाढवतात; मात्र सततच्या चोरीमुळे त्यांचे मोठे आर्थिक नुकसान होत आहे. या भागात रस्त्यालगत असलेल्या शेतांमधील पत्र्यांच्या शेडवर चोरट्यांचे विशेष लक्ष असून ते रात्रीच्या वेळी वाहन रस्त्याच्या कडेला उभी करून काही मिनिटांतच शेळ्या-बकरे वाहनात भरून पसार होत असल्याचे प्रकार समोर येत आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांना रात्री जागरण करून जनावरांची राखण करावी लागत आहे.
बेळसांगवी येथे दि. २४ मार्च रोजी शेतकरी किशोर सकमाजी तेलंगे यांच्या शेडमधून तब्बल ३० शेळ्यांची चोरी झाली असून यात अंदाजे १ लाख ४० हजार रुपयांचे नुकसान झाले आहे. त्यानंतर दि. २१ एप्रिल रोजी हाळी शिवारातील मानपाडा यांच्या शेतातील पत्र्याच्या शेडमधून १० शेळ्या चोरीला गेल्या असून त्यांची किंमत सुमारे ६१ हजार रुपये आहे. तसेच घोणसी येथे मोहम्मद उस्मानसाब शेख यांच्या २ शेळ्या व ३ पिल्ले, तिरुका परिसरात राम सोनबा कराड यांच्या ३ शेळ्या आणि बेळसांगवी येथे रुखमाजी तेलंग यांच्या ३० शेळ्यांची चोरी झाल्याच्या घटना घडल्या आहेत. वाढवणा बु पोलीस ठाण्यात या प्रकरणी काही गुन्हे दाखल झाले असले तरी अद्याप चोरट्यांचा ठोस माग काढण्यात पोलिसांना यश आलेले नाही. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये नाराजीचे वातावरण आहे.
सततच्या या घटनांमुळे हाळी-हंडरगुळी परिसरातील शेतकरी आर्थिक संकटात आहेत. पोलीस प्रशासनाने याची गांभीर्याने दखल घेऊन रात्रीची गस्त वाढवावी, अशी मागणी होत आहे.

## मुरुड येथे निवडणूक प्रचाराचा जोर





**तभा वृत्तसेवा**
**लातूर दि. २६ एप्रिल :** मागील वर्षी मुरुड बु. ग्रामपंचायत सदस्य सूर्यकांत गाडे यांचे दीर्घ आजाराने निधन झाले असल्याकारणाने ग्रामपंचायत सदस्य ची जागा रिक्त झाली होती. या रिक्त झालेल्या जागेची पोट निवडणूक या ठिकाणी लागली असून याकरिता दोन उमेदवार रिंगणात उतरलेले आहेत. यामध्ये माजी ग्रामपंचायत सदस्य कै. सदस्य सूर्यकांत गाडे यांच्या पत्नी तिलोतमा सूर्यकांत गाडे या मुरुड परिवर्तन पॅनलच्या माध्यमातून निवडणुकीच्या रिंगणात उभ्या आहेत,
तर यांना प्रतिस्पर्धी म्हणून समाधान शितोळे हे उभे आहेत. गेली वर्षभर झालं हे ग्रामपंचायत सदस्याचे पद रिक्त होते. मतदान दि. २८ एप्रिल रोजी मुरुड या ठिकाणी होणार आहे. वार्ड क्रमांक चार मध्ये हे निवडणूक लागलेली आहे. सध्या वार्ड क्रमांक चार मध्ये
प्रचाराचा जोर वाढला असून दोन्हीही उमेदवार नागरिकांच्या गाठीभेटी घेत असून विकासासाठी आम्ही काय प्रयत्न करू हे लोकांना सांगून मत मिळवण्याचा प्रयत्न करीत आहेत. दोन्ही ठिकाणी फक्त स्वतः उमेदवार हे प्रचार करताना असताना दिसून येत आहेत. ग्रामपंचायतचा कार्यकाळ हा एक वर्षापुरता राहिलेला आहे. ही निवडणूक मंगळवार दि. २८ एप्रिल रोजी सकाळी साडेसात ते सायंकाळी साडेपाच या वेळामध्ये मुरुड या ठिकाणी होणार आहे.

# कव्हा येथे कलश स्थापना उत्साहात



**तभा वृत्तसेवा**
**लातूर दि. २६ एप्रिल :** तालुक्यातील कव्हा येथे शुक्रवारी विठ्ठल-रुक्मिणी, तुळजाभवानी व महादेव मंदीर येथे मनिषा आवसकर, रंजना रुकमे, सोनी गोडभरले, कमल बिर्ले, रानी निलापल्ले व म.नि.प्र.मुरगेंद्र महास्वामीजी यांच्या हस्ते कलश पूजा करून स्थापना करण्यात आली.
हभप केशव महाराज उखळीकर यांच्या किर्तनाने व महाप्रसादाने कार्यक्रमाची सांगता झाली. या कार्यक्रमास पंचक्रोशितिल भाविक भक्तासह लेकमाता मोठ्या संखेने उपस्थित होत्या. यावेळी प्रा गोविंद घार, प्रा. अशोक पाटील, प्रा.
बस्वराज सुलगुडले, बब्रुवान जाधव, नवनाथ बरुरे,शेषेराव रुकमे, शेषेराव जाधव,दत्तुपंत कदम, गोपाळ वांगे,कांताप्पा पाटणकर, शिवाप्पा पारणकर, अरुण घार, संगाप्पा रुकारे, गोविंद रुकमे, दत्ता खंडागळे, संतोष सुलगुडले,
बालाजी गुडे, विजय कदम, महादेव साखरे, रमाकांत कदम, वर्षा नकाते, मिना पाटणकर, शिल्पा पाटणकर, शैलेजा पाटणकर, अलका पाटणकर, अलका चामे, वैशाली वलाकटे, शोभा बरुरे, मोहीनी अकनगिरे, शुभांगी मेगशेट्टे उपस्थित होते.

# निलंगा तालुक्यात जनगणनेचे पहिल्या टप्प्यातील प्रशिक्षण संपन्न

**तभा वृत्तसेवा**
निलंगा **दि. २६ एप्रिल :** भारताची जनगणना २०२७ च्या अनुषंगाने निलंगा ग्रामीण यामध्ये नियुक्त प्रगनक व सुपरवायझर यांचे पहिल्या टप्प्यातील तीन दिवसाचे प्रशिक्षण महाराष्ट्र महाविद्यालय येथे संपन्न झाले . निलंगा ग्रामीण तालुक्यासाठी एकूण ५७८ एवढे प्रगनक व ९५ एवढे सुपरवायझर यांच्या नियुक्ती करण्यात आल्या असून त्यांचे तीन टप्प्यांमध्ये प्रशिक्षण आयोजित केले असून पहिल्या टप्प्यामध्ये ३०० प्रगणकांना प्रशिक्षण देण्यात आली असल्याची माहिती सहाय्यक चार्ज अधिकारी प्रवीण आळंदकर व चार्ज अधिकारी तथा तहसीलदार प्रसाद कुलकर्णी यांनी दिली. सदर जनगणनेचे वैशिष्ट्य म्हणजे ही जनगणना संपूर्णपणे ऑनलाइन पद्धतीची असून जनगणना संचलयानामार्फत तयार करण्यात आलेल्या विशिष्ट पवर मोबाईलवरच करण्यात येणार असल्याची माहिती ही सहाय्यक चार्ज अधिकारी प्रवीण आनंदकर यांनी दिली.



सदर जनगणनेची वैशिष्ट्य म्हणजे दिनांक १ मे ते १५ मे या कालावधीत स्व गणना होणार असून सदर पचा वापर करून नागरिक स्वतः देखील जनगणना करू शकणार असल्याची माहिती ही देण्यात आली. प्रत्यक्ष घरगणना ही दिनांक १५ मे ते १४ जून या कालावधीत संपन्न होणार असून त्या पुढील कालावधीमध्ये प्रत्यक्ष जनगणना होणार आहे . पुढील टप्प्याचे प्रशिक्षण हे दिनांक २७, २८ आणि २९ एप्रिल रोजी पार पडणार असल्याची ही माहिती देण्यात आली. सदर प्रशिक्षणास जाणीवपूर्वक गैरहजर असलेल्या प्रगनकाना नोटीस देण्यात येऊन त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती ही चार्ज अधिकारी तहसीलदार प्रसाद कुलकर्णी यांनी दिली

## लातूरकरांच्या आरोग्याशी कोणतीही तडजोड सहन केली जाणार नाही : नगरसेवक राजे



**तभा वृत्तसेवा**
**लातूर दि. २६ एप्रिल :** लातूर शहरातील पिवळ्या पाण्याच्या गंभीर प्रश्नाच्या पार्श्वभूमीवर आपण लातूर शहर महानगरपालिकेच्या जल शुद्धीकरण केंद्र येथे प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केली.
या पाहणी दरम्यान अत्यंत धक्कादायक बाबी समोर आल्या असून पाणीपुरवठा व्यवस्थेतील मोठ्या त्रुटी उघड झाल्या आहेत.त्यामुळे लातूरकरांच्या आरोग्याशी कोणतीही तडजोड सहन करणार नाही असा इशारा भाजपचे तरुण नगरसेवक ऋषिकेश राजे यांनी दिला आहे.
गेल्या अनेक दिवसापासून लातूरकरांना पिण्यासाठी पिवळसर पाण्याचा पुरवठा होतो आहे. त्यामुळे नगरसेवक राजे यांनी नुकतीच जलशुद्धीकरण केंद्रास भेट देऊन पाहणी केली..यावेळी त्यांनी केलेल्या पाहणीमध्ये काही त्रुटी आढळल्या. पाण्याची गुणवत्ता तपासणी करण्यासाठी आवश्यक कि व ढऊ्ढ मोजण्यासाठी कोणतीही सुसज्ज प्रयोगशाळा उपलब्ध नाही. पाण्याच्या तपासणीचे अधिकृत अहवाल उपलब्ध नाहीत, यामुळे गुणवत्तेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असल्याचे ते म्हणाले.
जल शुद्धीकरण केंद्रावर सुरक्षा रक्षकांची नेमणूक नाही, ही अत्यंत गंभीर व निष्काळजी बाब आहे. संपूर्ण परिसरात सिसिटीव्ही कैमेरे बसवलेले नाहीत, त्यामुळे देखरेख व पारदर्शकता पूर्णपणे दिसून येत नाही पाणी शुद्ध करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या रसायनांचे प्रमाण निश्र्चित करणारा कोणताही नोंदवही उपलब्ध नाही, जे अत्यंत धोकादायक असून वरील सर्व बाबी पाहता, लातूरकरांच्या आरोग्याशी मोठ्या प्रमाणावर धोका निर्माण झाला आहे.ही संपूर्ण यंत्रणा अत्यंत निष्काळजीपणे चालवली जात असल्याचे स्पष्ट होते.
या सर्व प्रकरणाची सखोल चौकशी करून जबाबदार अधिका-यांवर तात्काळ कारवाई करण्यात यावी, तसेच जल शुद्धीकरण प्रक्रियेत पारदर्शकता व काटेकोरपणा आणण्यासाठी तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी आपली ठाम मागणी असून लातूरकरांच्या आरोग्याशी कोणतीही तडजोड सहन केली जाणार नाहीअसा इशाराही नगरसेवक ऋषिकेश राजे यांनी दिला आहे.

# जळकोट तालुका फर्टीलायझर्स असोसिएशन आज पासून कृषी दुकाने बेमुदत बंद




**तभा वृत्तसेवा**
**जळकोट दि. २६ एप्रिल :** तालुक्यातील . महाराष्ट्र राज्य कृषि विक्रेत्यांचा बेमुदत बंद असल्यामुळे जळकोट तालुक्यातील संपूर्ण कृषि सेवा केंद्र दि.२७ एप्रिल २०२६ पासून बेमुदत बंद राहणार आहेत.जळकोट तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले .अशी माहिती जळकोट तालुका फर्टीलायझर्स असोसिएशनचे अध्यक्ष सोमेश्वर सोपा उपाध्यक्ष श्रीकृष्ण कोटलवारयांनी माहिती दिली .
खत कंपन्याकडून केले जाणारी लिकींगच्या विरोधात जाचक साथी ॲपच्या माध्यमातून बियाणे विक्री अनिवार्य करण्याच्या विरोधात किरकोळ खत विक्रेत्यावर लावलेल्या जाचक नियम व अटीच्या विरोधात नविन लागु होणारे जाचक बियाणे व किटक नाशक कार्यदा विरोधात दुकानदाराला सिलबंद कृषि निष्ठा विक्री केल्यावर ही शिक्षा होते या अन्यायाच्या विरोधात जळकोट तालुक्यातील पुर्ण कृषि सेवा केंद्र बंदला पुर्ण पाठींबा म्हणून महाराष्ट्र राज्य कृषि विक्रेतेच्या बेमुदत बंदला पुर्ण पाठींबा दिला आहे. म्हणून जळकोट कृषि आसोसियशननी दि.२७ एप्रिल २०२६ रोजी पासून बेमुदत बंद पुकारलेला आहे. त्यासाठी हे निवेदन देण्यात आले आहे.

## पोहरेगाव येथे गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान



**तभा वृत्तसेवा**
रेणापूर **दि. २६ एप्रिल :**पोहरेगाव येथील विठ्ठल नगर जिल्हा परिषद प्राथमिक शाळा येथे शाळेच्या वतीने घेण्यात आलेल्या परीक्षेत प्राविण्य मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा बक्षीस वितरण व सन्मान सोहळा उत्साहात सपन्न झाला .
या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणुन जि.प.सदस्या मनिषाताई गंगासिंह कदम या होत्या तर गावच्या प्रथम नागरिक सरपंच सौ. ज्योतीताई मोरे, उपसरपंच शालीवाहन सरवदे, ग्रामपंचायत सदस्य भगिरथ घाटुळे, रामराव आबा सरवदे,विनायकराव सरवदे,सुभाष वाघ यांची प्रमुख उपस्थिती होती
कार्यक्रमाचे आयोजन येथील जिल्हा परिषद शाळेच्या वतीने करण्यात आले होते विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी अशा उपक्रमांचे महत्त्व असल्याचे उपस्थित मान्यवरांनी आपल्या मनोगतातून व्यक्त केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी जिल्हा परिषद शाळेचे
या प्रसंगी शाळेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. या शाळेतील विद्यार्थी अतिशय गुणी,अभ्यासात हुशार व जिज्ञासू असून शिक्षकांच्या परिश्रमातून त्यांची घडण होत असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले . तसेच शाळेचे शिक्षक,पालक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# प्रा.लहूकांत शेवाळे सुनिता वेल्हाळे गुरु गौरव पुरस्काराने सन्मानित




**तभा वृत्तसेवा**
रेणापूर **दि. २६ एप्रिल :** येथील श्रीराम प्राथमिक माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालयातील ज्येष्ठ प्राध्यापक लहूकांत शेवाळे व ज्येष्ठ शिक्षिका सुनीता वेल्हाळे यांना गुरुवार दि' २३ एप्रिल रोजी लातुर येथील दयानंद सभागृह येथे महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेच्या वतीने गुरु गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.
प्राध्यापक लहूकांत शेवाळे यांच्या शैक्षणिक चळवळीतील योगदान व शिक्षण क्षेत्रातील अनुभव पाहता त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला तर सुनीता वेल्हाळे यांच्या नवोपक्रमशीलता व कल्पकता यामुळे शिक्षण क्षेत्रातील त्यांच्या कार्याचा यानिमित्ताने गौरव करण्यात आला.
या कार्यक्रमाच्या प्रसंगी व्यासपीठावर
ना.बाबासाहेब पाटील( सहकार मंत्री, महाराष्ट्र राज्य),आ. विक्रमजी काळे, मधुकरजी उन्हाळे( राज्याध्यक्ष, शिक्षक परिषद), दयानंदजी सुरवसे( उपाध्यक्ष, जि.प.लातूर), रामचंद्र तिरुके( गटनेता, जि.प.लातूर), शिवकन्याताई गोडभरले( सभापती, महिला व बालकल्याण जि.प. लातूर) शोभाताई अकनगिरे( नगराध्यक्ष,नगरपंचायत, रेणापूर),भुजंग शिंदे( उपसभापती, पं.स.चाकूर), डॉ. भागीरथी गिरी( प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, अंबाजोगाई) महाराष्ट्र शिक्षक परिषदेचे राज्य कार्याध्यक्ष मच्छिंद्र गुरमे यांच्या हस्ते व मा.देविदासराव कुटवाड,अध्यक्ष रेणुका शिक्षण संस्था,रेणापूर, संचालक अनिताताई भातिकरे,ड. सुनिल कुटवाड, ड.दिपक गोडभरले,ड. नरेश उगिले,प्राचार्य सिध्देश्र्वर मामडगे, मुख्याध्यापक चंचला वलसे, पर्यवेक्षक अनिल कुटवाड,प्रा.भरत धायगुडे,गणेश नराळे,सुरेखा बस्तापूरे यांची उपस्थिती होती. यांच्या उपस्थितीत गुरुगौरव पुरस्काराचे वितरण झाले. यावेळी श्रीराम प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागातील सर्व प्राध्यापक,शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी,स्नेही व शिक्षणप्रेमी नागरीक मोठ्या संख्यनेउपस्थित होते. प्रा.शेवाळे याच्यावर परीसरातील शिक्षण प्रेमी नागरीकाकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे

धाराशिव
# जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## नळदुर्गमध्ये गारमेंट्स दुकान फोडून ८.२९ लाखांचा ऐवज लंपास

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२६ एप्रिल -**

नळदुर्ग येथे गारमेंट्स दुकान फोडून तब्बल ८ लाख २९ हजार ८०० रुपयांचा ऐवज चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकारामुळे व्यापारी वर्गात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

फिर्यादी जुबेरपाशा सज्जादमियां जहागीरदार (वय ४५, रा. ईनामदार गल्ली, नळदुर्ग ता. तुळजापूर जि. धाराशिव) यांच्या तक्रारीनुसार, जगताप नगर परिसरातील वसंत नगर ते खंडोबा मंदिर मार्गालगत असलेल्या अस्फान गारमेंट्स या दुकानाच्या खिडकीचे गज वाकवून अज्ञात चोरट्यांनी आत प्रवेश केला.



दि.२० एप्रिल रोजी दुपारी १ ते दि.२३ एप्रिल रोजी दुपारी १२ या कालावधीत चोरट्यांनी पॉलीकॅब कंपनीचे विविध क्षमतेचे वायरिंग असलेले ६० बंडल, लिपु स्पेशल कंपनीची कपडे कापण्याची ३ मशीन, जुकी कंपनीच्या ०.५ एचपी क्षमतेच्या ९ मोटारी तसेच क्रॅमटन कंपनीचे २ नवीन सील पॅक सिलींग फॅन बॉक्स असा एकूण ८,२९,८०० रुपये किंमतीचा माल लंपास केला.

या प्रकरणी फिर्यादी जुबेरपाशा जहागीरदार यांनी दि.२५ एप्रिल रोजी दिलेल्या तक्रारीवरून नळदुर्ग पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला असून पुढील तपास पोलीस करीत आहेत.



https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

सोलापूर तरुण भारत

मठ व्यवस्थापनावर गंभीर प्रश्नचिन्ह | वादग्रस्त स्वयंघोषित राष्ट्रसंत लोमटे महाराजांच्या मठातील प्रकार...

# मलकापूर साठवण तलावात विद्यार्थ्याचा बुडून मृत्यु

**तभा वृत्तसेवा**
**येरमाळा, दि.२६ एप्रिल -**

कळंब तालुक्यातील मलकापूर येथील श्री दत्त मंदिर मठाजवळील साठवण तलावात रविवारी सकाळी सुमारे नऊ वाजता एका अल्पवयीन विद्यार्थ्याचा बुडून मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना घडली. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून मठ व्यवस्थापनाच्या निष्काळजीपणावर तीव्र प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

मृत मुलाचे नाव रुद्र संतोष धुमाळ (वय १५, रा. अंबाजोगाई) असे असून तो तेर येथील वारकरी संस्थेसोबत कीर्तनासाठी मलकापूर येथे आला होता. मठात सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताहामुळे परिसरात भाविकांची मोठी गर्दी होती. दरम्यान, रुद्र आपल्या दोन मित्रांसह तलावात पोहण्यासाठी गेला असता, त्याला पोहता येत नसल्याने खोल पाण्याचा अंदाज न घेतल्यामुळे तो बुडू लागला.

सोबतच्या मित्रांनी त्याला वाचवण्याचा प्रयत्न केला, मात्र त्यात त्यांना अपयश आले. त्यानंतर एका मित्राने वारकरी संस्थेचे रघुनंदन पुजारी यांना माहिती दिली. मात्र, बचावकार्य सुरू होण्यापूर्वीच रुद्रचा पाण्यात बुडून मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे.

स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, मलकापूर मठ परिसरातील या तलावात यापूर्वीही अशा दुर्घटना घडल्या आहेत. तरीही आवश्यक सुरक्षा उपाययोजना करण्यात आलेल्या नसल्याने संताप व्यक्त केला जात आहे.

विशेषतः बाहेरून येणाऱ्या लहान मुलांच्या सुरक्षेकडे दुर्लक्ष झाले का, असा सवाल उपस्थित होत आहे. दरम्यान,





मठाचे प्रमुख महाराज एकनाथ लोमटे यांच्यावर यापूर्वीही विविध आरोप झाल्याची चर्चा असून या घटनेनंतर त्यांच्या भूमिकेवर पुन्हा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

वारकरी संस्थेतील मुलांच्या देखरेखीबाबत तसेच तलाव परिसरात सुरक्षा व्यवस्थेच्या अभावाबाबत नागरिकांनी नाराजी व्यक्त केली आहे.

घटनेची माहिती मिळताच पोलीस प्रशासन घटनास्थळी दाखल झाले. मात्र, बचावकार्याकरिता राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल (एनडीआरएफ) पथकाला कळवूनही दुपारी तीन वाजेपर्यंत पथक घटनास्थळी पोहोचले नव्हते. यामुळे संतप्त नातेवाईकांनी आक्रोश व्यक्त करत प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.

एनडीआरएफ पथक वेळेवर का पोहोचले नाही, वाहतुकीची अडचण होती का, याची चौकशी करण्याची मागणी होत आहे.

सकाळपासून पोलीस कर्मचारी घटनास्थळी उपस्थित राहून पथकाची प्रतीक्षा करत होते.

या दुर्दैवी घटनेमुळे मलकापूर परिसरात हळहळ व्यक्त होत असून भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी ठोस सुरक्षा उपाययोजना करण्याची मागणी जोर धरत आहे.

## महामार्गावर उभ्या ट्रकला धडक; चालकाचा मृत्यु

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२६ एप्रिल -**




राष्ट्रीय महामार्ग क्र. ३६१ वर करजखेडा शिवारात उभ्या ट्रकला धडकून एका ट्रक चालकाचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. या प्रकरणी निष्काळजीपणे ट्रक उभा करणाऱ्या चालकाविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

मृताचे नाव विठ्ठल श्रीपती चव्हाण (वय ३४, रा. दुर्गा तांडा कुरुळा ता. कंधार जि. नांदेड) असे आहे. ते दि.२२ एप्रिल रोजी रात्री ११ वाजता एमएच २६ सीएच ८९४९ क्रमांकाच्या ट्रकने चंद्रपूरहून सातारा-पाटणकडे जात होते. दरम्यान, करजखेडा शिवारातील गोगाव पाटीजवळ रोडवर एमएच २४ एयू ७६९० क्रमांकाचा ट्रक चालकाने कोणतेही इंडिकेटर, रिफ्लेक्टर लाईट किंवा दिशादर्शक चिन्ह न लावता ट्रक रस्त्यावर उभा केला होता. त्यामुळे रहदारीस अडथळा निर्माण झाला.

याच कारणामुळे विठ्ठल चव्हाण यांच्या ट्रकने मागून उभ्या ट्रकला जोरदार धडक दिली. या अपघातात ते गंभीर जखमी होऊन त्यांचा मृत्यू झाला.

या प्रकरणी फिर्यादी श्रीपती परसराम चव्हाण (वय ४९, रा. दुर्गा तांडा कुरुळा ता. कंधार जि. नांदेड) यांनी दि. २५ एप्रिल रोजी दिलेल्या तक्रारीवरून बेंबळी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला असून पुढील तपास पोलीस करीत आहेत.

# तुळजापूरात ‘फुले-शाहू-आंबेडकर विचारांचा जागर’ रथाचे स्वागत

**भिडे वाड्याची आकर्षक प्रतिकृती; फटाक्यांच्या आतषबाजीत शहरवासीयांचा जल्लोष**



**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२६ एप्रिल -**

अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेच्या वतीने क्रांतीसूर्य महात्मा फुले यांच्या जयंतीनिमित्त पुणे येथील भिडे वाड्याची प्रतिकृती साकारलेल्या ‘जागर रथा’चे तिर्थक्षेत्र तुळजापूर शहरात आगमन होताच मोठ्या उत्साहात स्वागत करण्यात आले. छत्रपती शिवाजी महाराज चौकात शनिवार दि.२५ रोजी सायंकाळी साडेसात वाजता रथ पोहोचताच फटाक्यांची आतषबाजी करून वातावरण दणाणून गेले.



अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ तसेच माजी खासदार समीर भुजबळ यांच्या संकल्पनेतून या विशेष जागर रथाची निर्मिती करण्यात आली आहे.

या रथावर पुण्यातील ऐतिहासिक भिडे वाड्याची आकर्षक प्रतिकृती उभारण्यात आली असून महात्मा फुले, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांच्या प्रेरणादायी पुतळ्यांची मांडणी करण्यात आली आहे. रथावर आकर्षक कोरीव काम व विद्युत रोषणाईमुळे तो अधिकच लक्षवेधी ठरत आहे.

महात्मा फुले यांच्या जयंतीनिमित्त पुण्यातील भिडे वाड्यापासून सुरू झालेला हा जागर रथ नाशिक, अहिल्यानगर, बीड, धाराशिव, तुळजापूर, लातूर, सोलापूर, परभणी यांसह पश्चिम महाराष्ट्र व विदर्भातील विविध भागांत फिरून फुले-शाहू-आंबेडकर यांच्या विचारांचा प्रसार करणार आहे.

तुळजापूर येथे रथाचे आगमन होताच महात्मा फुले युवा मंच, समता परिषद, फुलेप्रेमी व शहरवासीयांच्या उपस्थितीत छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी समता परिषदेचे तालुकाध्यक्ष मनोज वाघमारे, काका माळी, सदाशिव क्षिरसागर, समर्थ वाघमारे, श्रीराम भोजने, आप्पासाहेब सुरवसे, चंद्रसेन भोजने, मंगेश कुंभार, राजदीप जठार, रामहरी क्षिरसागर, आकाश भोजने, रंगनाथ भोजने, ओंकार भोजने, अनिकेत भोजने आदी मान्यवर उपस्थित होते.

## उमरगा बसस्थानकात गर्दीत सोन्याचे गंठण लंपास

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.२६ एप्रिल -**

येथील बसस्थानकात गर्दीचा फायदा घेत अज्ञात चोरट्याने महिलेच्या गळ्यातील सोन्याचे गंठण चोरून नेल्याची घटना घडली.

फिर्यादी दैवताबाई गुरुनाथ सूर्यवंशी (वय ५८, रा. शास्त्री नगर उमरगा) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, दि.२३ एप्रिल रोजी त्या उमरगा बसस्थानकावरून उमरगा-लातूर बसमध्ये चढत होत्या. यावेळी गर्दीचा फायदा घेत अज्ञात व्यक्तीने त्यांच्या गळ्यातील सुमारे १३ ग्रॅम वजनाचे, अंदाजे ७२,८०० रुपये किंमतीचे सोन्याचे गंठण चोरून नेले. या प्रकरणी गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

# एसटी बसच्या धडकेत दुचाकीवरील दोघांचा मृत्यु

**हंगरगा-जळकोट मार्गावरील भीषण अपघात; जखमींना मदत न करता चालक पसार...**

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२६ एप्रिल -**

तुळजापूर तालुक्यातील हंगरगा-जळकोट मार्गावर एसटी बस व दुचाकीच्या भीषण अपघातात दोन जणांचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. या प्रकरणी निष्काळजीपणे वाहन चालवणाऱ्या बस चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




फिर्यादी आसमा इब्राहीम शेख (वय २९, रा. हंगरगा नळ ता. तुळजापूर जि. धाराशिव) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, त्या मयत सबीया मुनाफ जमादार (वय ३१) व समीर जाफर फकीर (वय १९) यांच्यासह दि. २१ एप्रिल २०२६ रोजी दुपारी ३.३० वाजता एमएच १२ जेटी ८९४८ क्रमांकाच्या मोटरसायकलवरून जात होत्या.

दरम्यान, हंगरगा ते जळकोट मार्गावर जळकोट शिवारात तमनप्पा माळगे यांच्या शेताजवळ एसटी बस (क्र. एमएच ४० एन ९६७२) चालकाने बस हायगई व निष्काळजीपणे चालवत दुचाकीला जोरदार धडक दिली. या अपघातात समीर फकीर व सबीया जमादार हे गंभीर जखमी होऊन जागीच मृत्यूमुखी पडले, तर आसमा शेख या किरकोळ जखमी झाल्या. अपघातानंतर बस चालकाने जखमींना उपचारासाठी न नेता घटनास्थळावरून निघून गेल्याचा आरोप आहे.

या प्रकरणी आसमा शेख यांनी दि. २५ एप्रिल रोजी दिलेल्या फिर्यादीवरून नळदुर्ग पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला असून पुढील तपास पोलीस करीत आहेत.

# उमरगा जि.प. हायस्कूलमध्ये एकल मातांसाठी मार्गदर्शन शिबिर

**सावित्रीबाई फुले बालसंगोपन योजनेची माहिती... अर्ज प्रक्रिया व कागदपत्रांबाबत सविस्तर मार्गदर्शन...**

### ३९ विद्यार्थ्यांना योजनेचा लाभ...

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.२६ एप्रिल -**



उमरगा येथील जिल्हा परिषद हायस्कूलमध्ये सावित्रीबाई फुले बालसंगोपन योजनेअंतर्गत एकल माता व पात्र विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात साऊ समितीचे जिल्हा समन्वयक तसेच मिशन वत्सल्य समितीचे सदस्य व शाळेचे माजी विद्यार्थी काका जाधव यांनी उपस्थित महिलांना व विद्यार्थ्यांना सविस्तर मार्गदर्शन केले.

यावेळी मुख्याध्यापक पद्माकर मोरे, उमरगा-लोहरा तालुकाध्यक्ष काशिनाथ पाटील, ज्योती माने, बबीता गुरव आदी मान्यवर उपस्थित होते. शिबिरात शाळेतील ३९ विद्यार्थ्यांना क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले बालसंगोपन योजनेअंतर्गत दरमहा २२५० रुपयांचा लाभ मिळवण्यासाठी आवश्यक कागदपत्रे, अर्ज प्रक्रिया, अर्ज कोठे व कसा करावा याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. तसेच आवश्यक कागदपत्रांची जुळवाजुळव कशी करावी, याचेही मार्गदर्शन करण्यात आले.

मुख्याध्यापक पद्माकर मोरे यांनी सांगितले की, शाळेमार्फत सर्व विद्यार्थ्यांचे फॉर्म भरण्यासाठी आवश्यक कागदपत्रांची १०० टक्के पूर्तता करण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांची बँक पासबुकची व्यवस्था आधीच करण्यात आली असून बोनाफाईड व उत्पन्नाचा दाखला शाळेकडून उपलब्ध करून देण्यात येणार आहे. येत्या चार दिवसांत सर्व विद्यार्थ्यांचे अर्ज भरून घेण्यासाठी प्रयत्न केले जातील.

महाराष्ट्रात प्रथमच अशा प्रकारचे मार्गदर्शन शिबिर आयोजित करून एकल महिलांना विविध शासकीय योजनांची माहिती देण्याचा अभिनव उपक्रम राबविण्यात आल्याचे सांगण्यात आले. या उपक्रमाचा शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना लाभ झाला.

कार्यक्रमासाठी मोठ्या प्रमाणात एकल महिला उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी धनराज तेलंग, बशीर शेख, सोनाली मुसळे, संजय रुपाजी, नागेश स्वामी, भाग्यश्री पंडित, वर्षाराणी पाटील, प्रवीण शिंदे यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भाग्यश्री पंडित यांनी केले, प्रास्ताविक मुख्याध्यापक पद्माकर मोरे यांनी केले तर आभार सोनाली मुसळे यांनी मानले.

# वाऱ्याने मंडप फाटल्याने भाविकांना उन्हाचे चटके; तुळजाभवानी मंदिर संस्थानवर भाविकांची नाराजी



**पंधरा दिवस उलटूनही मंडप दुरुस्त नाही... वेळ मारून पणामुळे भाविकांसह शहरवासीयांमध्ये नाहक त्रास...**



मंदिर महाद्वार आणि प्रशासकीय कार्यालय समोरील मंडपाचे कापड पूर्णपणे उडून गेले आहे त्यामुळे केवळ मंडपाचे अँगल राहिले आहेत. मंदिर महाद्वार आणि प्रशासकीय कार्यालयासमोर उन्हापासून बचाव करण्यासाठी भाविक डोक्यावर तर रुमाल गमजे टोप्या घालून वावरत असल्याचे आढळून येतात. पण अनवाणी पायामुळे उन्हाचे चटके पायांना बसतात मंदिर महाद्वार समोर तुटपुंजी मॅट हातरली आहे पण हजारोंच्या संख्येने येणाऱ्या भाविकांना त्याचा उपयोग होत नाही. मंदिर महाद्वार समोर पारंपारिक पद्धतीचे जमिनीवर दगड बसवले आहेत ते उन्हामध्ये जास्त मोठ्या प्रमाणात गरम होतात. आणि मंदिर समोर आणि परिसरात भाविक विना चप्पल बूट वावरत असतात. त्यामुळे उन्हाचा त्रास सहन करत भाविक तुळजाभवानी देवीचे दर्शन करतात. पण दर्शनानंतर मंदिर संस्थानच्या नावाने चांगलेच खडे फोडतात.

**सचिन ताकमोघे**
**तुळजापूर, दि.२६ एप्रिल -**

तुळजाभवानी मंदिर संस्थांच्या वतीने प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी उन्हामध्ये भाविकांना त्रास होऊ नये म्हणून मंदिर महाद्वार समोर आणि भवानी रोड वर मंडप उभा करण्यात आला आहे पण

मागल्या दहा-पंधरा दिवसांपूर्वी झालेल्या वादळी पावसामुळे भाविकांसाठी उभा करण्यात आलेल्या मंडपाचा कपडा वाऱ्याने उडून गेला तर काही ठिकाणी फाटला आहे. या घटनेला होऊन दहा-पंधरा दिवस उलटून गेलेली असताना देखील मंदिर संस्थानने हा मंडप दुरुस्त केला नाही. सध्या एप्रिल चा शेवटचा आठवडा असल्याने दिवसेंदिवस उन्हाचा पारा वाढत आहे. हे तापमान जवळपास ४० अंश सेल्सिअस पर्यंत गेले आहे. तुळजाभवानी देवीच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांमध्ये लहान मुले आणि वृद्ध भाविकांची संख्या मोठ्या प्रमाणात असते तर अनवाणी पायाने भाविक कार पार्किंगपासून चालत येत असतात. अशा भाविकांना मंडप फाटल्याने उन्हामध्ये पायांना चटके बसतात. पुजारी आणि शहरवासीयांनी अनेक वेळा मंदिर संस्थान कडे रस्त्यांवर उन्हापासून बचाव करणारे वाईट पेंन्टचे पट्टे मारण्याची मागणी केली आहे पण रस्त्यावर असे वाईट पेंटचे पट्टे मारले गेले नाहीत. तसेच बस स्टॅन्ड पासून रस्त्यांवर मॅट टाकण्याची देखील मागणी केली आहे. पंधरा दिवस उलटूनही मंडप दुरुस्त न केल्याने भाविकांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. तुळजाभवानी देवीच्या दर्शनास आल्यानंतर मंदिर संस्थांच्या नियोजन शून्य कारभाराचा फटका भाविकांना बसतो. अजून उन्हाळा साधारण दीड महिना बाकी आहे. लवकरात लवकर मंडप दुरुस्त केल्यास भाविकांच्या पायाला बसणारे उन्हाचे चटके कमी होतील.

मंदिर संस्थान फाटलेला मंडप कधी दुरुस्त करणार याकडे भाविकांसह शहरवासीयांचे लक्ष लागले आहे.

CMYK

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## प्लॅस्टिक पिशव्या वापरणाऱ्या ५६ दुकानांवर कारवाई

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २६ एप्रिल :** शहराच्या गांधी चौकासह विवेकानंद चौक, कव्हा नाका, राजीव गांधी चौक, औसा रस्ता, बार्शी रस्ता, गंजगोलाई आदी भागात सलग दोन दिवस करण्यात आलेल्या कारवाईत तब्बल २५ किलो प्लॅस्टिक कॅरिबॅगचा साठा जप्त करण्यात आला. यावेळी ५६ दुकानदारांना ३२ हजार रुपयांचा दंड आकारण्यात आला. महापौर जयश्री सोनकांबळे यांच्या निर्देशानुसार महापालिकेच्यावतीने ही कारवाई करण्यात आली.

शहरातील प्रत्येक व्यापाऱ्यासह हातगाडीवरील व्यावसायिकही मोठ्या प्रमाणावर बंदी असलेल्या प्लॅस्टिक पिशव्यांचा वापर करताना दिसून येतात. हे प्लॅस्टिक विघटितही होत नाही. त्यामुळे गटारी तुंबतात. त्या वजनाने हलक्या असल्याने वाऱ्याने उडून घाणीचे साम्राज्य पसरते. अशा प्लॅस्टिक पिशव्यांवर बंदी असतानाही त्याचा सर्रास वापर होत असल्याचे निदर्शनास आल्याने महापौर जयश्री सोनकांबळे व महापालिका आयुक्त मानसी यांनी प्लॅस्टिक वापरणाऱ्यांवर कारवाई करण्याच्या सूचना दिल्या. त्यानुसार शहरातील ५६ दुकानदारांकडून कॅरिबॅग जप्त करण्यात आल्या. त्यांच्याकडून ३२ हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला. यावेळभ २५ किलो कॅरिबॅग जप्त करण्यात आल्या.



## विविध वृत्त...

### महापालिकेत हिवतापदिनी आरोग्य तपासणी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २६ एप्रिल :** जागतिक हिवताप दिनानिमित्त महानगरपालिकेच्या तावरजा कॉलनी येथील नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रात जनजागृती व आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले. यात शेकडो रुग्णांची आरोग्य तपासणी करून मोफत औषधोपचार करण्यात आले. यावेळी नगरसेवक ॲड. किरण जाधव, सुरेखा ईगे, नसरीन शेख, मंगेश सोनकांबळे, सचिन गायकवाड उपस्थित होते.

यावेळी २०२४ या वर्षात आजार प्रतिबंधात्मक उपाययोजनांत उत्कृष्ट कामगिरी केलेल्या वैद्यकीय अधिकारी डॉ. शर्वरी महाजन आणि लॅब टेक्निशियन रेशमा डांगे यांचा सन्मान करण्यात आला. आरोग्य निरीक्षक पार्श्र्वनाथ पाटील यांच्या आरोग्य सर्वेक्षणात्मक उत्कृष्ट कामगिरीबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. डेंग्यू, मलेरिया प्रतिबंधासाठी घरोघरी जाऊन उपाययोजनांची अंमलबजावणी करणाऱ्या आशा स्वयंसेविकांचाही सत्कार करण्यात आला.

डॉ. शंकर भारती यांनी प्रास्ताविक करतांना जागतिक हिवताप दिन साजरा करण्यामागची पार्श्र्वभूमी आणि हिवतापाला दूर करण्यासाठी आवश्यक उपाययोजना का महत्त्वाच्या आहेत, याची माहिती दिली. सूत्रसंचालन डॉ. ऋषिकेश खरोळकर यांनी केले.

### कोम्बिंगऑपरेशनमध्ये ६जणांकडून शस्त्र जप्त

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २६ एप्रिल :** जिल्ह्यात अचानकपणे राबविण्यात आलेल्या 'ऑल आऊट' व 'कोम्बिंग ऑपरेशन' मोहिमेत शस्त्र बाळगणारे ६, ११ जणांवर प्रतिबंधात्मक व १२७ सराईत आरोपींची तपासणी करण्यात आली.

पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांच्या आदेशान्वये, अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांच्या मार्गदर्शनात ही विशेष मोहीम राबविण्यात आली. यात पोलीस दलातील एकूण ३१ अधिकारी, १०६ अंमलदार आणि ८८ होमगार्ड सहभागी झाले होते.

या ऑपरेशनदरम्यान रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगारांच्या घरांवर अचानक भेटी देऊन त्यांच्या हालचालींची पडताळणी करण्यात आली. ते सध्या कुठे आहेत, कोणत्या प्रकारचा व्यवसाय करतात, त्यांच्या वर्तनात काही संशयास्पद बदल आहे का, याची चौकशी करण्यात आली. मालमत्तेविषयक गुन्हे करण्याची शक्यता असलेल्यांवर लक्ष केंद्रीत करून त्यांना समज देण्यात आली. ज्यामुळे संभाव्य गुन्हे रोखण्यास मदत झाली.

या मोहिमेदरम्यान ६ जणांवर शस्त्र अधिनियमांतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले त्यांच्याकडून अवैध शस्त्रे जप्त करण्यात आली आहेत. मालमत्तेविषयक गुन्हे करण्याच्या उद्देशाने संशयास्पदरीत्या वावरणाऱ्या ११ जणांविरुद्ध कलम १२२ (क) अन्वये गुन्हे दाखल करण्यात आले. या कारवाईमुळे गुन्हेगारी कृत्यांना आळा घालण्यास मदत होणार आहे. यावेळी घरफोडी व इतर गुन्ह्यांतील १२७ सराईत आरोपींच्या घरी भेटी देऊन त्यांच्या हालचालींची माहिती घेण्यात आली. त्यांना भविष्यात कोणतेही समाजविघातक कृत्य न करण्याबाबत समज देण्यात आली. ११० लॉजेस व हॉटेल्सची तपासणी करण्यात आली ३० संवेदनशील (मर्मस्थळ) ठिकाणांना भेटी देण्यात आल्या. जिल्ह्यात विविध ३१ ठिकाणी नाकाबंदी करून ८२७ संशयित वाहनांची तपासणी करण्यात आली. या तपासणीमुळे संशयित हालचालींवर नियंत्रण ठेवण्यास मदत झाली. मद्यपान करून वाहन चालविणाऱ्या २२ वाहनचालकांविरुद्ध खटले दाखल करण्यात आले आहेत. पोलिसांनी राबविलेल्या या धडक कारवाईमुळे गुन्हेगारांमध्ये स्पष्ट संदेश गेला आहे. कायदा व सुव्यवस्थेबाबत कोणतीही तडजोड -केली जाणार नाही, अशा 'ऑलआऊट' व 'कोम्बिंग ऑपरेशन' यापुढेही सुरूच राहणार आहे.

### लग्नाचे आमिष दाखवून विद्यार्थिनीवर दोन वर्षे अत्याचार

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २६ एप्रिल :** लग्नासाठी मुलगी पाहण्यास आला, मुलगी पसंदही पडली, आता आपण विवाह बंधनात अडकायचे आहे, त्यामुळे शरीर संबंध ठेवले तर काय फरक पडणार नाही, असे म्हणून मागील दोन वर्षांपासून एका पीडित विद्यार्थिनीवर घरात आणून बलात्कार केल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी विवेकानंद चौक पोलीस ठाण्यात आरोपीविरोधात बलात्काराचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आरोपी आशीष अनिल कांबळे (वय २७, रा. भारत सोसायटी, लातूर) जून २०२४ एक मूलगी मध्ये लातूर येथेच लग्नासाठी एक मुलगी पाहायला गेला होता. दोघेही एकमेकांना पसंद झाले होते. आता लग्नच करायचे आहे, असे म्हणून आरोपी आशीष याने पीडितेकडे शरीर सुखाची मागणी केली. विवाहापूर्वीच शरीर संबंध ठेवण्यास पीडितेने विरोध केला तरी आरोपी आशीष याने तिला स्वतःच्या घरी बोलावून तिच्यावर ऑगस्ट २०२४ मध्ये शरीर संबंध ठेवले. त्यानंतर दोघांनी २ एप्रिल २०२६ पर्यंत शरीर संबंध ठेवले. शेवटी आरोपी आशीष याने पीडितेसोबत विवाह करण्यास नकार दिला. तिच्याशी संपर्कही कमी केला. त्याने पीडितेच्या परस्पर विवाह केल्याचे पीडितेने पोलिसांना सांगितले. तिच्या फिर्यादीवरून विवेवकानंद चौक पोलीस ठाण्यात आरोपी आशीष अनिल कांबळे याच्याविरोधात गुरनं. २८४/२६ कलम ६९ भारतीय न्यायसंहितेनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अधिक तपास विवेकानंद चौक पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संतोष पाटील यांच्या नेतृत्वात सहायक पोलीस निरीक्षक ए. पी. खोडेवाड करीत आहेत. गुन्हा दाखल झाल्याचे माहित होताच आरोपी फरार झाला आहे. पोलीस त्याचा शोध घेत आहेत.

### रॉडने मारहाण; एकावर गुन्हा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २६ एप्रिल :** जुन्या भांडणाची कुरापत काढून एका तरुणावर लोखंडी रॉडने जीवघेणा हल्ला केल्याची धक्कादायक घटना रेणापूर तालुक्यातील बिटगाव तांडा येथे घडली आहे. याप्रकरणी पोलिसांनी एका आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. २२ एप्रिल रोजी सकाळी ७:४५ च्या सुमारास संजय गोपीनाथ राठोड हे आरोपी विष्णू मोतीराम राठोड याच्या घराकडे गेले असता, तु माझ्या घरी का आलास? असे म्हणून विष्णूने शिवीगाळ सुरू केली. वादाचे रूपांतर हाणामारीत झाले आणि आरोपीने लोखंडी रॉडने संजयच्या डोक्यावर प्रहार करून त्यांना गंभीर जखमी केले. लाथाबुक्क्यांनी मारहाण करत जीवे मारण्याची धमकी दिली. याप्रकरणी रेणापूर पोलिसात गुन्हा नोंद आहे.

# वाढत्या उष्णतेचा एसटी प्रवाशांवरही होतोय परिणाम !

## लग्न सोहळ्याचा अपवाद वगळता दुपारच्या दरम्यान बसस्थानकातील गर्दी कमी





**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २६ एप्रिल :** उन्हाच्या काहिलीचा आबालवृद्धांसह पशु - पक्षी सर्वांना त्रास सहन करावा लागत आहे. पर्यावरणाच्या वाढत्या असमतोलाचा हा परिणाम असल्याचे बोलले जाते. वाढत्या उष्णतेचा व्यवहारावरही प्रतिकूल परिणाम होताना दिसत सून नेहमी प्रवाशांच्या गर्दीने फुलून गेलेल्या एसटी बसच्या प्रवाशांची संख्याही सांगणं सोहळ्यासारख्या प्रसंगाचा अपवाद वगळता दुपारच्या वेळेस लक्षणीय घटल्याचे दिसून येत आहे.

मागच्या काही कालावधीपासून उष्णतेचे प्रमाण खूपच वाढत जात असल्याचे पाहायला मिळते. पर्यावरणाच्या वाढत्या असमतोलामुळे ऋतुचक्रातच अतुलनीय बदल होत गेल्याचे निदर्शनास येते. तिन्ही ऋतूंचे परिमाण मागच्या काही काळापासून सातत्याने बदलत गेल्याचे पाहायला मिळते. कधीही , कोणत्याही ऋतूप्रमाणे वातावरणात बदल होताना दिसतो. मध्यंतरी ऐन उन्हाळ्यात आलेल्या अवकाळी पावसाने अगदी पावसाळ्याप्रमाणे वातावरण निर्माण झाले होते.

आताही राज्याच्या बहुतांश भागात अवकाळीचे सावट असल्याचे हवामान विभागाकडून सांगण्यात आले आहे. बदलत्या ऋतुचक्राचा मानवी जीवनावर जसा प्रतिकूल परिणाम होत आहे, तसाच तो पीक - पाण्यावरही होताना दिसतोय. यासाठी कारणीभूत असणाऱ्या गोष्टींवर स्वतःहून मानव सगळे काही कळूनही निर्बंध आणू शकत नाही, हे खरे दुःख आहे.

सध्या उन्हाळ्याच्या उष्णतेने कहर केला आहे. राज्यात अनेक ठिकाणी तापमानाने चाळीशी केव्हाच ओलांडली आहे. लातूर जिल्ह्यातही तापमान दिवसेंदिवस वाढतच जात आहे. या वाढत्या उष्णतेमुळे दुपारच्या दरम्यान रस्त्यावरील वाहतुकीचे प्रमाणही बऱ्यापैकी कमी झाल्याचे पाहायला मिळते. उन्हाच्या झळांपासून स्वतःचा बचाव करण्यासाठी जो तो सावलीचा आधार घेताना दिसून येतो. महत्वाचे काम असल्याशिवाय नागरिकांनी घराबाहेर पडू नये असे आवाहनही प्रशासनाकडून, आरोग्य विभागाकडून केले जात आहे. खूपच महत्वाचे असेल तर उन्हापासून बचाव करण्याच्या उपाय योजनासह बाहेर पडावे असे सांगितले जात आहे. या वाढत्या उष्म्याचा परिणाम जनजीवनावर होत आहे. तो परिणाम एसटी बसने प्रवास करणाऱ्यांच्या बाबतीतही पाहायला मिळत आहे. सध्या उन्हाळ्याचे दिवस असल्याने प्रवासी मोठ्या संख्येने प्रवास करतात. मात्र, प्रवास करतानाही दुपारच्या कडक उन्हात प्रवास करण्याऐवजी प्रवासी सकाळच्या सत्रात प्रवास करण्यास प्राधान्य देताना दिसत आहेत. दुपारच्या दरम्यान तीन चार तास बस स्थानकावरही फारशी गर्दी दिसून येत नाही. बस स्थानकात असलेले प्रवाशी मिळेल त्या ठिकाणी सावलीचा आसरा घेऊन शांत बसलेले दिसून येत आहेत. सकाळी आणि ऊन ओसरल्यानंतर एसटी मधील प्रवेशाची संख्या वाढताना पाहायला मिळते. पण, दुपारच्या दरम्यान मात्र ही संख्या कमालीची रोडवल्याचे दिसून येत आहे.

सध्याच्या वाढत्या उष्णतेच्या पार्श्र्वभूमीवर एसटी प्रशासनानेही दुपारच्या वेळेस धावणाऱ्या गाड्यांची संख्या कमी करून सायंकाळच्या सत्रात धावणाऱ्या बसेसची संख्या वाढवावी,असा मतप्रवाहही प्रवाशांतून व्यक्त होताना दिसत आहे.

कारण दुपारी उन्हामुळे प्रवासी संख्या कमी असताना बसेस घेऊन जाणे आर्थिकदृष्ट्याही एसटी महामंडळाला परवडणारे नाही. या बाबींकडे एसटी महामंडळाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी गांभीर्याने पाहावे,अशी अपेक्षाही सुजाण नागरिकांतून व्यक्त होताना दिसत आहे.

## टोल फक्त सर्व सामान्यांनीच भरायचा का?




**तभा वृत्तसेवा प्रमोद सुरवसे**

**लातूर दि .२६ एप्रिल :** नितीन गडकरी यांनी राज्यात असताना फक्त मुंबई एकाचवेळी५५ उड्डाण पुलाची निर्मिती करून एक इतिहास रचला . त्यामुळे मुंबईची वाहतूक व्यवस्था सुरळीत झाली आता गडकरी केंद्रात काम करताना देशातील वाहतूक व्यवस्था सुरळीत व्हावी म्हणून नवनवीन रस्त्यांची निर्मिती करत आहेत हे अभिनंदनीय आहेच .

पण याठिकाणी टोलनाके निर्माण करून झालेला खर्च वसुल काण्यासाठी त्या टोलनाक्यावर एका संस्थेची नेमणूक करून वसुली करत आहेत या ठिकाणी दोनचाकी वगळता इतर वाहनांना टोल भरावा लागतो.

हे सर्व ठिक पण एक बाब लक्षात आल्याशिवाय राहत नाही ती म्हणजे - मोठे अधिकारी आणि राजकीय मंडळी ज्यात आमदार, खासदार आदी ह्या मंडळींकडे दहा वीस लाखांच्या पुढील किमतीच्या, महागड्या गाड्या असतात . महागड्या गाड्या वापरून सुद्धा साधा दोन तीनशेचा टोल भरू शकत नाहीत का? उलट त्यांनी स्वतः हून टोल भरून एक समाजात आदर्श निर्माण केला पाहिजे पण कित्येक वेळा ही मंडळी टोल नाक्यावर हुज्जत घालताना चे व्हिडीओ वायरल झाल्याचे आपण पाहिले असेल त्यामुळे टोल नाक्यावर सर्वंच वाहनांना टोल बंधनकारक असणे आवश्यक झाले आहे . अँब्युलन्स वगळून इतर वाहनांना टोल लावावा .

यात सर्व सामान्य कधी ही टोल नाक्यावर हुज्जत घालताना दिसून येत नाही . तो टोल भरतोच भरतो त्यामुळे टोल भरणे बंधनकारक व्हावे जेणेकरून तो नाका लवकरात लवकर खुला होऊ शकेल यात राजकीय मंडळीचा सहयोग, मदत करण्यांची त्यांनी इच्छा शक्ती असेल तरच हे शक्य होईल.

### महावितरणकडून दुरुस्तीची कामे सकाळच्या सत्रात

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २६ एप्रिल :** उन्हाळ्यात विजेच्या वाढत्या मागणीच्या कालावधीत आणि पावसाळी परिस्थितीत वीजपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी महावितरणकडून वीज यंत्रणेशी संबंधित देखभाल व दुरुस्तीचे पूर्वनियोजित कामे सध्या सुरु आहे. मात्र उन्हाचा तडाख्यात नागरिकांची गैरसोय टाळण्यासाठी देखभाल व दुरुस्तीचे पूर्वनियोजित कामे सकाळी ७ ते ११ वाजेदरम्यान करावेत असे निर्देश मुख्यालयाकडून क्षेत्रीय कार्यालयांना शनिवारी (दि. २५) देण्यात आले.

पावसाळ्यात वीजयंत्रणा सज्ज ठेवण्यासाठी तसेच वीजपुरवठा खंडित होणे व वीजसुरक्षेचे धोके टाळण्यासाठी वीज ग्राहकांना पूर्वसूचना देऊन देखभाल व दुरूस्तीचे कामे सुरु आहे. साधारणतः मे महिन्याच्या अखेरीस सर्व कामे पूर्णत्वास जातात. मात्र सद्यस्थितीत सकाळी १० ते दुपारी २ किंवा चार वाजेपर्यंत वीज पुरवठा बंद ठेवत देखभाल व दुरुस्तीचे कामे सुरु आहेत. या दरम्यान, पर्यायी वीजपुरवठा उपलब्ध करून देण्याचे तसेच संबंधित वीजग्राहकांना नोंदणीकृत मोबाईल क्रमांकावर 'एसएमएस'द्वारे देण्यात येणार आहेत.

## सूतमिल रोडवरून वाहतेय घाण पाणी



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २६ एप्रिल :** शहराच्या ट्यूशन एरियातील देशिकेंद्र शाळेच्या समोरील सूतमिल रस्त्यावर गटार तुंबल्याने सर्व पाणी रस्त्यावरच येत आहे. त्या दुर्गंधीयुक्त पाण्यातूनच विद्यार्थ्यांसह पालकांना जावे लागते. वाहनांमुळे तेच पाणी अंगावर उडत असल्याने नागरिक व विद्यार्थी बेजार झाले आहेत. मागील दोन दिवसांपासून ही गटारगंगा वाहत असतानाही महापालिका प्रशासनाने मात्र याकडे डोळेझाक केल्याचेच दिसून येत आहे.

शहराच्या ट्यूशन एरियात अनेक शाळा महाविद्यालयांसह शिकवणी वर्गही मोठ्या संख्येने आहेत. या भागात हजारो विद्यार्थी शिक्षण घेतात. गांधी चौकातून उमाजी नाईक चौकाकडे जाणाऱ्या या रस्त्यावरील देशिकेंद्र शाळेजवळ एक गटार मागील दोन दिवसांपासून तुंबली आहे. त्या गटारीचे दुर्गंधीयुक्त पाणी रस्त्यावरच येत आहे. या रस्त्याने दररोज शालेय व महाविद्यालयीन हजारो विद्यार्थी या पाण्यातूनच ये-जा करतात. वाहनांमुळे त्यांच्या अंगावरही पाणी उडते. याचा त्रास त्या विद्यार्थ्यांना सहन करावा लागतो. दोन होऊन गेले तरी महापालिकेचे कोणीही याकडे फिरकल्याचे दिसून येत नाही. सध्या महापालिकेची मान्सूनपूर्व नालेसफाई मोहीम सुरू असतानाच देशिकेंद्र शाळेजवळ रस्त्यावरच गटारगंगा वाहत असल्याचे विदारक चित्र दिसत आहे. याचा विद्यार्थ्यांसह पालकांना त्रास सहन करावा लागत आहे.

## गोलाईसह फ्रूट मार्केट परिसराची महापौरांनी केली पाहणी



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २६ एप्रिल :** हातगाडीसह भाजी विक्रेत्यांच्या अतिक्रमणाने बजबजपुरी बनलेल्या गंजगोलाईतील व्यापाऱ्यांना कडेलाच थांबून व्यवसाय करण्याच्या सूचना महापौर जयश्री सोनकांबळे यांनी शनिवारी (दि.२५) केल्या. यावेळी त्यांनी फ्रूट मार्केट परिसराची पाहणी करून अस्वच्छतेबाबत नाराजी व्यक्त केली. सर्व घाण दूर करण्याच्या सूचना प्रशासनाला दिल्या.

शहराच्या गंजगोलाईत वाढत्या अतिक्रमणामुळे प्रचंड वाहतूक कोंडी होते. हातगाडी व्यापाऱ्यांसह रिक्षाचलकही भर रस्त्यात रांगा लावून थांबतात. येथून जाणारा सामान्य वाहनधारक काही बोलायला गेला तर त्याच्याच अंगावर येणे, मारहाण करणे असे प्रकार यापूर्वी झाले आहेत. गोलाईतील व्यापाऱ्यांनी रस्त्याच्या कडेला थांबूनच आपले व्यवसाय करावेत, अशा सूचना महापौर जयश्री सोनकांबळे यांनी केल्या. यावेळी झोन प्रमुख पवन सुरवसे यांच्यासह अधिकारी उपस्थित होते.

### किशोरवयीन मुलांसाठी 'संयम' उपक्रम

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २६ एप्रिल :** जिल्ह्यातील किशोरवयीन मुलामुलींना व्यसनापासून परावृत्त करणे आणि त्यांच्यात जनजागृती करण्यासाठी 'संयम' उपक्रम जिल्ह्यात राबविण्यात येणार आहे. यासाठी विशेष प्रशिक्ष एक प्रशिक्षण कार्यक्रमाचे सादरीकरण गुरुवारी जिल्हाधिकारी कार्यालयात करण्यात आले. हा उपक्रम ज्ञान प्रबोधिनी संशोधन संस्था पुणे, रोटरी क्लब लातूर, जिल्हा परिषद माध्यमिक शिक्षण विभाग आणि भारतीय स्त्री शक्ती संघटना, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येत आहे. जिल्हाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत उपक्रमाच्या नियोजनाबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. हा प्रशिक्षण उपक्रम येत्या जून किंवा जुलै महिन्यात आयोजित केला जाणार असून, यात सुमारे १०० शिक्षक आणि स्वयंसेवक सहभागी होतील.

**जाहीर प्रगटन**

मौजे लातूर शहर मनपा हद्दीतील गवळी नगर,गरूड चौक भागातील ता.जि . लातूर येथील तमाम जनतेस या जाहीर जहितर प्रगटन द्वारे सूचित करण्यात येते की, माझे पक्षकार श्री. तायप्पा संतराम कांबळे, रा. गवळी नगर लातूर, ता. जि . लातूर यांनी मला दिलेल्या माहिती वरून व दाखवलेल्या कागदपत्रावरुन तसेच वकील म्हणून अधिकृत केले वरून सर्व जनतेच्या महितीस्तव पुढील प्रमाणे जाहीर प्रगटन देण्यात येत आहे. माझे पक्षकार यांनी श्री. आनंद प्रल्हाद गवळी व श्री विजय प्रल्हाद गवळी हे दोघे रा. बार्शी रोड पाण्याच्या टाकीजवळ, ता. जि . लातूर यांच्या मालकी कब्जे वहीवटीचा प्लॉट जो मौजे लातूर मनपा हद्दीतील गवळी नगर भागातील ज्याचा जमीन सर्व्हे नं . ५२/१/ब पैकी प्लॉट नं . ५४ पुर्ण ज्याची लांबी दक्षीण उत्तर ५० फूट - रुंदी - पूर्व पश्र्चिम ४० एकूण २००० चौरस फूट असून ज्याची चतु:सीमा खालील प्रमाणे - पूर्वेस सुनीता सुरेश माने यांचा प्लॉट, पश्र्चीमेस विश्र्वनाथ भुजबळ यांचा प्लॉट, दक्षिणेस - २० फूट रुंदीचा रस्ता , उत्तरेस-२० फूट रुंदीचा रस्ता. याप्रमाणे वर्णनीय चतु:सीमेच्या आतील प्लॉट विद्यमान मालक श्री आनंद प्रल्हाद गवळी व श्री विजय प्रल्हाद गवळी यांच्या मालकीचा असून त्यांनी सदर प्लॉट आमचे पक्षकारास कायम विक्री करण्याचा करार केला आहे. सदरील प्लॉट निर्विवाद व निर्जोखीम असल्याची हमी विद्यमान मालकानी माझ्या पक्षकारास दिलेली आहे. तरी सदर प्लॉटवर कोणाचा उजर, हक्कसंबंध, कर्ज,बोजा, गहान खत, बक्षीस पत्र, कोर्ट डीक्री , मृत्यूतारण, लीज, लोन, शेजाऱ्यांचा वाद, शासकीय अथवा निमशासकीय कर्ज, न्यायालयीन वाद अथवा इतर कसल्याही प्रकारचा वाद असल्यास सदरचे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसाच्या आत माझ्या खालील पत्त्यावर लेखी उजर / आक्षेप दाखल करून रितसर पोचपावती घ्यावी. मुदतीत जर कोणाचा आक्षेप न आल्यास सदरील प्लॉट निर्वी वाद व निर्जोखीम आहे असे समजून माझे पक्षकार सदर प्लॉटचे रजीस्टर्ड खरेदी खत आपल्या हक्कात करून घेतील याची नोंद घ्यावी.

सबब हे जाहीर प्रगटन दि. २७ /०४/२०२६

प्रगटन देणार
तायप्पा संतराम कांबळे,
रा. गवळी नगर, लातूर,
ता. जि. लातूर
मोबाईल नं . ९६६५० ८९९००.

तर्फे
ॲड..महादेव चेवले
रा. सोनवती, ता. जि . लातूर.
मो.नं. ९३७०७ ६२४९४